# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवायें समर्पिता

## दिनांक १२.०२.२०१९ रोजी (का.प.क्र.२५) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ रोजी (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-२५) मा.महापौर, श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ०२.३० वाजता वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त, श्री.निपुण विनायक,भा.प्र.से., नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| ११. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १२. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १३. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १४. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १५. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १६. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| १७. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| १८. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| १९. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २०. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २१. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २२. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २३. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| २४. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| २५. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| २६. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| २७. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| २८. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |

| | |
|---|---|
| २९. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३०. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ३१. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ३२. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ३३. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ३४. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ३५. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ३६. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ३७. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ३८. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ३९. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ४०. | स.स. श्री.गादगे शितल विरभद्र |
| ४१. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ४२. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ४३. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ४४. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ४५. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ४६. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ४७. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ४८. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ४९. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ५०. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ५१. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ५२. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ५३. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ५४. | स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन |
| ५५. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ५६. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ५७. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ५८. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ५९. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ६०. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ६१. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ६२. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ६३. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ६४. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |

| | |
|---|---|
| ६५. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ६६. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ६७. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ६८. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ६९. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ७०. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

(या वेळी स.माजी सदस्य श्री.दादामिया यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना सभागृहात दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.विकास जैन :ठेकेदार काम घेतात. परंतु त्यांचे बील दिले जात नाही म्हणुन काम थांबलेले आहे. ठेकेदारांचे २ टक्के रक्कम मनपात जमा असते. बील देतांना ते वजा करून घ्यावे. मागच्या बैठकीत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार कार्यवाही होत नाही. वर्क ऑर्डर देतांना त्यात नमुद करावे की, २ टक्के रक्कम बीलामधून वजा करण्यात येईल. परंतु आदेशीत करूनही परत संचिका मान्यतेसाठी पाठविल्या जातात.

श्री.गजानन बारवाल :ठेकेदारांची बील थांबविली म्हणुन कामेही थांबलेली आहेत. पाणी पुरवठ्याच्या कामांची बीले त्वरीत देणे संबंधी सूचना कराव्यात.

श्री.राजू शिंदे :२ टक्के बीलातून वजा करावे. सुचना दिल्या. काही प्रकरणात लागू होते काही प्रकरणात नाही असा भेदभाव का? श्रीमती मुंढे ताई यांचे वार्डातील कामात २ टक्के रक्कम बीलात वजा करावी म्हणुन लिहून दिले तरी त्यावर योग्य ती कार्यवाही असे लिहिले गेले इतर संचिका मंजूर केल्या. असा दुजाभाव का होतो?

मा.महापौर :श्रीमती मुंढे ताई यांचे वार्डातील ती संचिका मागवून घेतली होती. निविदेत १ टक्के अनामत रक्कम भरली जाते ती व १ टक्के बीलामधून असे ठरले होते ती संचिका क्लिअर केली. अशा पध्दतीने भेदभाव व्हायला नको.

मुख्यलेखाधिकारी :२ टक्के सेक्युरीटी डिपॉजीट घेतल्यानंतर वर्क ऑर्डर देतो. एकाला द्यावे व एकाला देऊ नये असे कूठेही म्हटलेले नाही. निविदेतील अटी शर्तीनुसार व प्रचलित नियमानुसार कार्यवाही करणे असते, असे म्हटले आहे. पॉलीसी निर्णय जो होईल त्यानुसार कार्यवाही होईल. त्या संचिकेवर लेखा विभागाचे अभिप्राय नाही तांत्रिक विभागाचे आहे.

श्री.राजू शिंदे :छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्याची उंची वाढविणेचा जो प्रस्ताव आहे त्यास कार्योत्तर मंजूरी स्थायी समितीने द्यावी. तसे सभापती यांनी येथे जाहीर करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :स्थायी समितीची सभा ८ तारखेला होती. सभा सुरू झाल्यानंतर ती संचिका आली होती ते काम थांबवू नये. त्यासाठी त्यास आजच मंजूरी देण्यात येते. जेव्हा सभा होईल त्या सभेत त्या विषयास मंजूरी देण्यात येईल.

श्रीमती मनिषा मुंढे :वॉर्डातील नाल्याचे पुर्ण काम करावे.

श्रीमती आशा निकाळजे :भिमा-कोरेगाव स्तभांबाबत काय झाले? स्थायी समिती सभेत तो विषय मंजूर झाला नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :त्यास जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्तांची परवानगी लागेल. त्यामूळे त्यास मंजूरी दिली नाही. संबंधीत विभागाकडे संचिका पाठविली.

मा.महापौर :या संचिकेचा तीन वर्षाचा प्रवास आहे. त्यास पोलीस व महसूल विभागाची मान्यता मिळेल. यास अधिन राहून मंजूरी मिळावी.

श्री.राहूल सोनवणे :संचिका तीन वर्षापासून चालू आहे. अन्याय होऊ नये.

श्री.गंगाधर ढगे :पुतळा बसवायचा असेल तर महसूल व पोलीस विभागाची परवानगी लागते. जाणीव पुर्वक ते काम मागे टाकले जात आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :पोलीस व महसूल विभागाची मंजूरीच्या अधीन राहून मंजूरी दिली जाईल.

श्रीमती अंकिता विधाते :ठेकेदाराची बीले का निघत नाही? आज खाली त्यांनी घेराव घातला होता.

श्रीमती किर्ती शिंदे :ठेकेदार बील देत नाही म्हणुन काम करीत नाही. बील त्यांना देण्यात यावे.

श्री.राजू शिंदे :वसुलीसाठी प्रशासनाने काय प्रयत्न केले? नियोजन काय केले? किती बैठका घेतल्या? बजेट केल्यानंतर वसुली करणेचे काम प्रशासनाचे आहे. शासनाच्या अनुदानावरच विकास कामे करणार काय? किती मालमत्ता आहे? कुणाकडे किती वसुली बाकी आहे? सर्व वर्ग वॉईज सांगावे. कोणी किती वसुली केली? प्रशासनाचे वसुलीसाठी काय प्रयत्न केले?

कर निर्धा. व संकलक :(वॉर्ड निहाय वसुलीची माहिती देतात.) रु.४५० कोटीचे मालमत्ता कराचे उद्दिष्ट होते. पैकी रु.८८.३९ कोटी वसुली झाली. १९.६७ टक्के वसुली आहे.

मा.महापौर :सर्व सदस्यांना वसुलीचा जो तक्ता तयार आहे त्याची प्रत देण्यात यावी.

मा.आयुक्त :यावर्षी ४०० टक्के वाढीव बजेट दिलेले आहे. मालमत्ता कर रु.१०० कोटीच्या जवळपास असते. परंतु मिळकतीचा रि-सर्व्हे करतो आहे म्हणुन वाढीव रु.४५० कोटीचे बजेट दिले. पाणीपट्टी रु.५० कोटी ऐवजी रु.२०० कोटीचे दिले. त्याप्रमाणे २० टक्के झाली सांगतात. निश्चित मापदंडानुसार मागिल वर्षी किती व या वर्षी किती होते? हे सांगता येईल. जास्त वसुली व्हावी म्हणुन तिनपट टारगेट दिले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :पाणीपट्टीचे, नगर रचना विभाग व इतर जेथून वसुली होती. त्या सर्व विभागाची माहिती मिळावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :जी वसुली झाली. त्यात थकबाकी किती? व करन्ट वसुली किती? टारगेट देतांना दोन प्रकारचे दिले पाहिजे. जे नियमित भरतात त्यांचेकडूनच वसुली झाली आहे. ज्यांना टॅक्स लागला नाही जे लोक वर्षानुवर्ष टॅक्स भरणा करीत नाही त्यांचेकडे कुणी गेले नाही? करन्ट डिमांड किती? व थकबाकी किती? यातून किती वसुली झाली?

श्री.कैलास गायकवाड :नवीन किती मालमता शोधल्या आहेत?

श्री.राजू शिंदे :कोणत्याही अँगलने बघीतले तर टारगेटनुसार वसुली नाही. वसुलीसाठी सक्षम अधिकारी दिले पाहिजे. जे टारगेट दिले ते वसुल करावे. वसुली किती करायची त्यानुसार बजेट अंतिम होते. १९ टक्के वसुली कमी आहे. प्रशासनाने वसुलीसाठी काय प्रयत्न केले? ते ही सांगावे नियोजन काय आहे?

श्रीमती अंकिता विधाते :वसुली करीत आहे. परंतु आता निवडणुक लागणार आहे. त्यावेळी अधिकारी, कर्मचारी यांना सेवा दिल्यास वसुलीचा गॅप कसा भरणार आहे? मालमत्ताचे रिव्हिजन चालू केले का?

श्रीमती किर्ती शिंदे :नगर रचना विभागात अधिकारी उपस्थित नसतात. परवानगी मिळत नाही. नियोजन काय केले? ठेकेदाराची बीले निघत नाहीत. कचरा समस्या निर्माण झाली आहे.

श्री.रामेश्वर भादवे :मोबाईल टॉवर्स बाबत काय कार्यवाही केली? रु.३ लक्षच्या वर ज्यांचेकडे थकीत रक्कम आहे. झोन-वॉईज सिल करण्याचे आदेशीत करावे. पैसे नाही म्हणुन ठेकेदार काम करीत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली.

श्री.जमीर कादरी :शहरातील मॉल, शादीखाना, मंगल कार्यालय असतील, थिएटर असेल, किती वसुली होते?

श्री.राजगौरव वानखेडे :कर निर्धारक व संकलक हे अधिकारी कोण आहे? श्री.खरवडकर हे कोणते पदाचे अधिकारी म्हणुन खूलासा करीत आहे.

मा.महापौर :श्री.पाटणी रजेवर आहे.सहा.कर निर्धारक म्हणुन श्री.खरवडकर काम करतात.

श्री.राजगौरव वानखेडे :या पदावर कायम अधिकारी असावे. श्री.खरवडकर हे झोन क्र.३ मध्ये आहे तेथील वसुली २.९१ टक्के आहे. असे असतांना त्यांना प्रमुख पद दिल्यास वसुली होईल का? काही वॉर्डात २०-२२ टक्के वसुली आहे. असे असतांना विकास काम करतांना येथे दुर्लक्ष होते. पाणीपट्टी नगर रचना, होर्डींग वसुली किती? टॉवर्सची वसुली किती? कमर्शियल मिळकती किती? वसुली किती? संपूर्ण विभागणी करावी तरच वसुलीचा अंदाज येईल. किती मिळकतीचे रिव्हीजन झाले? तेथील वसुली किती? ज्यांनी कर भरणा केले नाही त्यांचेवर काय कार्यवाही केली? कर अदालत मध्ये किती लोक आले? वसुली किती झाली? करात सवलत देऊन मोहिम राबविली. प्रशासनाने काय प्रयत्न केले? सक्षम अधिकारी या पदावर द्यावे. कराच्या संदर्भात अनेक प्रकरण मा.कोर्टात आहे त्यांचाही निपटारा करावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :१९ टक्के कशावरून काढले? स्थायी समिती सभा, सर्वसाधारण सभा व प्रशासनाचे उद्दिष्ट किती होते?

सहा.कर निर्धा. व संक. :रु.४५० कोटी मालमत्ता कराचे उद्दिष्ठ आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :चालू मागणी व थकबाकी मध्ये किती वसुली झाली? रु.४५० कोटी मालमत्ता कराचे उद्दिष्ट दिले. १९ टक्के मध्ये मागील थकबाकी असलेली रक्कम आहे. मा.आयुक्तांनी जे टारगेट दिले ते सुध्दा पूर्ण होत नाही. वसुली होत नसल्याने ठेकेदाराची बीले थकीत आहे.

सहा.कर निर्धा.संकलक :करंट व थकबाकी किती असे वेगवेगळे येत नाही. रु.४५० कोटी थकबाकी व करंट दोन्ही आहे यात चालू मागणी रु.७८ कोटी आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :वसुली झाली. तर विकास कामे होतील. वॉर्ड-वाईज वसुली करावी. त्याप्रमाणे कामे व्हावीत.

(यावेळी डायस समोर सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.राजू शिंदे :विकास करायचा असेल तर वसूली झाली पाहिजे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :वसुली करावी. विकास कामे करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :माझे वॉर्डात २४ टक्के वसुली होते. पैसा आला पाहिजे विकास कामे होतील. जेथे ८,१३ टक्के वसुली आहे ते दुसरे विषय घेण्याचे सांगतात. जेथे जास्त वसुली तेथे विकास कामाबाबत धोरण निश्चित करावे. जेथे जास्त वसुली तेथे त्याप्रमाणे कामे झाली पाहिजे. झुकते माप दिले पाहिजे.

श्री.नासेर सिद्दीकी :प्रोझोन मॉलची किती वसुली झाली?

श्री.राजेंद्र जंजाळ :२.६६ लक्ष घरे आहे. त्या बाबतचा रेकॉर्ड महावितरणाकडून दिला होता. परंतु टॅक्स भरणाऱ्यांची संख्या एक लक्ष आहे. रु.८८ कोटी टॅक्स भरले त्यात अकाऊंट मध्ये किती लोक होते?

सहा.कर निर्धारक :डाटा एन्ट्री करण्याचे काम चालू आहे.

श्री.राजू शिंदे :ऑनलाईन वसुली झोनला येऊन किती भरणा केले? व प्रत्यक्षात प्रशासनाने केलेल्या प्रयत्नाने किती वसुली झाली? माझे माहिती प्रमाणे ९९ टक्के वसुली ही लोकांनी स्वत:हून भरले आहे. कर दाते यांचेकडून कर भरणा करून घेत नाही. पावती आणण्यास घरी पाठवितात.

श्रीमती संगिता वाघुले :झोनला लोक जातात. चकरा माराव्या लागतात. कर भरणा करून घेत नाही. पावती देत नाही.

कु.सायली जमादार :जे जुने करदाते आहे त्यांचेकडूनच वसुली होते.

श्री.राजेंद्र जंजाळ :रु.८८ कोटीत किती लोकांनी कर भरणा केला. जे भरणा करतात त्याची संख्या किती? किती मालमत्ता आहे? कितींना टॅक्स लागला नाही? सहा. निबंधक रजिस्ट्री ऑफिस त्यांचेकडे मालमत्ताचे रजिस्ट्रेशन आहे. त्यांचेकडून माहिती घेतली का? अनेक मालमत्ता भाड्याने दिल्या. त्याचे भाडे मिळत नाही. कोणी कोर्टात जाते. कमी भाडे भरतात. याबाबत काय केले? मो.टॉवर्सची संख्या ८८६ पैकी ६० टॉवर्सला परवानगी, बाकी अनधिकृत आहे. स्ट्रक्चर ऑडीट होत नाही. जिवित हाणी होऊ शकते. ती जबाबदारी कुणाची असेल? माझे वार्डात अनधिकृत टॉवर्स काम चालू आहे कार्यवाही होत नाही. हे सर्व होण्यामागे जबाबदारी कुणाची आहे? प्रशासन काय करते? टॉवर्स करण्यास दोन तीन महिने लागतात. एका दिवसात ते होत नाहीत. तरी लक्ष दिले नाही. ६० टॉवर्सला परवानगी आहे. त्यांचेकडे रु.१.४६ कोटी थकबाकी आहे. ज्यांना परवानगी दिली नाही, टॅक्स लावला आहे. त्यांचेकडे रु.१४.७६ कोटी कर थकीत आहे. असे असतांना प्रशासन लक्ष का देत नाही? एकूण रु.१५ कोटी वसुल करणे आहे.

श्री.राजू शिंदे :ज्या घरावर टॉवर्स आहेत त्यांना वेगळा टॅक्स लावतो का?

सहा.कर निर्धारक :रु.१४.६५ कोटी बाकी आहे. रु.७.८२ कोटी वसुली आहे. आजची अपडेट माहिती आहे. मोबाईल टॉवर्सच्या बाबतीत अति.मुख्य सचिव यांनी व्हिडीओ कॉन्फरन्स दिनांक १५.११.२०१८ रोजी घेतली, सुचना केली, टॉवर्सबाबत पॉलीसी निर्णय घ्यायचा, आवश्यक वाटेल त्याप्रमाणे सभेची मंजूरी घेऊन शासनाकडे पाठवायचे. कराच्या वसुलीबाबत कार्यवाही करणेसाठी वीजपुरवठा

पोचरस्ता, पाणी पुरवठा ड्रेनेज हे विखंडीत करायचे. १५ रिट पिटीशन कोर्टात आहे. त्याचे बाबत कठोर कार्यवाही करायची नाही असे आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :कपंनीवर कार्यवाही न करता ज्याचे घर त्याचेवर कार्यवाही करणार का? हे योग्य नाही. कर वसुल करु नये असे कोणतेही मा.कोर्ट म्हणणार नाही.

सहा.कर निर्धारक :५० टक्के कर भरला पाहिजे असे अंडरटेकींग घेतले आहे. ५० टक्के सिंगल टॅक्स वसुल होतो. जे शास्ती म्हणुन डबल लावले आहे. त्याचे प्रपोजल निर्णयासाठी नगर रचना मध्ये आहे.

श्री.राजू शिंदे :धोरणात्मक निर्णय घेण्याचे सांगितले आहे. तर ज्या निवासी भागात जेथे नागरिक जास्त राहतात. तेथील टॉवर्स काढून घ्यावे. कमर्शियल ठिकाणी ते लावावे. नागरिकांना आजार होत आहे. या टॉवर्ससाठी काहीच नियम लावत नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :रु.२५ कोटी कराचे आहे. वसुलीसाठी कोर्ट निर्बंध घालत नाही. इल्लिगल आहे. त्यांचेवर कार्यवाही करावी. त्या टॉवर्सचे रेकॉर्ड नाही. प्रधान सचिव यांनी सांगीतले की, धोरणात्मक निर्णय घ्यावा. तर प्रस्ताव का आणला नाही? आता धोरणात्मक निर्णय घ्यावा. जे व्यवसाय करतात त्यांना टॅक्स लावला पाहिजे. मनपाच्या मालमत्ता भाड्याने किती दिल्या? किती उत्पन्न येणे बाकी आहे? अपेक्षीत किती आहे? माहिती द्यावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :जे रेग्यूलर भरतात, तेच भरतात. जे भरत नाही. अभय योजना राबवितो तरी भरत नाही. काही लोक कर भरण्यास येतात तर परत पाठवितात. अनेक कारणे आहे दर तीन महिन्याला किती वसुली? थकबाकी किती? याचा आढावा घ्यावा? कर आकारणीसाठी कर्मचारी कमी होते. आऊट सोर्सींगचे कर्मचारी घेतले. इल्लिगल टॉवर्स उभारणेचे कामाची टोळी तयार झाली. परवानगी दिली जाते. टॉवर्स उभे राहते व प्रकरण कोर्टात जाते. याची चौकशी करावी. ज्यांचेकडे थकीत रक्कम आहे वसुल करावे.

श्रीमती माधुरी देशमुख :धनादेश घेतले जावे. काहींना परत पाठविता. जे कर भरतात त्यांचेच घर मोजणीसाठी येतात. मा.कोर्टात किती प्रकरणे आहे?

कर निर्धा.व संकलक :धनादेश बाऊंस झाला असेल तर पुन्हा तो स्विकारत नाही.

मा.महापौर :टॉवर्सचा महत्वाचा विषय आहे. कमी वेळेत माहिती मिळणार नाही. टी.पी. विभागाने माहिती घ्यावी. यावर विशेष सभा घेऊन आवश्यक ती माहिती घेऊ. एक-एक विभाग माहिती देईल.

श्री.रेणुकादास वैद्य :प्रशासनाची वसुली बाबत काय भुमिका आहे?

श्री.राजगौरव वानखेडे :जेथून उत्पन्न येणार आहे त्याबाबत कार्यवाही करावी.

नगर रचना अधिकारी :रु.४८.९२ कोटी वसुल झाली. टारगेट रु.२०० कोटी आहे. जनजागृती केली.

श्री.राजेंद्र जंजाळ :कितींना परवानगी दिली? कितींना कम्प्लीशन दिल?

नगर रचना अधिकारी :१०२३ लोकांनी बांधकाम परवानगी दिली. त्यापैकी ४४५ भोगवटा प्रमाणपत्र दिले.

श्री.राजगौरव वानखेडे :५० टक्के सुध्दा भोगवटा दिले नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :ज्यांनी भोगवटा घेतला नाही कारण काय? त्यांचेवर काय कार्यवाही केली?

| | |
|---|---|
| श्री.अजीम अहेमद | :परवानगी देतो, पाच प्रती तयार करतात. एक परवानगी होल्डर यांना एक कार्यालयात तर तीन प्रति कोणास देता? |
| नगर रचना अधिकारी | :चार कॉपीजवर सह्या होतात. त्यात एक जिल्हाधिकारी, कार्यालय एक संचिकेला एक ओनरला व एक प्रत इमारत निरीक्षक यांना देतो. भो.प्रमाणपत्र देतो. तेव्हा कर लागावा म्हणुन एक प्रत त्यावेळी कर विभागास एक प्रत देतो. वेळोवेळी नोटीसेस दिल्या आहेत. आता ४५ टक्क्यापर्यंत हे प्रकरणे गेली. काही ठिकाणी असे व्हॅल्यूशन केले की, ते रेग्यूलर होत नाही. त्यांचे भोगवटा प्रमाणपत्र देता येत नाही. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :ज्यांना परवानगी दिली. लगेच भोगवटा दिले पाहिजे. |
| मा.महापौर | :परवानगी घेतल्यानंतर वापर सुरू होतो तो इल्लिगल वापर आहे. कर विभागाने लक्ष दिले पाहिजे. कम्प्लीशन घेणेसाठी काय प्रयत्न केले? |
| नगररचना अधिकारी | :परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र घेण्याचे प्रमाण आता वाढले आहे. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :त्यांचेकडे दंड लावून भोगवटा प्रमाणपत्र दिले पाहिजे. |
| श्री.विकास जैन | :परवानगी दिल्यानंतर मुदत संपल्यानंतर त्यांना कळविले पाहिजे की, परवानगी घ्यावी लागेल किंवा भोगवटा प्रमाणपत्र घ्यावे. अशी सक्ती केली पाहिजे. |
| मा.महापौर | :गंभीर विषय आहे. आढावा बैठकीत घेऊ. इतर विषय आहे ते घेऊ. पाणी पुरवठ्याची वसुली बाबत माहिती द्यावी. |
| श्री.राजू शिंदे | :वसुलीसाठी काय नियोजन केले? प्रशासनाने काय प्रयत्न केले? |
| कार्य.अभियंता-(पा.पू.) | :०७ टक्के वसुली जायकवाडी ते सिटीपर्यंतची झाली आहे. १०० टक्के वसुली होईल. वार्डमधून पाणीपट्टी वसुली होते ती वार्ड कार्यालयामार्फत मिळू शकेल. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :ज्यांचेकडे पाणीपट्टी थकीत आहे त्याचा डाटा आहे का? |
| श्री.गंगाधर ढगे | :एलईडीला रु.२.७२ कोटी दरमहा देतो. परंतु माझे वार्डात ४८ एलईडी लागलेल्या आहे. त्यापैकी २९ लाईट बंद आहे. शहरातील सर्व लाईटबाबत लेखा परिक्षण व्हावे त्यानंतर त्यांना बील द्यावे. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :सर्व रेकॉर्ड पेपरलेस करायला पाहिजे. आता रजिस्टरवर नोंदी ठेवू नये. डाटा उपलब्ध का नाही? थकीत वसूली किती आहे? |
| श्री.राजगौरव वानखेडे | :अभय योजनेतून किती वसुली झाली? |
| कार्य.अभियंता | :३१ डिसेंबर रोजी ही योजना होती. १६७२ नळ रेग्यूलर केले. मेन बुकवरून डेटा तयार केला होता ते बूक वार्ड कार्यालयाकडे आहे त्यानुसार वसुली होते. |
| श्री.राजेंद्र जंजाळ | :पाणीपट्टी भरण्यास गेल्यावर रजिस्टर तपासून भरून घेणार का? तोपर्यंत ते लोक तेथे उभे राहणार काय? |
| मा.महापौर | :कन्झ्युमर नंबर असायला पाहिजे. डाटा तयार ठेवावा. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :३१ डिसेंबरच्या नंतर अभय योजना राबवावी. रु.५०००/- फाईन लावतो ते योग्य नाही. जाचक अटीमूळे कोणी येत नाही. त्या अटी शिथील कराव्यात. |
| श्री.राजू शिदे | :कमर्शियल नळ किती आहे? १० टक्के कमर्शियल नळ असायला पाहिजे. |
| कार्य.अभियंता | :१८५३ नळ कमर्शियल आहे. अर्धा इंच नळासाठी रु.२०,२५०/- पाणीपट्टी आहे. |
| श्री.राजू शिंदे | :कमी कनेक्शन आहे. रु.२० हजार असायला पाहिजे. प्रशासनाचे कन्ट्रोल नाही. जर रु.२० हजार असेल तर कमर्शियल कमीत कमी रु.५० हजार असेल. तर |

रू.२०००/- प्रमाणे पाणीपट्टी देऊ शकतो. प्रत्येक विभागाचे काम योग्य होत नाही. प्रशासनाने लक्ष दिले पाहिजे. वसुली होणे आवश्यक आहे.

माल.अधि.श्री.निकम :दिनांक १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ पर्यंत मालमत्ता विभागातून रु.५.५४ कोटी वसुली आहे.

श्री.राजू शिंदे :सभापती यांनी पत्र दिले की, माझे विभागाचे अंतर्गत असलेल्या कर्मचाऱ्यास काम सांगू नये. त्यांनी त्यांचे विभागात रूजू व्हावे. तसेच मुख्य लेखापरीक्षक यांनी पत्र काढले की, लेखापरीक्षक विभागात कर्मचारी कमी असल्याने तात्काळ रूजू व्हावे. संपूर्ण अधिकार स्थायी समिती व जीबीचा आहे. ६७-३ ब काय आहे? वाचून दाखवावे. मा.आयुक्तांनी आजच पत्र काढले. महावीर पाटणी विषयी (वाचून दाखवितात) चुकीची ऑर्डर काढली आहे. स्थायी समितीच्या अधिकारावर गदा आली आहे. ६८-२ व ६९-१ काय आहे? आमचे अधिकार वापरात असेल तर हक्कभंग आणावा लागेल.

नगर सचिव :(६७-३ ब नियम वाचून दाखवितात.)

श्री.राजू शिंदे :या विभागाचे कर्मचारी यांना काम द्यायचे असेल ते स्थायी समिती व सर्वसाधारण सभेचे अधिकार आहे. २४ तासाच्या आत रूजू झाले नाही. मा.सभापती आदेश पाळले जात नाही. हे योग्य नाही जे आदेश मा.आयुक्तांनी काढले ते रद्द करावे. खर्च करणार व तपासणी एकच व्यक्ती असू शकत नाही. श्री.पाटणी यांना मूळ पदावर पाठवावे ते जात नसेल तर कार्यवाही करावी. नसता हक्कभंग प्रस्ताव आणावा.

श्रीमती सायरा बानो :सभागृहात जे प्रश्न मांडले जातात त्याबाबत भुमिका स्पष्ट असावी. ठेकेदाराचे बील दिले जात नाही. पार्ट पेमेंट द्यावे.

मा.महापौर :बीओटीच्या प्रकल्पाबाबत महापौर दालनात बैठक घेणार आहे. वसुलीबाबत तसेच स.श्री.बल्लाळ यांना लेखी कळवावे.

मा.महापौर :मोबाईल टॉवर्सचा विषय महत्वाचा आहे. मा.न्यायालयाचे निर्देशाचा फायदा घेऊन ते परवानगी घेत नाही म्हणुन उत्पन्न कमी येते. मालमत्ताच्या बाबत रजिस्ट्री कार्यालयात रजिस्ट्री होतात. माहिती घ्यावी. व्यापारी संकुलाचे मोठे उत्पन्न अपेक्षीत आहे. मालमत्ताचे सर्व्हेक्षण केले. किती वसुली झाली? नळ किती आहे? कमर्शियल किती? माहिती घ्यावी. मनपाच्या मालमत्ता किती? भोगवटा प्रमाणपत्र किती लोक घेतात? वार्ड कार्यालयात कर भरणारे कर धारक यांना सन्मानपुर्वक वागणूक मिळाली. मालमत्ता विभागाची वसुली कमी आहे. दर महिन्याला वसुलीचा तक्ता दिला जावा. ठेकेदारांना किती बील देता येऊ शकतो ते मा.आयुक्तांनी बघून घ्यावे. सर्व माहिती मा.आयुक्त देतील.

मा.आयुक्त :विकास कामाचे बील द्यावे व त्यानुसार वसुलीही झाली पाहिजे. अशी चर्चा चालू आहे. १८ वर्षापासून प्रशासकीय सेवेत काम करतो. लोकांचे हित व कायद्याच्या चौकटीत राहून काम करण्याचा प्रयत्न केला. संविधानानुसार चांगले जे काम करता येईल ते केले पाहिजे. व्यक्तीगत पध्दतीने काम करण्याचा मानस नसतो. सभागृहाच्या मौलिक सुचना महत्वाच्या असतात. वसुलीसाठी प्रयत्न करतो. कर भरणे प्रत्येक नागरीकांची जबाबदारी असते. आपण सेवेला

प्राधान्य देतो. सर्वांनी यासाठी प्रयत्न केले पाहिजे. सेवा देतो टॅक्सही भरला पाहिजे. जे मोठे कर दाते आहे त्यांचेवर कार्यवाही केली पाहिजे असे धोरण असावे. वसुली करणेचे काम सोपे असावे. मालमत्ता कर ऑनलाईन घेतो. स्मार्ट सिटी अंतर्गत ई-गव्हरर्नसच्या नावाखाली प्रत्येक विभागाच्या कामाचे सुसुत्रीकरण करण्याचे काम हाती घेतले आहे. एमएसआयचे टेंडरही लवकरच होईल त्यानुसार मोबाईल लॅब व इतर हे सर्व केले पाहिजे. इतर शहरामध्ये केले आपण प्रयत्न करतो आहे. १७-१८ मध्ये रु.७३ कोटी रस्त्यावर खर्च करू शकलो. या वर्षी रु.१०० कोटी खर्च करू शकतो. परंतु रु.५० कोटी खर्च करून रु.८८ कोटीचे बीले पडून आहे. रु.२०९ कोटीचे बीले थकीत आहे. अनावश्यक खर्च कमी करणे, बजेटप्रमाणे जे ठरले त्यानुसार खर्च व्हावे. १२० गार्डन आहे. ३० गार्डन मोठे आहे. तेथील गार्डन सुधारणा झाली पाहिजे. सर्व प्रोसेसला उशीर होतो म्हणुन तेथीलही काम झाले नाही. वार्डातील कामे व पुर्ण शहरातील कामे यांचा नियोजन करावे लागेल. एकंदरीत योजनेचा विचार केला पाहिजे. पुढील बजेटमध्ये योग्य ते बजेट करणे अपेक्षीत असावे. कर्मचारी, अधिकारी कमी आहेत. एनजीपीकडून अधिकारी मागविले दिले नाहीत. अनेक कमी कर्मचारी काम करतात. शासनाकडूनही अधिकारी आले पाहिजे. ती पदे आपण भरू शकत नाही. अनेक महत्वाचे खाते आहेत. कराबाबत आकडे सांगितले. वसुलीसाठी प्रयत्न केले पाहिजे. मागिल वर्षापेक्षा आज घडीला मालमत्ता कर रु.२८ कोटी जास्त आहे. पाणीपट्टी वसुली रु.२८.२२ कोटी, नगर रचनाची वसुली रु.४९ कोटी, मालमत्ताची वसुली रु.३.४० कोटी आहे. वसुली वाढीव आहे. आपण प्रयत्न केले पाहिजे. रोल-मॅप देण्याची सुचना केल्या. त्यानुसार कार्यवाही होईल. ९ झोनसाठी पथक केले. त्यांना आठवड्याचे व वेगळे टारगेट दिले. याचा आढावा घेत आहे. कमी काम जेथे होते त्याबाबत कार्यवाही केली. वसुली केली नाही म्हणुन जनसंपर्क अधिकारी यांना निलंबीत केले काहीचे वेतनवाढ थांबविली. दररोज किती वसुली होते त्याची माहिती येते.

रि-सर्व्हे बाबत माझेकडे माहिती येते. डि-स्प्युट मॅटरबाबत कार्यवाही करण्याचे काम चालू आहे. कर अदालत अंमलबजावणी करता येईल. अभय योजना राबविली. जास्त लाभ होत नाही. जे कर भरत नाही त्यांना फारशी सुट देणे योग्य नाही. परत त्याबाबत धोरण निश्चित केले जावे. जास्त सुट देणे योग्य नाही. सर्व्हेमध्ये अर्धवट काम झाले. आता मनपाचे कर्मचारी सर्व्हे करीत आहे. २.२० मालमत्ता रेकॉर्डवर आहे. त्या तुलनेत कमर्शियल नळ असायला पाहिजे हे मत योग्य आहे. १.१४ मालमत्ताचे सर्व्हे केला. २० हजार नवीन प्रॉपर्टी आढळल्या. असेसमेंट करणारे लोक आहे. आढावा घेतला. जो सर्व्हे होतो त्याचे तात्काळ असेसमेन्ट करीत आहे. प्रत्येक इमारतीचे मोजमाप करून त्यात किती खोल्या आहेत? वापरात किती आहेत? हे सर्व पाहावे लागते. सर्व्हे केलेले मी स्वत: चेक करणार आहे. रोल सर्व्हे करण्याचे काम करतो आहे. टेंडर डॉक्युमेंट तयार केले. जोपर्यंत पुर्ण कॉम्प्युटराईज्ड होत नाही तोपर्यंत मॅन्युअल सिस्टममध्ये प्रॉब्लेम येतो. मोबाईल टॉवर्स, शैक्षणिक संस्था असेल व

कोर्ट प्रकरणात काही मिळकतीचा वाद असेल याबाबत ज्या सुचना झाल्या त्यानुसार कार्यवाही होईल. दोन्ही अधिकारी येथे आज नाही. श्री.भालसिंग व श्री.पाटणी यांनी वसुलीमध्ये लक्ष घालावे. मोठे शासकीय थकबाकीदार आहेत. एमएसईबी कडे रु.१२ कोटी एलबीटी थकबाकी यायची होती. स्थायी समितीने ते माफ करावे असे म्हटले तर शासनाकडे पाठपूरावा करावा लागेल. कारण एमएसईबीने मनपाला पैसे भरले नाही म्हणुन नोटीस देतात. मा.कोर्टात हजर रहावे लागते. शाळा इमारतीचे शासनाकडून रु.८३ कोटी येणे आहे. करमणूक कर रु.२१ कोटी येणे आहे. प्रयत्न करीत आहे. मालमत्ता विभागाची रु.५ कोटी वसुली झाली होती. सर्व काम केले तर रु.२०-४० कोटी वसुली होईल. निर्णय घ्यावे लागेल. व्यवसाय परवानासाठी ठराव ठेवला होता, घेतला नाही. तो मंजूर झाला. तर रु.४ कोटीचे उत्पन्न येईल. आठवडी बाजार सक्षम करून ऑक्शन करून अपेक्षीत उत्पन्न येईल पार्कींगचे धोरण निश्चित करावे लागेल. सर्व्हे करावा लागेल. समिती पार्कींगसाठी नेमली होती. प्रारूप धोरण केले. प्रशासकीय ठराव येईल. नाट्यगृहाचा चांगला वापर कसा करता येईल? काम करायला पाहिजे होते. व्यापारी संकूल आहे. बीओटी प्रकल्प आहे. विकसीत करता येईल. काही दुकानाचे भाडे मिळाले नाही. रिटेंडर करायचे आहे. होर्ल्डींगचे धोरण निश्चित करावे लागेल. रेट काय असावे? सर्व्हे करुन मोठे उत्पन्न येऊ शकते. मालमत्ता विभागात कर्मचाऱ्यांची कमतरता पडली आहे. नोंद घेणे रेन्ट कधी संपला ते लक्षात आले पाहिजे. शासनाकडून अधिकारी मागितले लवकरच मिळतील. पाण्याचा विषय आहे. एलईडी प्रकरण आहे त्यामूळे कामावर परिणाम झाला आहे. या सर्व विषयाचा आढावा ६ दिवसात घेतला जाईल. जुन्या काळात काही निर्णय झाले सुधारणा करावी लागेल.

श्री.राजेंद्र जंजाळ :एलईडी लाईट आज लावले की उद्या बंद होतात. रिप्लेस करतात. ५० लाईट बंद झाले तर स्टॉक नाही. अनेक ठिकाणी लाईट बंद आहे. असे होत असेल तर प्रशासनाने कार्यवाही केली पाहिजे. कंपनीचे अधिकारी आले आहे खुलासा घ्यावा. श्री.खमर, एचओडी सभेच्या दिवशी गैरहजर राहतात. हे योग्य नाही. एलईडीच्या बाबतीत वॉरंटी व गॅरंटी व रिप्लेसमेन्ट बाबत काय धोरण आहे? खुलासा करावा.

मा.आयुक्त :संबंधीत अधिकारी यांनी नोंद घ्यावी. मी स्वत: या विषयावर आढावा घेतो. पाणी वसुलीबाबत खरच प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. खूप मोठ्या प्रमाणात अनधिकृत नळ आहे. श्री.कोल्हे, श्री.पानझडे यांचेकडे काम देतो आहे. रेग्यूलाईज करण्यावर भर राहिल, उत्पन्न मिळेल. नगररचना विभागाच्या बाबतीत ज्या सुचना दिल्या कार्यवाही होईल. आणखी जास्त काम केले जाईल. सध्या ऑनलाईन बीपीएमए सिस्टम केले. भविष्यात ते महत्वाचे आहे. जो अर्ज करत नसेल अशाच्या इमारती किती आहे? त्याची माहिती घेत आहोत. ३५०० इमारतीचे परवानगीपेक्षा जास्त बांधकाम केले असे आढळले आहे. यादी करण्याच्या सुचना केल्या. सर्वांना नोटीस देऊन कार्यवाही केली जाईल. ६७८ लोकांना नोटीस दिल्या. सर्वांना नोटीसा पाठविल्या जाईल. उतरत्या क्रमांकात

घेऊन कार्यवाही करू. टी.पी.विभागाची वसुली रु.४९ कोटी आहे. रु.२०० कोटी मिळाले पाहिजे. ज्या सुचना केल्या त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

मा.महापौर :ठेकेदाराकडून जी २% सेक्युरिटी डिपॉजीट म्हणुन महापालिकेकडे अनामत रक्कम घेतो. त्या बाबतीत धोरण निश्चित करण्यात येते की, ठेकेदारांच्या बीलामधून/देयकामधून सदरील अनामत रक्कम वजा करण्यात यावी. यातील मधला मार्ग असा की, ज्यावेळी ठेकेदार निविदा भरतात त्यावेळी ते १% रक्कम जमा करतात. ती १% रक्कम त्यांच्या देयकांमधून वजा करण्यात यावी. या अटीवर त्या ठेकेदाराकडून त्यांची संमती घेऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावेत. श्री.पानझडे, शहर अभियंता, श्री.केंद्रे, मुख्य लेखाधिकारी, श्री.डी.पी.कुलकर्णी, उपआयुक्त (सिडको), श्री.कोल्हे, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) तसेच श्री.काझी, कक्ष प्रमुख तांत्रिक व सर्व विभागप्रमुख यांनी या आदेशाचे पालन करावे. अशी जी प्रकरणे असतील ती निकाली काढावीत व संबंधीत ठेकेदारांना कार्यादेश देण्यात यावे.

ठेकेदाराना देयके द्यावे. पाणीपुरवठ्याच्या संचिका मंजूर कराव्यात. नो-नेटवर्क एरियामध्ये सुध्दा काम करावे. ठराव नामंजूर केला आहे. निविदा प्रक्रिया पुर्ण करावी. पाण्याचे उपलब्धतेनुसार काम करावे. मालमत्ता कर, नगर रचना परवानगी असेल कम्प्लीशन असेल पाणीपट्टी वसुली, होर्डींग, आठवडी बाजार, मनपाच्या मालमत्ता असेल व्यापारी संकूल असेल पार्कींगचा विषय असेल प्रशासनाने खुलासा केला. खर्च व उत्पन्न याचा ताळमेळ घालणे महत्वाचे आहे. नवीन मालमत्ता सर्व्हे, कर लावणे व डिमांड नोटीस देणे कार्यवाही करावी. ४७-४८ दिवस वसुलीसाठी आहे. सुट्टीमध्ये वसुलीचे काम करावे. कर आदालत घ्यावे. डिसप्यूट मॅटर असेल निर्णय घ्यावा. वसुलीसाठी पथक तयार करावे, थकबाकीची रक्कम वसुलीकडे लक्ष द्यावे. ज्यांचेकडे रु.१ लक्षपेक्षा जास्त थकबाकी आहे त्याची यादी करावी. वसुली करावी. वसुली करतांना सदस्यांना माहिती दिली जावी. दर महिन्याला उत्पन्न व खर्चाचा आढावा प्रत्येक बैठकीच्या वेळी द्यावा.

श्री.राजू शिंदे :सिडको, एमआयडीसी व म्हाडाची मिळकत खरेदी-विक्री होते तेव्हा मनपाची एनओसी असल्या शिवाय हस्तांतरीत होऊ नये. असे त्या विभागाला पत्र देऊन कळविण्यात यावे.

मा.महापौर :रजिस्ट्री कार्यालया अंतर्गत खरेदी विक्री होते. त्या विभागाला राज्याचे धोरण निश्चित करावे लागेल. तो विषय शहरा पूरता नाही तसा पाठपुरावा शासनाकडे करून ज्या ठिकाणी मालमत्तेची एनओसी आवश्यक तेथे अशी कार्यवाही करावयाची मागणी करावी लागेल. महावितरणाने सुध्दा मनपाची मालमत्ता कर भरलेला असल्या शिवाय एनओसी देऊ नये. प्रशासनाने हा नियम लागू करून घ्यावा. शाळा भाडे शासनाकडे आहे ते मागवावे. शासकीय कार्यालयाकडून जी वसुली येणे बाकी आहे ती करावी. कमर्शियल मिळकतीच्या बाबतीत नियोजन करावे. इल्लिगल नळ शोधावे. कमर्शियल किती आहे शोध घ्यावा. जाहिरात फलक व गाळे उत्पन्न किती येते? नियमानुसार भाडे वसुल करावे. धोरण

निश्चित करावे. बांधकाम परवानगी देणे, बेटरमेन्ट चार्जेस लावणे, जे पुन्हा आले नाही त्यांना नोटीस द्यावी, कम्प्लीशन द्यावे. वापर बंद करता येतो का ते बघावे. टॉवर्स बाबतीत कार्यवाही करावी. धोरण निश्चित करावे. ३१ मार्च पर्यंत कार्यवाही करावी. मोबाईल टॉवर्स बाबत धोरण निश्चित करायचे सांगितले त्याची कडक कार्यवाही करावी. शासकीय कार्यालयाकडील कर वसुल करावा. मायक्रोप्लॅन तयार करावा. ३१ मार्च पर्यंत चांगली वसुली करावी. श्री.पाटणी यांचे बाबतीत जो मा.आयुक्तांनी निर्णय घेतला त्याबाबत सर्व कायद्याच्या चौकटीत राहून कार्यवाही मा.आयुक्तांनी करावी.

श्रीमती सिमा चक्रनारायण:माझे वार्डातील कु.अंकिता शेजवळ ही मोकाट कुत्र्याने चावा घेतल्याने जखमी झाली. तेथे मांस विक्री होते. कुत्र्यांचे प्रमाण जास्त आहे. मोकाट कुत्र्यामूळे हा प्रकार घडला. सदरील मुलीला आर्थीक मदत रु.१ लक्ष द्यावे.

मा.महापौर :रु.१ लक्ष महापौर सहाय्यता निधीतून देण्याची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक ८९७:-** **(कार्यकारी अभियंता-ड्रेनेज विभाग)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दि.१९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दि.१९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या आढाव्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८९८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७३ रमानगर अंतर्गत श्री.मिसाळ यांचे किराणा दुकाना शेजारील रहिवासी विमलबाई प्रभाकर दाभाडे वय ५२ वर्ष यांचे घराशेजारील भिंत पडल्यामुळे राहत्या घरी त्यांचे दु:खद निधन झाले आहे. त्या अनुषंगाने मा.महापौर आपत्कालीन निधी अंतर्गत रक्कम रु.०५.०० लक्षची आर्थिक मदत म्हणुन निधी देण्यात यावा.

करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती विजया संजय बनकर **अनुमोदक:-**श्रीमती शितल विरभद्र गादगे

मा.महापौर :रु.०५ लक्ष देण्याची कार्यवाही करावी. विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७३ रमानगर येथील रहिवासी यांच्या घराशेजारील भिंत पडल्यामुळे मयत झालेल्या विमलबाई प्रभाकर दाभाडे, वय ५२ वर्ष यांच्या कुटूंबीयांना मा.महापौर आपत्कालीन निधी अंतर्गत रु.०५ लक्षची आर्थिक मदत देण्याची कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८९९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०६, कांचनवाडी-नक्षत्रवाडी प्रभागामध्ये ६०% अल्पसंख्यांकाची वसाहत असुन प्रभागामध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी रु.२ कोटी निधीची आवश्यकता आहे. कांचनवाडी-नक्षत्रवाडी हा अल्पसंख्यांकांचा स्लमभाग घोषित असुन या वस्ती मध्ये

कुठलीही सुविधा नसल्याने या वार्डात नागरी सुविधा पुरविण्यासाठी अल्पसंख्यांकाच्या वस्ती अंतर्गत १) कांचनवाडी-नक्षत्रवाडी अल्पसंख्यांक अंतर्गत भागात सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करण्यासाठी रु.८० लाख २) वार्ड अंतर्गत कब्रस्तान विविध कामे व दुरुस्ती बांधकाम करण्यासाठी रु.३० लाख ३) वार्ड अंतर्गत विविध ठिकाणी लाईट विद्युत पोल फिटींग सहित विद्युत व्यवस्था करण्यासाठी रु.५० लाख ४) विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची लाईन टाकण्यासाठी रु.४० लाख. रस्ते, ड्रेनेज लाईन बांधणे या कामासाठी निधी मिळण्याकरीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती विमलताई जनार्धन कांबळे **अनुमोदक:-**श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०६ कांचनवाडी-नक्षत्रवाडी या अल्पसंख्यांक बहुल भागात १) कांचनवाडी-नक्षत्रवाडी अल्पसंख्यांक अंतर्गत भागात सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करण्यासाठी रु.८० लाख, २) वार्ड अंतर्गत कब्रस्तान विविध कामे व दुरुस्ती बांधकाम करण्यासाठी रु.३० लाख, ३) वार्ड अंतर्गत विविध ठिकाणी लाईट विद्युत पोल फिटींग सहित विद्युत व्यवस्था करण्यासाठी रु.५० लाख, ४) विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची लाईन टाकण्यासाठी रु.४० लाख रस्ते, ड्रेनेज लाईन बांधणे या नागरी सुविधा पुरविण्याच्या कामांसाठी रु.२.०० कोटी निधी मिळण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०६, कांचनवाडी प्रभागामध्ये ६०% दलित वसाहत असुन या परिसरात मोठी खुली जागा आहे. या जागेत थोर महापुरुषांचे पुतळे आहे, त्यामुळे येथील नागरिकांना काही सामाजिक कार्य करण्यासाठी चांगले सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी आपल्या महानगरपालिकेला एक चांगले उत्पन्न साधन व समाजासाठी उपक्रम राबविण्यासाठी व नव तरुण वर्गाला व ज्येष्ठ नागरिकांना व्यायाम शाळेसाठी उपयोग होईल भविष्यात नागरीकांना किंवा लग्न कार्य करण्यासाठी या कांचनवाडी परिसरात खुप मोठी अशी खुली जागा आहे ही जागा मागील १५ ते २० वर्षापासुन सहान पडली आहे या जागेवर येथील स्थानिक नागरिकांना या जागेचा उपयोग होईल या करीता मा.महापौर साहेबांनी या भागातील नागरिकांच्या सुविधासाठी समाज मंदिर व सामाजिक सभागृह बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावे.

करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती विमलताई जनार्धन कांबळे **अनुमोदक:-**श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे

श्री.राजू शिंदे :सर्व वार्डाला जेथे दलित वस्ती आहे अशा सर्व वार्डात समान निधी मिळाला पाहिजे अशी कार्यवाही करावी.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०६, कांचनवाडी या दलित वसाहतीमध्ये परिसरातील मनपाच्या सहान जागेवर नागरिकांच्या सुविधेसाठी समाज मंदिर व सामाजिक सभागृह बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९०१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील माझ्या वॉर्डातील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधा करीता बदलण्यात यावे.

| पान क्रमांक व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| झोन-१ स्पील पान क्र.२१ अ.क्र.१४० आर्थिक तरतुद रु.१० लक्ष. | वॉर्ड क्र.२१ कबाडीपुरा अंतर्गत तीन दर्गा समोर काँक्रीटींग करणे. आर्थीक तरतुद रु.१० लक्ष. | वॉर्ड क्र.२१ मधील पंचकुआ किलेअर्क येथे सामाजिक सभागृह बांधणे या कामासाठी सदरील आर्थिक तरतुद रु.१० लक्ष वळती करणे. |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती परवीन कैसर खान **अनुमोदक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील वॉर्ड क्र.२१ येथील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| झोन-१ स्पील पान क्र.२१ अ.क्र.१४० आर्थिक तरतुद रु.१० लक्ष. | वॉर्ड क्र.२१ कबाडीपुरा अंतर्गत तीन दर्गा समोर काँक्रीटींग करणे. आर्थीक तरतुद रु.१० लक्ष. | वॉर्ड क्र.२१ मधील पंचकुआ किलेअर्क येथे सामाजिक सभागृह बांधणे या कामासाठी सदरील आर्थिक तरतुद रु.१० लक्ष वळती करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९०२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील माझ्या वॉर्डातील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधा करीता बदलण्यात यावे.

| पान क्रमांक व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| झोन-३ स्पील पान क्र.६५ अ.क्र.०५ आर्थिक तरतुद रु.२५ लक्ष. | वॉर्ड क्र.६१ अल्तमश कॉलनी आझाद चौक ते मध्यवर्ती जकात नाका रस्ता दुभाजक बांधणे. आर्थीक तरतुद रु.२५ लक्ष. | वॉर्ड क्र.६१ अल्तमश कॉलनी आझाद चौक ते औरंगाबाद हॉटेल पर्यंतच्या रस्त्यावरील फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी सदरील आर्थिक तरतुद रु.२५ लक्ष वळती करणे. |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-**श्री.कादरी जमीर अहेमद

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६१, मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| झोन-३ स्पील पान | वॉर्ड क्र.६१ अल्तमश कॉलनी | वॉर्ड क्र.६१ अल्तमश कॉलनी आझाद |

| | | |
|---|---|---|
| क्र.६५ अ.क्र.०५ आर्थिक तरतुद रु.२५ लक्ष. | आझाद चौक ते मध्यवर्ती जकात नाका रस्ता दुभाजक बांधणे. आर्थीक तरतुद रु.२५ लक्ष. | चौक ते औरंगाबाद हॉटेल पर्यंतच्या रस्त्यावरील फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी सदरील आर्थिक तरतुद रु.२५ लक्ष वळती करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९०३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६१ मध्ये अल्तमश कॉलनी येथे मनपा तर्फे एन.यु.एल.एम.अंतर्गत बांधण्यात आलेल्या आरोग्य केंद्रास आतापर्यंत कोणाचे नाव देण्यात आलेले नाही. वॉर्डातील रहिवासीयांच्या मागणीनुसार वार्डातील ज्येष्ठ नागरीक तथा समाजसेवक स्व.हाजी गुलाम जिलानी जागीरदार यांचे नाव सदरील मनपा आरोग्य केंद्रास देण्यात यावे.

करीता, वॉर्ड क्र.६१ मधील एन.यु.एल.एम.अंतर्गत बांधण्यात आलेल्या आरोग्य केंद्रास वॉर्डातील ज्येष्ठ नागरीक तथा समाजसेवक स्व.हाजी गुलाम जिलानी जागीरदार यांचे नाव सदरील मनपा आरोग्य केंद्रास देण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-**श्री.कादरी जमीर अहेमद
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६१ मधील एन.यु.एल.एम.अंतर्गत बांधण्यात आलेल्या आरोग्य केंद्रास वॉर्डातील ज्येष्ठ नागरीक तथा समाजसेवक स्व.हाजी गुलाम जिलानी जागीरदार यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९०४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.खान जावेद शहजाद, प्रा.शिक्षीका, भिवंडी महानगरपालिका हे रहेमानिया कॉलनी किराडपुरा औरंगाबाद येथील रहिवासी असून संबंधीतांचे वडील हे वयोवृध्द असून विविध आजाराने ग्रस्त व नेहमी आजारी असतात. तसेच त्यांना ५ वर्षाचा मुलगा व ६ महिन्याची मुलगी आहे. त्यामुळे यांना औरंगाबाद ते भिवंडी येथे येणे-जाणेसाठी ही फार त्रास होत असतो. संबंधीतांनी भिवंडी महानगरपालिकेत औरंगाबाद महानगरपालिकेत बदलीसाठी विनंती अर्ज केलेला होता. संबंधीत मनपाने त्यांना सोडण्याची तयारी दर्शविल्याचे पत्र क्र.८३८ दि.१८.०७.२०१८ रोजी दिलेले आहे. सदरील माहिती संबंधीतांनी मनपा शिक्षण विभागात दि.२७.०७.२०१८ रोजी सादर केलेली आहे.

करीता या बाबत सहानुभूतीपुर्वक विचार करून जिल्हा परिषद शिक्षकांना नगरपालिका, नगर परिषद किंवा महानगरपालिकेमध्ये वर्ग करण्याबाबतचा महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक जिपब-४८१७/प्र.क्र.२८०/आस्था-९ दिनांक २९ जुन २०१७ अन्वये दोन्ही विभागात परस्पर सहमती होत असेल तर अर्जदारास कार्यमुक्त करता येईल. अशी तरतुद असल्याने श्री.खान जावेद शहजाद प्रा.शिक्षीका यांची सेवा भिवंडी महानगरपालिकेतून औरंगाबाद महानगरपालिकेत सेवेत सामावून घेण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अजीम अहेमद खान **अनुमोदक:-**श्री.जमीर अहेमद कादरी
मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिवंडी महानगरपालिका येथे कार्यरत असलेल्या रहेमानिया कॉलनी, किराडपुरा, औरंगाबाद येथील रहिवासी श्री.खान जावेद शहजाद, प्रा.शिक्षीका यांची आंतरजिल्हा बदली अंतर्गत नियमाप्रमाणे भिवंडी महानगरपालिकेतून औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९०५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतर्फे शहरातील स्ट्रीट लाईटचे देयक कमी करण्याच्या उद्देशाने शहरात एलईडी लाईट लावण्याचे कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले आहे जेणे करून विद्युत देयकात कपात करणे शक्य होईल आणि महानगरपालिकेच्या खर्चावर नियंत्रण येईल. त्यामुळे संबंधीत ठेकेदारातर्फे शहरात विविध ठिकाणी एलईडी लाईट फिटींग बसविण्यात आल्या आहेत. ज्या उद्देशाने एलईडी लाईट लावण्यात आले त्याचा परिणाम विद्युत देयकात दिसणे आवश्यक होते. परंतु तसे झालेले दिसून येत नाही. त्यामुळे शहरामध्ये तुरळक तुरळक एलईडी लावण्यात आल्यामुळे एकही प्रभाग पुर्णपणे एलईडी होऊ शकला नसल्याने सर्वच प्रभागात आजही कॉम्प्रेसिव्ह मार्फत लाईटचे काम सुरू असून त्यामुळे महानगरपालिकेला एलईडी व कॉम्प्रेसिव्ह या दोघांच्याही देयकाचा आर्थिक भार सोसावा लागत आहे. कॉम्प्रेसिव्हचे कर्मचारी आठवड्यातून एकदा वॉर्डात काम करतात तसेच त्यांच्या कामाची वेळ सकाळी ११ ते दुपारी ०४ वाजेपर्यंत असते. यात लंच टाईम पकडून ते एका दिवसात जास्तीत जास्त १०-१२ फिटींग लावतात म्हणजे महिन्यात एकूण ५० फिटींग लावल्या जातात त्याच हिशोबाने त्यांना ५० फिटींगचेच देयक अदा करणे गरजेचे आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत असल्याने व मनपाचा उद्देश सफल होत नसल्याने एलईडी व कॉम्प्रेसिव्हचे देयक थांबविण्यात यावे व एक एक वॉर्डात एलईडीचे संपुर्ण काम पुर्ण करण्यात यावे. जेणे करून कॉम्प्रेसिव्हचे काम पुर्णत: बंद होईल आणि त्या वॉर्डातील विद्युत देयकात किती फरक पडला याचा अंदाज येईल. तसेच आतापर्यंत लावण्यात आलेले एलईडीचे हे ठरल्या प्रमाणे व ठरलेल्या ब्रँडच्या व ठरलेल्या वॅटच्या आहेत किंवा नाही? तसेच कंपनी ठरलेल्या कॉन्ट्रॅक्ट प्रमाणे काम करीत आहे किंवा नाही? याचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करून त्यांना देयक अदा करणे बाबत कार्यवाही करावी. तो पर्यंत देयक अदा करून नये.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ **अनुमोदक:-**श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी

मा.महापौर :थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करून कार्यवाही करावी. विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत प्रशासनाने थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करून योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९०६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील खालील कामामधील २५.०० लक्ष रुपये वळती करून प्रभागात आवश्यक असणारे दुसरे विकास कामे करणे बाबत रक्कम वळती करणे व लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रक्कम वळती करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली नविन कामे अंतर्गत अ.क्र.५३, जी.बी.आर. झोन क्र.०६, पान | १. प्रभाग क्रमांक ८९ अंतर्गत चिकलठाणा ते जुना बीडबायपास रोड शनिमंदिर चौक पर्यंत पोल |

| | | |
|---|---|---|
| | क्र.६३ वर प्रभाग क्र.८९ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणे. रु.७५.०० लक्ष | सहित एलईडी फिटींग लावणे. र.रु.२५.०० लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे **अनुमोदक:-**श्री.सिताराम इसराम सुरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८९ अंतर्गत सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील खालील कामामधील २५.०० लक्ष रुपये वळती करण्यास व लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रक्कम वळती करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली नविन कामे अंतर्गत अ.क्र.५३, जी.बी.आर. झोन क्र.०६, पान क्र.६३ वर प्रभाग क्र.८९ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणे. रु.७५.०० लक्ष | १. प्रभाग क्रमांक ८९ अंतर्गत चिकलठाणा ते जुना बीडबायपास रोड शनिमंदिर चौक पर्यंत पोल सहित एलईडी फिटींग लावणे. र.रु.२५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९०७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील वॉर्ड क्र.२१ मध्ये रहिवासीयांच्या सुविधेसाठी खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| अ.क्र.५८, स्पिल पान क्र.३२७ आर्थिक तरतुद रु.१५ लक्ष | वॉर्ड क्र.२१, कबाडीपुरा, तीन दर्गा पटनी चौक येथे हायमास्ट बसविणे बाबत | १. वॉर्ड क्र.२१, जामा मस्जिद समोर पेव्हर ब्लॉक बसविणे. आर्थिक तरतुद रु.१० लक्ष.<br>२. वॉर्ड क्र.२१, कबाडीपुरा, बुढ्ढीलेन अंतर्गत शहाजमाल दर्गा समोर व नौबद दरवाजा येथील नाल्यालगत संरक्षित भिंत बांधणे. आर्थिक तरतुद रु.०३ लक्ष.<br>३. वॉर्ड क्र.२१, कबाडीपुरा, बुढ्ढीलेन अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे. आर्थिक तरतुद रु.०२ लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती परवीन कैसर खान **अनुमोदक:-**श्रीमती तसनीम बेगम अब्दुल रऊफ

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील वॉर्ड क्र.२१ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| अ.क्र.५८, स्पिल पान क्र.३२७ आर्थिक तरतुद रु.१५ लक्ष | वॉर्ड क्र.२१, कबाडीपुरा, तीन दर्गा पटनी चौक येथे हायमास्ट | १. वॉर्ड क्र.२१, जामा मस्जिद समोर पेव्हर ब्लॉक बसविणे. आर्थिक तरतुद रु.१० लक्ष.<br>२. वॉर्ड क्र.२१, कबाडीपुरा, बुढ्ढीलेन अंतर्गत शहाजमाल दर्गा समोर व नौबद दरवाजा येथील नाल्यालगत संरक्षित भिंत बांधणे. आर्थिक तरतुद रु.०३ लक्ष. |

| | | |
|---|---|---|
| | बसविणे बाबत | ३. वॉर्ड क्र.२१, कबाडीपुरा, बुढ्ढीलेन अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे. आर्थिक तरतुद रु.०२ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९०८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात औद्योगिकदृष्ट्या उपयोगी असलेल्या व शहराच्या उद्योग व्यवसायास अर्थकारणास मोठा फायदा करून देणारे ॲडव्हान्टेज महाराष्ट्र एक्स्पो-२०२० दिनांक-९, १०, ११, १२ जानेवारी-२०२० या कालावधीत भरविण्यात येणार आहे. यामुळे राज्य व राज्याबाहेरील अंदाजे १ लाख व्यावसायीक प्रदर्शनाला भेट देतील व ३०० पेक्षा जास्त कंपन्या सहभागी होतील, त्यामुळे व्यवसायिकांना विविध प्रकारच्या व्यवसाय संबंधी संधी उपलब्ध होतील. त्यासाठी गरवारे स्टेडियम येथील मुख्य मैदान सोडून त्या सभोवतालची उर्वरित मोकळी जागा व मुख्य प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजुस असलेली मोकळी जागा विनाशुल्क उपलब्ध करून देण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक ९,१०,११,१२ जानेवारी-२०२० या कालावधीत भरविण्यात येणाऱ्या ॲडव्हान्टेज महाराष्ट्र एक्स्पो-२०२० या प्रदर्शनासाठी गरवारे स्टेडियम येथील मुख्य मैदान सोडून त्या सभोवतालची उर्वरित मोकळी जागा व मुख्य प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजुस असलेली मोकळी जागा नियमाप्रमाणे सदरील प्रदर्शनासाठी विनाशुल्क उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९०९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती शेख मलिहा तोफिक शेख तोफिक अहेमद या उपशिक्षिका, उर्दु प्राथमिक शाळा क्र.०७, नगर परिषद, अंमळनेर, जिल्हा जळगाव येथे कार्यरत असून त्यांचे मुळ गाव औरंगाबाद जिल्हा आहे. त्यांचे पती व सासु-सासरे त्यांची देखभाल करण्यासाठी मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियम क्र.४० व अधिनियम १९४७ मधील नियम क्र.२० कलमानुसार त्यांची बदली नगर परिषद उर्दु प्रा.शा.क्र.०७ अंमळनेर, जळगाव येथून एकतर्फी जिल्हा बदली अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिका प्राथमिक शाळेत बदली करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मनोज आसाराम बल्लाळ **अनुमोदक:-**श्रीमती प्रेमलता मिलींद दाभाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुळ औरंगाबाद येथील रहिवासी असलेल्या श्रीमती शेख मलिहा तोफिक शेख तोफिक अहेमद, उपशिक्षिका, उर्दु प्राथमिक शाळा क्र.०७, नगर परिषद, अंमळनेर, जिल्हा जळगाव यांची एकतर्फी जिल्हा बदली अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिका प्राथमिक शाळेत बदली करण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९१०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२६, एस.टी.कॉलनी येथील श्री.मुनीर साहेब यांच्या गल्लीत डांबरीकरण करणे. तरतुद रु.१० लक्ष Zone-03–Spill P.No.65

**या कामाऐवजी**

एस.टी.कॉलनी मस्जीद समोर कॉंक्रीट रस्ता तयार करणे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शेख नरगीस सलीम **अनुमोदक:-** श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२६, एस.टी.कॉलनी येथील श्री.मुनीर साहेब यांच्या गल्लीत डांबरीकरण करणेच्या कामाऐवजी (तरतुद रु.१० लक्ष Zone-03–Spill P.No.65) एस.टी.कॉलनी मस्जीद समोर कॉंक्रीट रस्ता तयार करण्याचे काम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९११:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१८-१९ चा अर्थसंकल्प पुस्तिकांत GBR-Zone-03–P.31, Sr.No.32-33 वर अनुक्रमांक

(१) वॉर्ड क्र.४४ अंतर्गत मकसुद कॉलनी येथे श्री.विखार भाई यांच्या घरापासून ते श्री.एकबाल भाई यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन टाकुन कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५ लाख (GBR-Zone-03–P.31, Sr.No.32)

**या कामाऐवजी**

वॉर्ड क्र.४४ अंतर्गत मकसुद कॉलनी येथे श्री.विखार भाई यांच्या घरापासून ते श्री.एकबाल भाई यांच्या घरापर्यंत कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५ लाख वळती करणे.

(२) वॉर्ड क्र.४४ अंतर्गत युनुस कॉलनी येथे श्री.रहिम भाई यांच्या घरापासून ते श्री.सलीम भाई (टॅक्सीवाले) यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन टाकुन कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५ लाख (GBR-Zone-03–P.31, Sr.No.33)

**या कामाऐवजी**

वॉर्ड क्र.४४ अंतर्गत युनुस कॉलनी येथे श्री.रहिम भाई यांच्या घरापासून ते श्री.सलीम भाई (टॅक्सीवाले) यांच्या घरापर्यंत कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५ लाख वळती करणे.

(३) वॉर्ड क्र.४४ अंतर्गत रविंद्रनगर येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.२५ लाख (GBR-Zone-03–P.31, Sr.No.34)

**या कामाऐवजी**

वॉर्ड क्र.४४ अंतर्गत रविंद्रनगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५ लाख वळती करणे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी

**अनुमोदक:-**श्री. जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४४ अंतर्गत खालील दर्शविल्याप्रमाणे विविध कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

(१) वॉर्ड क्र.४४ अंतर्गत मकसुद कॉलनी येथे श्री.विखार भाई यांच्या घरापासून ते श्री.एकबाल भाई यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन टाकुन कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५ लाख (GBR-Zone-03–P.31, Sr.No.32).

**या कामाऐवजी**

वॉर्ड क्र.४४ अंतर्गत मकसुद कॉलनी येथे श्री.विखार भाई यांच्या घरापासून ते श्री.एकबाल भाई यांच्या घरापर्यंत कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५ लाख वळती करणे.

(२) वॉर्ड क्र.४४ अंतर्गत युनुस कॉलनी येथे श्री.रहिम भाई यांच्या घरापासून ते श्री.सलीम भाई (टॅक्सीवाले) यांच्या घरापर्यंत ड्रेनेज लाईन टाकुन कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५ लाख (GBR-Zone-03–P.31, Sr.No.33)

**या कामाऐवजी**

वॉर्ड क्र.४४ अंतर्गत युनुस कॉलनी येथे श्री.रहिम भाई यांच्या घरापासून ते श्री.सलीम भाई (टॅक्सीवाले) यांच्या घरापर्यंत कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५ लाख वळती करणे.

(३) वॉर्ड क्र.४४ अंतर्गत रविंद्रनगर येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.२५ लाख (GBR-Zone-03–P.31, Sr.No.34)

**या कामाऐवजी**

वॉर्ड क्र.४४ अंतर्गत रविंद्रनगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीटींग करणे. र.रु.२५ लाख वळती करणेच्या कामास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९१२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, किराडपुरा ते आझाद चौक हा रोड श्री.सरदार खॉन यांच्या जागेतून गेलेला आहे. तसेच श्री.सरदार खॉन हे प्रतिष्ठीत व्यक्ती होते. तरी या रस्त्यावरील रॉयल शाळेसमोरील चौकास श्री.सरदार खॉन यांचे नाव द्यावे अशी लोकांची भावना आहे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-**श्री.खान इरशाद इब्राहीम **अनुमोदकः-**श्री.कादरी जमीर अहेमद, श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

मा.महापौर :श्री.अय्युब जहागीरदार माजी विरोधी पक्ष नेते यांनी या प्रस्तावाबाबत आक्षेप घेतला म्हणुन हा विषय नामंजूर करण्यात येतो.

**ठरावः-**

प्रस्तुत प्रस्ताव नामंजुर करण्यात आला.

**विषय क्रमांक ९१३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात मा.महापौर श्री.मराठवाडा स्तरीय बॉडी बिल्डींग स्पर्धा-२०१९ दिनांक २६ जानेवारी रोजी व्हावी. अशी शहरवासीयांची इच्छा आहे. सदरील स्पर्धा यशस्वीपणे आयोजनाची तयारी औरंगाबाद डिस्ट्रीक बॉडी बिल्डींग ॲण्ड फिझीक्स स्पोर्ट असोशिएशनचे पदाधिकाऱ्यांनी इच्छा व्यक्त केलेली आहे. सदरील स्पर्धा आयोजनासाठी संभावित रु.०४ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

तरी औरंगाबाद शहरात मा.महापौर श्री.मराठवाडा स्तरीय बॉडी बिल्डींग स्पर्धा-२०१९ स्पर्धा औरंगाबाद डिस्ट्रीक बॉडी बिल्डींग ॲण्ड फिझीक्स स्पोर्ट असोशिएशनातर्फे आयोजित करण्यास तथा येणाऱ्या संभावित खर्चास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जमीर अहेमद कादरी **अनुमोदक:-**श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात मा.महापौर श्री.मराठवाडा स्तरीय बॉडी बिल्डींग स्पर्धा-२०१९ स्पर्धा औरंगाबाद डिस्ट्रीक बॉडी बिल्डींग ॲण्ड फिझीक्स स्पोर्ट असोशिएशनातर्फे आयोजित करण्यास तथा येणाऱ्या संभावित खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९१४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील वॉर्ड क्र.२३ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे.

| पान क्र. व अ.क्र. | सन २०१८-१९ मधील लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| GBR-WARD-02-P.NO.26 | १) वॉर्ड क्र.२३ चेलीपुरा अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.१०.०० लाख |
| | २) वॉर्ड क्र.२३ काचीवाडा, मुर्गीनाला व शहागंज येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.१०.०० लाख |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती खान सायरा बानो अजमल खान **अनुमोदक:-**श्री.जमीर अहेमद कादरी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील वॉर्ड क्र.२३ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. व अ.क्र. | सन २०१८-१९ मधील लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| GBR-WARD-02-P.NO.26 | १) वॉर्ड क्र.२३ चेलीपुरा अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.१०.०० लाख |
| | २) वॉर्ड क्र.२३ काचीवाडा, मुर्गीनाला व शहागंज येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.१०.०० लाख |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९१५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी NUHM अंतर्गत आरोग्य केंद्राचे सुसज्ज बांधकामे झालेली आहे. सदरील आरोग्य केंद्र हे गोर-गरीब वसाहतीत बांधण्यात आल्याने या आरोग्य केंद्रात फक्त प्राथमिक उपचार केंद्र सुरु न करता या ठिकाणी गरोदर मातासाठी प्रसुती सेवा सुरु केल्यास गोर-गरीब नागरीकांना या ठिकाणी योग्य उपचार मिळुन त्यांना खाजगी रुग्णालयात होणारा आर्थिक त्रास सहन करावा लागणार नाही.

करीता, औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी NUHM अंतर्गत बांधण्यात आलेल्या आरोग्य केंद्रात प्रसुती सेवा सुरु करण्यास आणि त्यासाठी आवश्यक शल्य साहित्य (मशिनरीज्) खरेदी करण्यासाठी

आर्थिक तरतुद करण्यास तथा आवश्यक सर्व आरोग्य अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधीतांना आदेशीत करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कादरी जमीर अहेमद

**अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन,श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी NUHM अंतर्गत बांधण्यात आलेल्या आरोग्य केंद्रात प्रसुती सेवा सुरु करण्यास आणि त्यासाठी आवश्यक शल्य साहित्य (मशिनरीज्) खरेदी करण्यासाठी आर्थिक तरतुद करण्यास तसेच आवश्यक सर्व आरोग्य अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९१६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास योजना रस्ता रुंदीकरणात बाधीत मिळकत धारकांची पुनर्वसन करणेसाठी झाल्टा येथील शासकीय जमीनीमधील कमीत कमी १० एकर जागा महानगरपालिकेने मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मागणी करण्यात यावी. जेणे करून चम्पा चौक ते भवानी नगर, कैलास नगर, जालना रोड या रस्त्यामधील बाधीत मिळकत धारकांना यापूर्वीच्या लक्ष्मण चावडी ते एम.जी.एम. रस्ता रुंदीकरणात बाधीत मिळकत धारकांना मौजे हर्सुल येथील सर्व्हे क्र.२१६,२१७ येथे पुनर्वसन करून जागा देण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर वरील प्रमाणे विकास योजना रस्ता रुंदीकरणात बाधीत मिळकत धारकांचे पुनर्वसन करणेसाठी झाल्टा येथील शासकीय जमीन शासनाकडे मागणी करणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास योजना रस्त्याच्या रुंदीकरणात चम्पा चौक ते भवानी नगर, कैलास नगर, जालना रोड या रस्त्यामधील बाधीत मिळकत धारकांना यापूर्वीच्या लक्ष्मण चावडी ते एम.जी.एम. रस्ता रुंदीकरणात बाधीत मिळकत धारकांना मौजे हर्सुल येथील सर्व्हे क्र.२१६,२१७ येथे पुनर्वसन करून जागा देण्यात आली त्याच धर्तीवर या बाधीत मिळकतधारकांचे पुनर्वसन करणेसाठी झाल्टा येथील शासकीय जमीन मिळण्यासाठी शासनाकडे मागणी करणेसाठीचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९१७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जैन शिक्षण संस्था ही शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रम चालविणारी संस्था असून मागील २६ वर्षापासून शहरातील कुँवारफल्ली, राजाबाजार परिसरात डी.यु.जैन बालक मंदिर, पी.यु.जैन प्राथमिक विद्यालय व पी.यु.जैन माध्यमिक विद्यालय चालवते. संस्थेचा गोर-गरीब मुलांना शिक्षण देण्याचा मानस आहे. त्या करीता त्यांना शाळेच्या इमारतीची आवश्यकता आहे.करीता, न्यु उस्मानपुरा येथे मनपाद्वारे चालविली जाणारी प्राथमिक शाळेची इमारत (शाळा) भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर **अनुमोदक:-**श्री.सिताराम इसराम सुरे

श्री.गजानन बारवाल :२९ वर्षे कालावधीकरीता सदरील शाळेची इमारत देण्यात यावी. तसेच सदरील शालेय इमारतीचे भाडे निश्चित करतांना सिध्दशिघ्र गणकानुसार घसारा रक्कम (इमारतीचे वयोमान) गृहीत धरुन भाडे आकारणी करण्यात यावी.

मा.महापौर :स.सदस्य श्री.गजानन बारवाल यांनी केलेल्या सुचनेनुसार दुरूस्तीसह विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, यापुर्वी मनपाच्या इमारती भाडेतत्वावर देण्याचे धोरण निश्चित केले आहे त्या धोरणानुसार न्यु उस्मानपुरा येथे मनपाद्वारे चालविली जाणारी प्राथमिक शाळेची इमारत (शाळा) २९ वर्षे कालावधीकरीता जैन शिक्षण संस्थेस भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच भाडे निश्चित करतांना सिध्दशिघ्र गणकानुसार घसारा रक्कम (इमारतीचे वयोमान) गृहीत धरुन भाडे आकारणी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९१८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील खालील कामामधील र.रु.२५.०० लक्ष वळती करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत व रक्कम वळती करणे लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रक्कम वळती करावयाच्या कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात झोन अभियंता-६ अंतर्गत नवीन कामे अ.क्र.०१ जीबी आर झोन क्रमांक ०६ पान क्र.७० वर प्रभाग क्रमांक ८९ अंतर्गत बौध्दवाडा येथील मुख्य नाल्यावर ढापे टाकून दुरूस्ती करणे. रु.५०.०० लक्ष | १. प्रभाग क्रमांक-८९ अंतर्गत चिकलठाणा झेंडा चौक आणि कॅंब्रीज शाळे जवळील राजमाता जिजाऊ चौकात ट्रॅफिक सिग्नल लावणे. र.रु.२५.०० लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे **अनुमोदक:-**श्री.सिताराम इसराम सुरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८९ अंतर्गत सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील खालील कामासाठी र.रु.२५.०० लक्ष वळती करण्यास व लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| अ.क्र. | रक्कम वळती करावयाच्या कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात झोन अभियंता-६ अंतर्गत नवीन कामे अ.क्र.०१ जीबी आर झोन क्रमांक ०६ पान क्र.७० वर प्रभाग क्रमांक ८९ अंतर्गत बौध्दवाडा येथील मुख्य नाल्यावर ढापे टाकून दुरूस्ती करणे. रु.५०.०० लक्ष. | १. प्रभाग क्रमांक-८९ अंतर्गत चिकलठाणा झेंडा चौक आणि कॅंब्रीज शाळे जवळील राजमाता जिजाऊ चौकात ट्रॅफिक सिग्नल लावणे. र.रु.२५.०० लक्ष. |

**विषय क्रमांक ९१९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५० अंतर्गत नागरीकांची पत्रव्यवहार करतांना गैरसोय होत असून सदरील भागास खालीलप्रमाणे नावे देणे बाबत परिसरातील नागरीक वारंवार मागणी करीत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मोरे चौक ते अजंठा भवन | समद यार खान रस्ता |
| २. | लक्ष्मी कॉलनी दर्गा ते शेळके यांचे घर | अहमद यार खान रस्ता |
| ३. | मुख्य बसस्टॅन्ड ते रशीदमामू पुल | हसन यार खान रस्ता |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती नसरीन बेगम समद यार खान **अनुमोदक:-**श्री.जमीर अहेमद कादरी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५० अंतर्गत खालीलप्रमाणे रस्त्याला नावे देण्यास मंजुरी देण्यात येते.

१. मोरे चौक ते अजंठा भवन — समद यार खान रस्ता
२. लक्ष्मी कॉलनी दर्गा ते शेळके यांचे घर — अहमद यार खान रस्ता
३. मुख्य बसस्टॅन्ड ते रशीदमामू पुल — हसन यार खान रस्ता

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१६, भीमनगर, भावसिंगपुरा (दक्षिण) अंतर्गत सन २०१८-१९ मधील अर्थसंकल्प मंजुर असलेल्या कामांचे लेखाशिर्ष बदलण्यात यावे.

| अ. क्र. | मनपा अर्थसंकल्पामध्ये कामाचे नाव | अं.प. र.रु. | लेखाशिर्षक बदलल्यानंतर करावयाच्या कामाचे नाव | अं.प. र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा, भीमनगर दक्षिण अंतर्गत भावसिंगपुरा गाव ते नवयुग कॉलनी बुध्दविहारापर्यंत ५० फुट डी.पी.रोड कॉंक्रीटींग करणे बाबत. GBR झोन क्र.०१ अ.क्र.३६ पान क्र.०५ तरतुद रु.५० लक्ष | ५० लक्ष | वॉर्ड क्र.१६, गीतानगर व अजंठा हौ.सो.येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | २० लक्ष |
| | | | वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा गावठाण अंतर्गत व्यायाम शाळा बांधणे. | १० लक्ष |
| | | | वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा अजंठा हौ.सो. येथे खुल्या जागेत संरक्षित भींत बांधणे व विकसीत करणे. | १० लक्ष |
| | | | वॉर्ड क्र.१६ भावसिंगपुरा अंतर्गत गोल्डन सिटी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | १० लक्ष |
| २ | वॉर्ड क्र.१६ भावसिंगपुरा ते गीतानगर येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे. GBR झोन नं.०१ अ.क्र.०७ पान नं.१७ तरतुद रु.३० लक्ष | ३० लक्ष | वॉर्ड क्र.१६ भावसिंगपुरा भीमनगर अंतर्गत विविध विकास कामे करणे बाबत. | ३० लक्ष |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे — **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१६, भीमनगर, भावसिंगपुरा (दक्षिण) अंतर्गत सन २०१८-१९ मधील अर्थसंकल्प मंजुर असलेल्या कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | मनपा अर्थसंकल्पामध्ये कामाचे नाव | अं.प. र.रु. | लेखाशिर्षक बदलल्यानंतर करावयाच्या कामाचे नाव | अं.प. र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा, | ५० | वॉर्ड क्र.१६, गीतानगर व अजंठा हौ.सो.येथे | २० लक्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | भीमनगर दक्षिण अंतर्गत भावसिंगपुरा गाव ते नवयुग कॉलनी बुध्दविहारापर्यंत ५० फुट डी.पी.रोड कॉंक्रीटींग करणे बाबत. GBR झोन क्र.०१ अ.क्र.३६ पान क्र.०५ तरतुद रु.५० लक्ष | लक्ष | विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | |
| | | | वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा गावठाण अंतर्गत व्यायाम शाळा बांधणे | १० लक्ष |
| | | | वॉर्ड क्र.१६, भावसिंगपुरा अजंठा हौ.सो. येथे खुल्या जागेत संरक्षित भींत बांधणे व विकसीत करणे. | १० लक्ष |
| | | | वॉर्ड क्र.१६ भावसिंगपुरा अंतर्गत गोल्डन सिटी येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | १० लक्ष |
| २ | वॉर्ड क्र.१६ भावसिंगपुरा ते गीतानगर येथे पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे. GBR झोन नं.०१ अ.क्र.०७ पान नं.१७ तरतुद रु.३० लक्ष | ३० लक्ष | वॉर्ड क्र.१६ भावसिंगपुरा भीमनगर अंतर्गत विविध विकास कामे करणे बाबत. | ३० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०, रोजाबाग-भारतमातानगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामांचे लेखाशिर्षक बदलण्यात यावे.

| अ.क्र | जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|---|
| १. | १) वॉर्ड क्र.१० रोजाबाग-भारतमातानगर विठ्ठल मंदिराजवळ आर.सी.सी. कमान उभारण्या बाबत. झोन ४ स्पिल पेज न.१२७ सि.नं.१३ रु.५ लक्ष<br>२) वॉर्ड क्र.१० अंतर्गत शिवछत्रपती नगर येथील आतल्या रस्त्यावर आर.सी.सी. कमान बांधण्या बाबत. झोन ४ स्पिल पेज नं.१२७ सि.नं.१४ रु.७.२५ लक्ष असे एकुण रु.१२.२५ लक्ष. | १) वॉर्ड क्र.१० अंतर्गत शिवछत्रपती नगर येथील श्री.ढोरमारे ते श्री.हिलाल पटेल यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता तयार करणे. रु.१२.२५ लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१० रोजाबाग अंतर्गत इदगाह मैदान येथे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. झोन ४ स्पिल पेज नं.१२१ सि.नं.१३२ रु.४० लक्ष. | २) वॉर्ड क्र.१० रोजाबाग अंतर्गत इदगाह मैदान येथे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. रु.१० लक्ष. |
| ३. | वॉर्ड क्र.१० मध्ये विविध भागात डांबरीकरण करणे एस.सी.आर.झोन ४ पेज नं.१३ सि.नं.५ रु.१५ लक्ष. | ३) वॉर्ड क्र.१० भारतमातनगर येथील श्री.बन यांच्या घरासमोरील ओपन स्पेसमध्ये सभा मंडप उभारणे. रु.१५ लक्ष. |
| ४. | प्रभाग क्र.१० मध्ये विविध भागात कॉंक्रीटी करण करणे. एस.सी.आर. झोन ४ पेज नं.१४ सि.नं.२९ रु.२५ लक्ष. | ४) वॉर्ड क्र.१० रोजाबाग येथील इदगाह मैदानावर सभामंडप |

| | | |
|---|---|---|
| | | बांधणे. रु.२५ लक्ष. |
| ५. | प्रभाग क्र.१० मध्ये विविध भागात ड्रेनेज लाईन टाकणे. एस.सी.आर.झोन ४ पेज नं.१६ सि.नं.७ रु.१० लक्ष | ५) वॉर्ड क्र.१० शिव छत्रपतीनगर येथील ई/एफ ५५/१४ श्री.देशपांडे यांच्या घरा समोरील ओपन स्पेसवर सभा मंडप उभारणे. रु.१० लक्ष. |
| ६. | वॉर्ड क्र.१० रोजाबाग येथील ओपन स्पेसवर पेव्हर ब्लॉक बसविणे. जी.बी.आर. झोन ४ पेज नं.४२ सि.नं.२८ रु.२५ लक्ष. | ६) वॉर्ड क्र.१० शिवछत्रपतीनगर येथील ई/एफ ५३/१ श्री.कुचे यांच्या घरासमोरील ओपन स्पेसवर सभा मंडप उभारणे. रु.२५ लक्ष. |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०, रोजाबाग-भारतमातानगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामांचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जुने कामांचे नाव ह्यापैकी | त्याऐवजी नवीन कामांचे नाव |
|---|---|---|
| १. | १) वॉर्ड क्र.१० रोजाबाग-भारतमातानगर विठ्ठल मंदिराजवळ आर.सी.सी. कमान उभारण्या बाबत. झोन ४ स्पिल पेज न.१२७ सि.नं.१३ रु.५ लक्ष<br>२) वॉर्ड क्र.१० अंतर्गत शिवछत्रपती नगर येथील आतल्या रस्त्यावर आर.सी.सी. कमान बांधण्या बाबत. झोन ४ स्पिल पेज नं.१२७ सि.नं.१४ रु.७.२५ लक्ष असे एकुण रु.१२.२५ लक्ष. | १) वॉर्ड क्र.१० अंतर्गत शिवछत्रपती नगर येथील श्री.ढोरमारे ते श्री.हिलाल पटेल यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता तयार करणे. रु.१२.२५ लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.१० रोजाबाग अंतर्गत इदगाह मैदान येथे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. झोन ४ स्पिल पेज नं.१२१ सि.नं.१३२ रु.४० लक्ष. | २) वॉर्ड क्र.१० रोजाबाग अंतर्गत इदगाह मैदान येथे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. रु.१० लक्ष. |
| ३. | वॉर्ड क्र.१० मध्ये विविध भागात डांबरीकरण करणे एस.सी.आर.झोन ४ पेज नं.१३ सि.नं.५ रु.१५ लक्ष. | ३) वॉर्ड क्र.१० भारतमातनगर येथील श्री.बन यांच्या घरासमोरील ओपन स्पेसमध्ये सभा मंडप उभारणे. रु.१५ लक्ष. |
| ४. | प्रभाग क्र.१० मध्ये विविध भागात कॉंक्रीटी करण करणे. एस.सी.आर. झोन ४ पेज नं.१४ सि.नं.२९ | ४) वॉर्ड क्र.१० रोजाबाग येथील इदगाह मैदानावर सभामंडप बांधणे. रु.२५ |

| | | |
|---|---|---|
| | रु.२५ लक्ष. | लक्ष. |
| ५. | प्रभाग क्र.१० मध्ये विविध भागात ड्रेनेज लाईन टाकणे. एस.सी.आर.झोन ४ पेज नं.१६ सि.नं.७ रु.१० लक्ष | ५) वॉर्ड क्र.१० शिव छत्रपतीनगर येथील ई/एफ ५५/१४ श्री.देशपांडे यांच्या घरा समोरील ओपन स्पेसवर सभा मंडप उभारणे. रु.१० लक्ष. |
| ६. | वॉर्ड क्र.१० रोजाबाग येथील ओपन स्पेसवर पेव्हर ब्लॉक बसविणे. जी.बी.आर. झोन ४ पेज नं.४२ सि.नं.२८ रु.२५ लक्ष. | ६) वॉर्ड क्र.१० शिवछत्रपतीनगर येथील ई/एफ ५३/१ श्री.कुचे यांच्या घरासमोरील ओपन स्पेसवर सभा मंडप उभारणे. रु.२५ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९२२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.नवीद अहेमद खान वहीद अहेमद खान, प्रा.शिक्षक, ठाणे महानगरपालिका हे हिमायतनगर लगत आरेफ कॉलनी औरंगाबादचे रहिवासी आहेत. संबंधीतांचे आई-वडील हे वयोवृध्द असून विविध आजाराने ते ग्रस्त असून नेहमी आजारी असतात. त्यामुळे त्यांना औरंगाबाद ते महानगरपालिका ठाणे येथे येण्या-जाण्यास फार त्रास होत आहे. संबंधीतांनी ठाणे महानगरपालिकेतून औरंगाबाद महानगरपालिकेत बदलीसाठी विनंती अर्ज केलेला होता. संबंधीत मनपाने त्यांना सोडण्याची तयारी दर्शविल्याचे पत्र क्र.२५० दि.२८.०१.२०१९ रोजी दिले आहे.

करीता, या बाबत सहानुभूतीपूर्वक विचार करून जिल्हा परिषद शिक्षकांना नगरपालिका, नगर परिषदा किंवा महानगरपालिका मध्ये वर्ग करण्याबाबतचा महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक जिपब-४७१७/प्र.क्र.२८०/आस्था-९ दिनांक २९ जुन २०१७ अन्वये दोन्ही विभागात परस्पर सहमती होत असेल तर अर्जदारास कार्यमुक्त करता येईल. अशी तरतुद असल्याने श्री.नवीद अहमेद खान वहीद अहेमद खान, प्रा.शिक्षक यांची सेवा ठाणे महानगरपालिकेतून औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.खान इरशाद इब्राहिम **अनुमोदक:-**श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हिमायतनगर लगत आरेफ कॉलनी, औरंगाबाद येथील रहिवासी व सध्या ठाणे महानगरपालिकेत प्रा.शिक्षक या पदावर कार्यरत असलेले श्री.नवीद अहेमद खान वहीद अहेमद खान यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९२३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०६, कांचनवाडी मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासी यांच्या सुविधेसाठी बदलण्यास यावे.

| अ.क्र. | पान नं. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ११ | GBR ZONE-08 P.NO.84 | वॉर्ड क्र.१०६ अंतर्गत दक्षिण विहार रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. रु.२५ लक्ष. | वॉर्ड क्र.१०६, कांचनवाडी अंतर्गत विविध विकास कामे करणे. रु.२५ लक्ष. |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती विमल जनार्धन कांबळे **अनुमोदक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०६, कांचनवाडी मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पान नं. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ११ | GBR ZONE-08 P.NO.84 | वॉर्ड क्र.१०६ अंतर्गत दक्षिण विहार रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. रु.२५ लक्ष. | वॉर्ड क्र.१०६, कांचनवाडी अंतर्गत विविध विकास कामे करणे. रु.२५ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळीचे विषय

**विषय क्रमांक ९२४:-** **(टिप: दि.१६.०१.२०१९ च्या सर्वसाधारण सभेमधील विषय क्र.८६४)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,

१. घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामात सुसूत्रीकरण आणण्याच्या दृष्टिकोनातून खाजगी एजन्सी नेमण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. शहरातील ११५ वॉर्ड मधील घराघरातून/तसेच व्यावसायीक क्षेत्रातून कचरा संकलन करणे व प्रक्रिया केंद्रापर्यत घनकचऱ्याची घनकचरा व्यवस्थापन नियम-२०१६ नुसार वाहतूक करण्याची कार्यवाही खाजगी एजन्सी करणार आहे.

२. अनुभवी खाजगी एजन्सीच्या नियुक्तीमुळे घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाचा दर्जा सुधारणार असून निवासी भागातील प्रत्येक घरातून दररोज एकवेळ व व्यावसीयक क्षेत्रातील प्रत्येक दुकानातून दररोज दोन वेळा घनकचरा संकलित करण्यात येणार आहे.

३. घनकचरा व्यवस्थापन नियम-२०१६ नुसार नागरीकांकडून उपभोक्ता शुल्क आकारणी संबंधी प्रस्ताव क्र.५६६ दि.११.०७.२०१८ रोजी मा.सर्वसाधारण सभेने मंजुर केलेला आहे. त्यानुसार निवासी भागातून प्रतिदिन प्रतिघर रु.१/- व व्यावसायीक भागातून प्रति दिन प्रति दुकान रु.२/-प्रमाणे नाममात्र उपभोक्ता शुल्क निर्धारित तसेच हॉटेल्स व इतर मोठ्या व्यावसायीक/खाजगी आस्थापने कडून निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या प्रमाणात प्रतिदिन रु.१० ते १०० प्रमाणे उपभोक्ता शुल्क निर्धारित करण्यात आले आहे.

४. शहरातील अंदाजे २,२०,००० घरे व २२५०० व्यावसायीक संस्थांमधून वर्षभरात जवळपास रु.१० कोटी उत्पन्न अपेक्षीत असून त्यासाठी उपभोक्ता शुल्क वसुली करण्यासाठी यंत्रणा निश्चित करणे गरजेचे आहे.

**प्रस्ताव:-**

५. उपभोक्ता शुल्क संकलन करण्यासाठी NGO (सेवाभावी संस्था) नेमणुक प्रस्तावित करण्यात येत आहे. NGO (सेवाभावी संस्था) कामे खालील प्रमाणे राहतील.

A. घनकचरा संकलीत करणारी खाजगी एजन्सी ही घनकचरा संकलनासाठी कमीत कमी ३०० वाहने शहरात घरोघरी वर्गीकृत कचरा संकलनासाठी वापरणार आहेत. एका घंटागाडी मार्फत अंदाजे १००० घरातून कचरा संकलीत होतो.

B. उपभोक्ता शुल्क वसुलीसाठी प्रत्येक वाहनांमार्फत जेवढ्या घरांमधील/वाणिज्य व्यावसायीक आस्थापनातून कचरा संकलीत होतो. तेवढ्या घरातून/दुकानातून उपभोक्ता शुल्क वसुल केला जाईल. यासाठी NGO (सेवाभावी संस्था) एक व्यक्ती एका घंटागाडीवर उपभोक्ता शुल्क वसुली करेल.

C. NGO (सेवाभावी संस्था) त्या घंटागाडीवर अवलंबून सर्व घरोघर कचऱ्याचे ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण होत असल्याची खात्री करेल. त्यानुसार वर्गीकरण झालेला कचरा गोळा केला जाईल.

D. व्यावसायीक भागात सुध्दा वेगळ्या घंटागाड्यांवर उपलब्ध करून देण्यात येतील. त्यावर सुध्दा एक व्यक्ती उपभोक्ता शुल्क वसुलीसाठी आणि घनकचरा वर्गीकरण वाढविण्यासाठी काम करेल.

६. प्रत्येक घंटागाडीवर एक याप्रमाणे ३०० घंटागाड्यांवर कमीत कमी ३०० व्यक्तींची व वाणिज्यीक भागातून कचरा उचलणाऱ्या वाहनांवर प्रत्येकी एक व्यक्तीची आवश्यकता भासणार आहे. त्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या NGO (सेवाभावी संस्था) मार्फत असे काम करून घेणे योग्य राहील. उपभोक्ता शुल्क वसुली आणि घनकचरा वर्गीकरणाचे प्रमाण वाढविण्यासाठी वेगवेगळ्या संस्थांमार्फत प्रस्ताव मागविणे योग्य राहील.

७. एकुण उपभोक्ता शुल्क वसुलीच्या ३०% रक्कम संबंधीत सेवाभावी संस्थेला देण्यात यावी. तसेच प्रती व्यक्ती प्रती महिना रु.१०,०००/- मानधन संस्थेला देण्यात यावे.

८. निवड पध्दती:-

NGO (सेवाभावी संस्था) कडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची प्रशासनाकडून पडताळणी करण्यात येईल त्यामध्ये त्या संस्थेने या पुर्वी केलेल्या कामाचा अनुभव, कामाचे स्वरुप, दर्जा तपासूनच संस्थेची निवड करण्यात येईल आणि आवश्यकतेनुसार एकापेक्षा जास्त संस्थांना शहरात काम देण्यात येईल. या निवडीचे सर्व अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका यांना असतील.

करीता, वरील परि.क्र.५ ते ८ नुसार प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

श्री.राजेंद्र जंजाळ :विषय क्रमांक-९२८ मध्ये साफसफाई कर लावलेला आहे. असे असतांना पुन्हा दुसऱ्या प्रस्तावात निवासीसाठी रू.१/- व व्यावसायीकसाठी रू.२/- साफसफाई कर लावणार आहे. एकाच कामासाठी दोन वेळेस कर लावणार का?

मा.महापौर :विषय क्रमांक-९२४ मध्ये सर्व्हीस चार्ज आहे व विषय क्रमांक-९२८ मध्ये कर लावलेला आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :मालमत्ता करात साफसफाई कर लावतो पुन्हा विषय क्रमांक-९२४ नुसार कर आकारतो. दोन वेळेस टॅक्स कसा घेतो? स्पष्ट खुलासा करावा.

घनकचरा व्यवस्थापक :युजर चार्ज जो लावतो तो टॅक्स व्यतिरिक्त लावतो.

श्री.राजेंद्र जंजाळ :साफसफाई कर व युजर चार्जेस यातील फरक काय?

घनकचरा व्यवस्थापक :रेग्यूलर मधील साफसफाई कर नसून हा युजर चार्ज जी सेवा देतो म्हणुन लावतो.

श्री.राजेंद्र जजांळ :साफसफाई कर सुध्दा सेवा देता म्हणुनच लावतो. रेग्युलर टॅक्स असतांना नवीन कर लावण्याची आवश्यकता का पडली? नेमके प्रयोजन काय आहे? प्रशासनाचे मत काय? साफसफाई कर जमा होतो तो खर्च निघत नाही का?

मा.आयुक्त :नवीन उपाययोजना केली आहे. मागे या सभेत तो ठराव केला. दोन्ही विषय होते. घरापासून १०० टक्के कचरा सेग्रीकेटेट करणे. तसे मनपा सॉलीडवेस्ट २०१६ प्रमाणे अपेक्षीत आहे. इंदौर मध्ये सुरूवातीला ही योजना आखली जे की,

प्रत्येक घरातून वेगवेगळा कचरा जमा केला पाहिजे. मनपात जी यंत्रणा होती ती अपुरी होती. त्यात काही इतर खर्च जवळपास रु.६५ कोटी होत होता. रु.४२ कोटी पगारावर खर्च होत होता. रु.१८ कोटीमध्ये भाड्याचे वाहने, मजूर यावर खर्च होत होता. जीबी मध्ये हा ठराव ठेवण्यात आला होता की, कलेक्शन व ट्रान्सपोटेशनचे सुसूत्रीकरण करू. प्रत्येक घरातून कचरा गोळा करण्याचा प्रयत्न करू. घरापासून कचरा घेतो आहे. त्यासाठी १ रूपया त्यास युजर चार्ज म्हणतो. कमर्शियलसाठी जास्त ठेवले. हे मंजूर केला आहे. रूपये १० कोटी मिळेल.

श्री.राजेंद्र जंजाळ :कचरा खाजगीकरण करणेचा ठराव आला होता. आता जो खर्च व नंतर होणारा खर्च यात मोठी तफावत येत होती व कमी खर्चात काम होत आहे असेम्हणुन मी अभिनंदनही केले होते. नागरीकांना कचरा गाडीत सेग्रीकेशन करून देण्याची ऑलरेडी सवय लागली. आता पुन्हा कचरा रस्त्यावर येत आहे. चांगले काम आता होत नाही. पाच ऐवजी दोन गाड्या दिल्या त्यामूळे नागरीक कचरा देत नाही. जो खर्च होतो वाया जातो. आता युजर चार्जेस व साफसफाई कर द्यावा लागणार त्यास आक्षेप आहे.

श्रीमती किर्ती शिदें :रिक्षा रस्त्यावर थांबते छोट्या गल्ल्यात जात नाही. त्यामळे लोक आता वाटेल तेथे कचरा टाकत आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :सेवाभावी संस्थेला ३० टक्के रक्कम प्रतिव्यक्तीमागे रु.१०,०००/- मानधन देणे असा प्रस्ताव आहे. त्याची वसुली कोणी करावी हा मुद्दा आमचा नाही.

मा.महापौर :एनजीओकडून कलेक्शन करायचे की काय त्याबाबत सुचना करतील त्याप्रमाणे निर्णय घेऊ.

श्री.राजेंद्र जंजाळ :उद्या तो सांगेल १०० लोक लावले तर त्याप्रमाणे पैसे देणार का? यापुर्वी असा कोणत्याही संस्थेच्या बाबतीत प्रस्ताव झालेला नाही. त्यांनी कोट केले पाहिजे एवढ्या वसुलीवर एवढे पैसे घेऊ परंतु आपण ठरावात असे कसे म्हणू शकतो की काम करणार आहे तर १० हजार रुपये प्रति व्यक्ती देऊ.

श्री.राजगौरव वानखेडे :वसुली करीता आपण टेंडर काढायला पाहिजे. डायरेक्ट १० हजार रुपये देणे योग्य नाही. रु.१० कोटी वसुल करणार व रु.६ कोटी त्यांना देणार हे योग्य नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :मानधन आपण ठरवू नये. एनजीओना बोलवले पाहिजे. किती पैशात काम करणार? त्यांचे मत घ्यावे.

श्री.राजगौरव वानखेडे :एनजीओचे प्रपोजल मागवून घ्यावे. आपण डायरेक्ट रेट कसे देतो. रु.५ हजार मध्येही काम करणारी एनजीओ असेल.

श्री.राजेंद्र जंजाळ :जाहीर प्रगटन द्यावे. एनजीओचे रेट ऑफ इंस्ट्रेस मागवून घ्यावे. त्यानंतर निर्णय घ्यावा.

मा.महापौर :स.सदस्यांनी सुचना केली त्यानुसार अंमलबजावणी करावी दुरूस्ती करून हा विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा संकलन व वाहतुकीसाठी नागरीकांकडून/व्यावसायीकांकडून उपभोक्ता शुल्क आकारणीसाठी NGO (सेवाभावी संस्था) नेमणे संबंधी प्रस्तावातील परि.क्र.५ ते ८ मधील अटी व शर्तीस अधीन राहून तसेच NGO (सेवाभावी संस्था) कडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची प्रशासनाकडून पडताळणी करण्यास, त्यामध्ये त्या संस्थेने या पुर्वी केलेल्या कामाचा अनुभव, कामाचे स्वरुप, दर्जा तपासूनच संस्थेची निवड करण्यास आणि आवश्यकतेनुसार एकापेक्षा जास्त संस्थांना शहरात काम देण्यासंबंधी निवडीचे सर्व अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका यांना देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९२५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८ अंतर्गत एन-१ येथील क्रेझी बाईट ते श्री.शेळके यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग, कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१७-१८ च्या SSR नुसार र.रु.१,२४,५७,३००/- चे तयार करण्यात आले आहे.

सदरील काम मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील लेखाशिर्ष नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षामधून प्रस्तावीत आहे. सदरील कामास दिनांक १९.१०.२०१८ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे. करीता, अंदाजपत्रक र.रु.१,२४,५७,३००/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८ अंतर्गत असलेल्या एन-१ येथील क्रेझी बाईट दुकानापासून ते श्री.शेळके यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे व्हाईट टॉपींग, कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे र.रु.१,२४,५७,३००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९२६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, समांतर जलवाहिनी प्रकल्प पुनरुज्जीवना संदर्भाने मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.५५१ दि.०४.०९.२०१८ रोजी मंजुर केला आहे. सदर प्रस्तावामध्ये आयुक्त यांना याप्रकरणी कार्यवाही करण्यासाठी अधिकार देण्यात आलेले आहेत. त्या संदर्भाने झालेल्या कार्यवाहीचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. पारीत ठरावाचा कारणापुरता उतारा दि.०७.०९.२०१८ रोजी प्राधिकृत अधिकारी, औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनी लि.यांना पुढील कार्यवाही करीता ई-मेल द्वारे देण्यात आला. त्यावर दि.२९.०९.२०१८ रोजीचे पत्र ई-मेल द्वारे त्यांच्या ठरावावरील मत व मुद्देनिहाय अभिप्रायासह पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव महानगरपालिकेकडे सादर केले आहे.
२. प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे १) समांतर जलवाहीनी योजनेतील मुख्य लीड मेंबर सुभाष प्रोजेक्ट मार्केटिंग लिमिटेड (SPML) ऐवजी एस्सेल ग्रुप कंपनी यांची नावे बदलणे २) वितरण व्यवस्थेमध्ये डी.आय.ऐवजी एच.डी.पी.ई.पाईप वापरणे आणि ३) प्रकल्पासाठी वित्तीय बंद (Financial Closure) या संदर्भाने अनुक्रमे मा.सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई तसेच मुख्य सरकारी अभियोक्ता, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन

प्राधिकरण, मुंबई तसेच प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांना पत्राद्वारे मार्गदर्शनासाठी विनंती करण्यात आली.

३. कंपनीने दि.०४.०७.२०१८ रोजी दिलेला मुळ प्रस्ताव, महानगरपालिकेने मा.सर्वसाधारण सभेसमोर निर्णयास्तव सादर केलेला प्रस्ताव तसेच पारीत ठरावाचा कारणापुरता उतारा दि.१०.०९.२०१८ रोजी मा.प्रधान सचिव, नवि-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्रासह पुढील कार्यवाही करीता ई-मेलद्वारे सादर करण्यात आला.

४. त्यानंतर मुद्दांचे निराकरण करण्यासाठी कन्सेशनर यांना दि.१४.११.२०१८ व दि.१६.११.२०१८ रोजी आवश्यक माहिती व दस्तावेज देण्याबाबत कळविण्यात आले. तथापि, त्यांच्याकडून आवश्यक माहिती व योग्य तो प्रतिसाद मिळालेला नाही.

५. पुनरूज्जीवन प्रस्तावासंदर्भाने मार्गदर्शनासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व मुख्य सरकारी अभियोक्ता तसेच प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडे महानगरपालिका स्तरावर सातत्याने पाठपुरावा व प्रत्यक्ष भेटी तसेच चर्चा करून यांना आवश्यक माहिती पुरविण्यात आली. तसेच अभिप्राय देण्याबाबत वेळोवेळी विनंती करण्यात आली.

६. दि.२९.१२.२०१८ रोजी मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांनी २५० मीमी व्यासाच्या वितरण व्यवस्थेत जलवाहिन्यांसाठी डी.आय.पाईप ऐवजी एच.डी.पी.ई.पाईप वापरण्यास हरकत नाही. परंतु सदर प्रकल्प पीपीपी तत्वावर हाती घेतलेला असल्याने या बाबतीत होणाऱ्या करारनाम्यातील विविध कलमांचा तसेच होणाऱ्या परिणामांचा योग्य तो निर्णय आपल्या स्तरावर घेणे आवश्यक आहे. असे कळविले आहे. (सोबत पत्र अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.)

७. दि.२०.१२.२०१८ रोजी मुख्य सरकारी अभियोक्ता, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी "In my opinion, the change of lead member in the Consortuim at this stage is not permissible in view of the terms of the bid, clauses of the agreement and articles of association of the company" असे कळविले आहे. (सोबत पत्र अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.)

८. दि.०१.०२.२०१९ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीमध्ये प्रकरण Adjourned केले आहे. त्यानंतर ८ आठवड्यानंतर पुढील सुनावणी घेण्यात येणार आहे.

९. वरील परिस्थीतीमध्ये सरकारी अभियोक्ता (Govt.Pleader) यांच्या कायदेशीर मताप्रमाणे लीड कन्सोर्शियम मेंबर मध्ये बदल करणे शक्य नसल्याने कंपनीला फायनांशिअल क्लोजर करणे शक्य नसल्याने ते प्रकल्प पुनरुज्जीवीत करू शकणार नाहीत. असे कंपनीने पत्राद्वारे कळविले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये समांतर जलवाहीनी प्रकल्प पुनरूज्जीवीत होणे शक्य वाटत नाही. त्यामुळे योजनेचे बळकटीकरण करणेसाठी राज्य शासनाकडे पर्यायी योजनेचा प्रस्ताव पाठविणे योग्य वाटते. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :समांतर जलवाहिनी प्रकल्प सद्यस्थिती बाबत प्रस्ताव आहे. सर्व पार्श्वभुमी या प्रस्तावाच्या अनुषगांने ठेवली आहे. यात म्हटले की, ई-मेल द्वारे कंपनीला कळविण्यात आले होते. त्यांचे जे म्हणणे होते पाण्याचे क्लोजर होत नाही कंपनीने नाव बदलणे बाबत विधी व न्याय विभागाचा अभिप्राय घेतला होता जे अभिप्राय आले ते कंपनीला कळविले होते. कंपनीने त्याचे उत्तरामध्ये म्हटले की, हा मुद्दा पुढे जात नसेल तर मान्य होणार नाही. रु.१३५ कोटीची मागणी सुध्दा केली आहे. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात व अर्बीट्रेटरकडे सुरू आहे. वारंवार

राज्य शासनाकडे मी स्वतः विनंती केली. जायकवाडी ते नक्षत्रवाडी व शहरतील जुनी लाईन यासाठी सक्षमीकरण व त्या लाईन अपडेट करणेसाठी परवानगी द्यावी. शासनाकडे पत्रव्यवहार केला. गव्हर्नमेंट पीडरचे मत पाठविले, यावर मा.मुख्यमंत्री महोदय यांनी म्हटले की, योग्य तो निर्णय घ्यावा. प्रकरण शासनाकडे पाठवावे. यावर प्रशासन व आम्ही चर्चा केली. जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंतची लाईन होणे आवश्यक आहे. शासनाचा पैसा आहे तो कसा खर्च करायचा? हे प्रशासन व आम्ही सर्व पदाधिकारी बसून योग्य निर्णय होईल. बेसीक धोरण निश्चित होणे आवश्यक आहे. कंपनीसोबत चर्चा करून मनपाच्या हिताचा निर्णय घ्यावा लागेल. यापूर्वीचा जो ठराव पुनरूज्जीवन करण्याचा होता त्यात ५० कोटी रूपये कंपनीला टप्प्या टप्प्याने देण्याचे कबूल केले होते. आता यामध्ये सुप्रीम कोर्टात केस लावून घेणे अर्बीट्रेटरकडे केसचा निकाल लावून घेणे, कंपनी बाहेर जाण्यास तयार असेल तर तो निर्णय घ्यावा लागेल. ही योजना करणे आवश्यक आहे. जोपर्यंत कायदेशीर अडचणी दुर होत नाही तोपर्यंत निर्णय घेता येणार नाही. आता प्रस्ताव आला की, समांतर जलवाहिनी पुनरूज्जीवन करणे शक्य होत नाही. कंपनी सोबत चर्चा करून मनपाच्या हिताचा निर्णय जो असेल तो घ्यायचा आहे. त्यासाठी प्रस्ताव आहे.

श्री.राजू शिंदे :रु.१३५ कोटीची मागणी केली आहे. तत्कालीन आयुक्त यांनी सांगितले होते की, एक रूपया कंपनीने न टाकता मनपाचेच पैसे खर्च केले. असे असेल तर त्यांनी पैसे का मागीतले? त्या बेसवर रद्द केले होते त्यावर लक्ष दिले नाही म्हणुन परिस्थिती निर्माण झाली. रु.१३५ कोटी कोणत्या बेसवर मागणी केली?

मा.महापौर :कंपनीने प्रस्ताव दिला आहे वेगवेगळ्या ग्राऊंडवर मागणी केली. तांत्रिक तपासणी प्रशासन करेल. धोरण आता निश्चित करायचे की, जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंत लाईन टाकणे बाबत राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवायचा आहे. मंजुरी आल्यानंतर सुध्दा शासनाच्या मार्गदर्शनाखाली काम करायचे.

श्री.राजू शिंदे :ती कंपनी रु.१३५ कोटीचा दावा का करीत आहे? रु.५० कोटी देण्याचा कबूल केले होते. एजन्सीने काम बंद करणे मागे कुणाचा तरी हात आहे. ही योजना रद्द होणेसाठी त्यांनी तर प्रयत्न केले नाही ना? योजना रद्द करण्यासाठी बोलणी झाली असावी. याची चौकशी वरीष्ठ पातळीवर करावी. जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंत लाईन करायची असेल तर नवीन टेंडर काढता येईल का? कायद्याने प्रकरण कोर्टात आहे काम करता येईल का? ही लाईन टाकू शकतो का? हे सांगावे. कंपनी बाजूला करून काम करता येत असेल तर चांगलेच आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंतची लाईन जुनी आहे. खराब झाली ती टाकणेसाठी मा.सुप्रीम कोर्टात परवानगी मागवावी अशी मागणी करण्याचा ठराव मांडला होता. आता कंपनीच्या मागणीनुसार यात म्हटले की, समांतर जलवाहिनी योजनेतील मुख्य लीड मेंबर सुभाष प्रोजेक्ट मार्केटींग लिमिटेड एसपीएमएल ऐवजी एस्सल ग्रुप कंपनी यांचे नावे बदलणे यास गव्हरमेंट पीडरने लिहून दिले की, हे करता येणार नाही. तर पुढे चर्चा करून वेळ वाया घालवणे

योग्य नाही. हे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे की, या कंपनीला काम करून द्यायला मनपा तयार आहे. परंतु याची जी नाव बदल करणे हे होऊ शकत नाही, शासनाचेच म्हणणे आहे. मार्गदर्शन घ्यावे या प्रकरणात निर्णय घ्यावा.

श्री.गजानन बारवाल :त्यांचे मागण्या आहे त्या पुर्ण करू शकत नाही. त्यांचे मागे किती जावे? मर्यादा आहे. या कंपनीच्या मागे न जाता नवीन प्रकल्प करण्याचा निर्णय घ्यावा.

श्री.विकास जैन :हा प्रकल्प पुनरूज्जीवन करणेचा प्रयत्न केला. समांतरच्या मार्फत काम झाले पाहिजे ठराव घेतला. त्यांची मागणी गव्हर्नमेंट पिडरने मान्य केले नाही. जी मागणी त्यांनी केली ती पुर्ण होऊ शकणार नाही. आता ते काम करणार नाही त्यांनी लिहून दिले. त्यामूळे आता निर्णय घ्यावा व शासनाकडे मागणी करावी की, जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंत लाईन टाकण्याबाबत हा प्रस्ताव पाठवावा. एजन्सीने जी मागणी केली, पत्र दिले त्याबाबतील मा.आयुक्तांना अधिकार द्यावे की, निगोशिएशन करून तो विषय येथे संपवावा. मा.न्यायालय व अर्बीट्रेअर या प्रकरणातून बाहेर यायचे आहे ते सर्व प्रकरण मा.आयुक्तांनी हाताळावे व कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंत लाईन टाकणे बाबत परवानगी मागितली होती ती मा.न्यायालयाने फेटाळली आहे हे सत्य आहे का?

मा.आयुक्त :सुनावणीची तारीख होती मी स्वत: तेथे होतो वकीलांना वस्तुस्थिती सांगितली होती. आता समांतरचे पुनरूज्जीवन करणे शक्य नाही. कारण गव्हरमेंट पीडरने लेखी दिले आहे. मा.कोर्टात ते प्रकरण येते. त्यांचे वकीलानी आठ आठवड्याचे जजमेंट मागितले त्याला मनपाच्या वकीलातर्फे विरोध करण्यात आला. असे मांडले की, हे फायनली डिस्पोज-अप केले पाहिजे. अर्बीट्रेअर चालू आहे जे व्हायचे ते तेथे होईल परंतु मा.कोर्टाने त्याचे आठ आठवड्याचे जजमेंट मंजूर केले. त्यानंतर ते परत घेतो. हा प्रस्ताव प्रशासनाने ठेवला आहे. ही योजना होत नसल्याने पर्यायी योजना करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला पाहिजे.

श्री.राजेंद्र जंजाळ :ही योजना पुनरूज्जीवीत होत नाही यास जबाबदार कोण? कंपनीची अट पूर्ण करू शकत नाही, नाव बदलून देऊ शकत नाही. जर कंपनी दोषी असेल तर आऊट ऑफ कोर्ट सेटलमेन्ट करतांना त्यांना नुकसान भरपाई का द्यायची?

मा.आयुक्त :प्रस्तावात तसे दिले नाही. नुकसान भरपाई देऊ असे म्हटले नाही. आऊट ऑफ कोर्ट सेटलमेंट केले, यशस्वी झाले नाही. त्यामुळे पर्यायी योजनेसाठी प्रस्ताव पाठवित आहे. अर्बीट्रेशनमध्ये जे प्रकरण चालू आहे तेथे पुर्ण क्षमतेने म्हणणे मांडू.

श्री.राजेंद्र जंजाळ :संबंधीत कंपनीने नाव बदलून देण्याच्या अटीवर काम करण्यास नकार दिला. हे कोर्टात समोर आणून दिले जावे. एलईडीचे जसे झाले तसे होऊ नये. आपली बाजू सक्षमपणे माडांवी.

मा.आयुक्त :सर्व बाजू मांडली आहे.

मा.महापौर :या विषयानुसार शहराला पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी यांचे नाव समांतर आहे. परंतु याचे नाव ठेवले की गंगा गोदावरी पेयजल योजना आहे. हा विषय

मंजूर करत असतांना एकतर जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंत जलवाहिनी टाकणेबाबत डीपीआर तयार करून राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा. तसेच शहरातील सिस्टीम्स आहे. स्मार्ट सिटीच्या माध्यमातून पाणीपुरवठा सिस्टीम करीता श्री.होलानी यांनी जे दिले तो प्रस्ताव मंजूर केला आहे. तसेच इतर काही कामे असतील ते समावेश करावा. मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये, अर्बीटेटरकडे वाद सुरू आहे. कंपनीने प्रस्ताव दिला आहे. सदस्यांनी सुचना केली मनपाच्या हिताचे निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार मा.आयुक्तांना देण्यात येते. कंपनीसोबत मा.आयुक्तांनी चर्चा करावी. मनपाच्या हिताचा निर्णय घ्यावा. कंपनीसोबत समझोता करून कार्यवाही करावी. योजनेचे स्वरूप बदलून नवीन डीपीआर तयार करून राज्य शासनाच्या परवानगीने पुढील प्रक्रिया करावी. या अटीवर विषय क्रमांक ९२६ हा प्रस्ताव दुरूस्तीसह मंजूर करण्यात येतो. कंपनीने जो प्रस्ताव दिला त्याबाबत त्यांचेशी बोलणी करणे इन्डीफेंडन इंजिनिअर, ऑडीटर असतील, जे अधिकारी असतील त्यांचे माध्यमातून चांगला निर्णय घ्यावा.

श्री.विकास जैन :प्रस्तावाची सर्व माहिती तयार आहे जशाचा तसा प्रस्ताव पाठवायचा आहे.

श्रीमती किर्ती शिंदे :कचरा खाजगीकरणाचा सेवा शुल्कचा जो विषय आहे त्यास विरोध आहे. कंपनीचे काम चालू आहे परंतु एकच गाडी व कर्मचारी येते पुर्ण कचरा उचलला जात नाही. डोअर टू डोअर कलेक्शन होत नाही. रिक्षा उंच असल्यामूळे कचरा टाकता येत नाही.

मा.महापौर :सेवाशुल्क किती आकारायचा तो ठराव मंजूर आहे. कशा पध्दतीने आकारायचा तो विषय आहे. झोन क्रमांक २,७,९ मध्ये काम सुरू केले रिक्षा कमी असतील तर त्या देण्यात याव्यात.

**ठराव:-**

**औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना - सद्यस्थिती**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुद्यांच्या अनुषंगाने आज रोजी शहराला पिण्याच्या पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे. शहरासाठी जायकवाडी वरील १०० व ५६ दलली क्षमतेच्या दोन्ही योजना जुन्या झालेल्या असून त्यांचे आर्युमान संपले आहे. औरंगाबाद शहराची आजची लोकसंख्या साधारणतः १५ लक्ष असून यासाठी जायकवाडी जलाशयातून २४० दलली दररोज पाणी उचल होणे आवश्यक आहे. तथापी, अस्तीत्वातील योजनांची महत्तम क्षमता पाहता जायकवाडी जलाशयातून दररोज १५० दलली दररोज पाणी उचल करण्यात येत असून शहरास जलशुध्दीकरण केंद्र व्यय, योजना व्यय व मार्गस्थ ग्राहकांना पाणी दिल्यानंतर निव्वळ १२५ दलली पाणी पुरवठा केला जातो. तोकडे पाणी परिमाणामुळे सन-२००१ पासून शहर व परिसरास एक दिवसाआड, दिनांक ०१.१०.२०१२ पासून दोन दिवसाआड व दिनांक ११.०५.२०१८ पासून तीन दिवसाआड व शहागंज, दिल्लीगेट जलकुंभावरून चार दिवसाआड पाणी पुरवठा करावा लागत आहे. ज्या भागात वितरण व्यवस्था नाही त्या भागांमध्ये नागरीकांना सशुल्क टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो.

**वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी महानगरपालिकेने केलेली कार्यवाही**

औरंगाबाद महानगरपालिकेने शहराच्या वाढीव पाणीपुरवठ्यासाठी सन २००५-२००६ मध्ये समांतर जलवाहिनी योजनेचे नियोजन व संकल्पन केले. केंद्र शासनाच्या Urban Infrastructure

Development Scheme for Small & Medium Towns (UIDSSMT) या योजनेतून अनुदान मिळण्यासाठी महानगरपालिकेने रुपये ३५९.६७ कोटीचा प्रस्ताव सन २००६ मध्ये शासनास सादर केला होता. मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे विभाग यांनी प्रस्तावाची तांत्रिक तपासणी करून त्यांचे शिफारशीसह योजनेचा प्रस्ताव दि.०७.०९.२००६ रोजी मा.संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना मान्यतेसाठी सादर केला. मा.संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २०.०६.२००९ रोजी पत्र देऊन केंद्रशासन पुरस्कृत UIDSSMT योजने अंतर्गत औरंगाबाद शहर समांतर पाणीपुरवठा योजनेचा प्रस्तावाला मंजुरी प्राप्त झाल्याचे महानगरपालिकेस कळविले. मंजुर झालेल्या मुळ रक्कम रुपये ३५९.६७ कोटीच्या प्रस्तावामध्ये शहरातील भागशः वितरण व्यवस्थे करीता ढोबळ मानाने तरतुद ठेवण्यात आली होती.

१. मुळ मंजुर योजनेचा आर्थिक आकृतीबंध व अंतर्भुत कामे खालीलप्रमाणे आहेत.

| **UIDSSMT योजने अंतर्गत मंजुर योजना** | | |
|---|---|---|
| - केंद्र शासन अनुदान (८०%) | :- | रु.२८७.७४ कोटी |
| - राज्य शासन अनुदान (१०%) | :- | रु.३५.९७ कोटी |
| - महानगरपालिकेचा सहभाग (१०%) | :- | रु.३५.९७ कोटी |
| **एकुण** | | **रु.३५९.६७ कोटी** |

| **अ.क्र.** | **अंतर्भुत कामे** | **अंदाजपत्रकीय रक्कम** |
|---|---|---|
| अ | जलवहन व्यवस्था (Transmission System) | |
| १. | सर्वेक्षण व उद्‌भव | रु.५६९.५७ लक्ष |
| २. | अशुध्द जल पंपींग मशिनरी - ३००० अ.श. ५ पंप | रु.५८५.५२ लक्ष |
| ३. | अशुध्द जल उध्दरण वाहिनी (लांबी - २७ कि.मी.) (पोलादी २२०० मि.मी. व्यास, १४ मि.मी. जाडी) | रु.१४६५७.३१ लक्ष |
| ४. | जलशुध्दीकरण केंद्र (टप्पा-१, क्षमता १९० द.ल.ली.) | रु.११६७.१० लक्ष |
| ५. | शुध्द जल पंपींग मशिनरी - ५२०० अ.श.६ पंप | रु.७४१.३१ लक्ष |
| ६. | शुध्द जल उध्दरण वाहिनी (लांबी-१२.१२ कि.मी.) (पोलादी २२०० मि.मी. व्यास, १८ मि.मी.जाडी) | रु.७६१०.४९ लक्ष |
| | **एकुण अ** | **रु.२५३३१.३० लक्ष** |
| | | **रु.२५३.३१ कोटी** |
| **ब** | **वितरण व्यवस्था** | |
| ७. | **शुध्द जल गुरुत्व वाहिनी व वितरण प्रणाली** | |
| | (i) शुध्द जल गुरुत्व वाहिनी - २५२० मी.मी. व्यास, १० मीमी जाडी, लांबी ६ किमी | रु.३०५८.१८ लक्ष |
| | (ii) हर्सुल गुरुत्व वाहिनी - ७०० मीमी व्यास, CI, लांबी ७०० मी. | रु.१२३.२३ लक्ष |
| | (iii) दिल्लीगेट करीता वितरण वाहिनी - ७०० मीमी व्यास, CI, लांबी २२०० मी. | रु.३३७.८१ लक्ष |
| | (iv) ५ दलली क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र | रु.५७.७५ लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | (V) १०० ते ६०० मीमी व्यासाची DI K-९ वितरण व्यवस्था- लांबी ४५५.०४८ कि.मी. | रु.५९९८.१२ लक्ष |
| | (vi) विविध ठिकाणी जलकुंभ बांधणे - ९ जलकुंभ, क्षमता १९.८० दलली | रु.७३५ लक्ष |
| | (vii) बल्क फ्लो मीटर बसविणे - ४६ नग | रु.३३२.१९ लक्ष |
| | **एकुण ब** | रु.१०६३६.१८ लक्ष |
| | | रु.१०६.३६ कोटी |
| | **एकुण अ+ ब** | **रु.३५९.६७ कोटी** |

२. औरंगाबाद महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता UIDSSMT योजने अंतर्गत मंजुर रुपये ३५९.६७ कोटीचा निधी संपुर्णपणे PPP Model ला जोडून जायकवाडी पासून औरंगाबाद शहरापर्यंत पाणी पुरवठा योजनेच्या उपांगांची कामे व संपूर्ण वितरण व्यवस्थेचे काम एकाच विकासकाकडून PPP तत्वावर करून घेण्याबाबत व योजना स्वयंपूर्ण होण्यासाठी आवश्यकतेनुसार पाणीपट्टीमध्ये दरवाढ करणे तसेच योजना PPP तत्वावर राबविणे बाबत दिनांक ३०.०७.२००९ रोजी मा.सचिव-२, नगर विकास यांचे दालनात तत्कालीन मा.महापौर, तत्कालीन मा.आयुक्त आणि तत्कालीन इतर पदाधिकारी यांच्या बैठकीत चर्चा होऊन निर्णय झाला.

**योजना राबविण्यासाठी झालेल्या कार्यवाही संदर्भाने सविस्तर माहिती**

१. शहराची पाणी पुरवठा योजना PPP तत्वावर राबविणे व सदर वाढीव पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत झाल्यानंतर पाणीपट्टीमध्ये दरवाढ करण्याबाबतच्या प्रस्तावास ठराव क्र.५५४ अन्वये दिनांक १८.०८.२००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेने सर्वानुमते मान्यता दिलेली आहे.

| **PPP अंतर्गत प्रस्तावीत योजना** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **अंतर्भुत कामे** | **अंदाजपत्रकीय रक्कम** |
| अ | जलवहन व्यवस्था (Transmission System) | |
| १. | सर्वेक्षण व उद्‌भव | रु.९०८.९१ लक्ष |
| २. | अशुध्द जल पंपींग मशिनरी | रु.८६८.५६ लक्ष |
| ३. | अशुध्द जल उध्दरण वाहिनी (लांबी - २७ कि.मी.) (पोलादी २००० मि.मी. व्यास, १६ मि.मी. जाडी) | रु.१९३६४.४० लक्ष |
| ४. | जलशुध्दीकरण केंद्र (टप्पा-१, क्षमता १९२ द.ल.ली.) | रु.१४६१.१४ लक्ष |
| ५. | शुध्द जल पंपींग मशिनरी | रु.१२५०.२२ लक्ष |
| ६. | शुध्द जल उध्दरण वाहिनी (लांबी-१२.१६ कि.मी.) (पोलादी २००० मि.मी. व्यास, २० मि.मी.जाडी) | रु.१०३३८.०५ लक्ष |
| ७. | संतुलीत जलकुंभ (क्षमता १० द.ल.ली.) | रु.२७९.२८ लक्ष |
| ८. | कर्मचारी निवासस्थाने व इतर | रु.१५१.४१ लक्ष |
| | **एकुण अ** | **रु.३४६२१.९६ लक्ष** |
| | | **रु.३४६.२२ कोटी** |
| ब | **वितरण व्यवस्था** | |
| | मुख्य जलवाहिन्या (Trunk & Feeder Mains) | रु.६९.१७ कोटी |
| क | वितरण व्यवस्था लांबी १२८९ कि.मी. + ११ जलकुंभ | रु.३२०.१८ कोटी |

| | | |
|---|---|---|
| ड | जलमापक यंत्र बसविणे | रु.५६.६३ कोटी |
| | **एकुण अ+ब+क+ड** | **रु.७९२.२० कोटी** |

| | | |
|---|---|---|
| ❖ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दरसुची सन २००८-०९ नुसार केलेल्या तांत्रिक मुल्यांकनानुसार प्रकल्पाची येणारी किंमत | :- | रु.५११.३१ कोटी |
| ❖ पी.पी.पी.तत्वावर योजना राबविण्यासाठी लागणारा वाढीव खर्च (रु.७९२.२० कोटी - रु.३५९.६७ कोटी) | :- | रु.४३२.५३ कोटी |
| ❖ वरील योजनेतील एकुण अपेक्षित केंद्र शासन अनुदान | :- | रु.२८७.७४ कोटी |
| ❖ वरील योजनेतील एकुण अपेक्षित राज्य शासन अनुदान | :- | |
| ➢ मुळ मंजुर योजनेनुसार (१०%) | :- | रु.३५.९७ कोटी |
| ➢ दिनांक ३१.०८.२००९ चा शासन निर्णय क्र.एनयुआर-२००९/ प्र.क्र.१२७/०९ नवि-३३ नुसार प्रकल्पाच्या वाढीव किंमतीच्या ५०% राज्य शासनाचे पुरक अनुदान (अपेक्षित) (रु.५११.३१ कोटी - रु.३५९.६७ कोटी) | :- | रु.७५.८२ कोटी |
| **एकुण शासन अनुदान रु.३९९.५३ कोटी** | | |
| ● उपरोक्त एकुण रु.३९९.५३ कोटी शासन अनुदानापैकी केंद्र शासनाकडून अपेक्षित रु.२८७.७४ कोटी पैकी ५०% म्हणजेच रु.१४३.८६ कोटीचा पहिला हफ्ता प्राप्त झाला आहे. | | |
| ● वरील पी.पी.पी.योजनेतील महानगरपालिकेचा एकुण सहभाग {(रु.४३२.५३ कोटी - रु.७५.८२ कोटी) + रु.३५.९७ कोटी} {महानगरपालिकेचा हिस्सा रक्कम रु.३९२.८६ कोटी हा PPP Operator या योजनेत टाकणार होता.} | :- | रु.३९२.६८ कोटी |

२. पाणी पुरवठा योजना PPP तत्वावर राबविणे अंतर्गत निविदा कार्यवाही करण्यासाठी वित्त मंत्रालय, Department of Economical Affairs (DEA) तर्फे भारत सरकार यांच्या India Infrastructure Project Development Fund (IIPDF) योजनेअंतर्गत ऐशियन डेव्हलपमेंट बँक (ADB) यांच्या सहकार्याने क्रिसील रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन लि.(Crisil) मुंबई यांची नेमणूक Transaction Adviser म्हणून करण्यात आली होती. त्यानुसार Crisil च्या साह्याने व मार्गदर्शनानुसार PPP तत्वावर योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार निविदा कार्यवाही दोन टप्प्यात राबविण्यात आली.

**<u>Stage – 1 Request for Qualification (RFQ)</u>**

Request for Qualification (RFQ)ची निविदा सुचना दिनांक २०.०८.२००९ रोजी देशपातळीवरील वृतपत्रांतुन प्रसिध्द करण्यात आली. दिनांक ०२.१२.२००९ रोजी सदर निविदा उघडण्यात आल्या असता एकूण ११ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी दोन निविदाधारक (१) IVRCL-KIPL – SMC- CHETAS Consortium आणि (२) Ashoka Buildcon Limited हे अपात्र ठरले. तसेच उर्वरित ९ निविदा धारक पात्र ठरले. पात्र निविदाधारकांची यादी खालील प्रमाणे.

1. Veolia Water (India) Pvt.Ltd.
2. United Phosphorus Limited (UPL)
   Pratibha Industries
   Salcon Engineering Berhad

3. Subhash Project Marketing Limited, (SPML)
   National water and sewerage Corporation (NWSC)
   Va tech Wabog Ltd.
4. Mahindra Lifespace Developers Ltd. (MLDL)
   Suez Environment
5. IL&FS Water Ltd.
   M/s Puncak Niaga Holdings Berhad (PNHB)
6. EA Infrastructure Operations Pvt. Ltd. (CASCALNV)
   Nagarjuna Construction Company Ltd. (NCC)
7. Ranhill Utilities – Lead Member
   JUSCO – Consortium Member
8. Jindal Water Infrastructure Ltd.
   Hindustan Construction Company (HCC)
   Manila water company
9. JMC Projects India Ltd.
   Metito Berlinwasser Ltd.
   SREI Infrastructure Finance Ltd.

**Stage -2 Request for Porposal (RFP)**

या अंतर्गत Crisil Risk And Infrastructure Solution Ltd. संस्थेने Concession Agreement चे Draft Term Sheet (Concession Agreement मधील अटी व शर्तीचे विवरण) महानगरपालिकेकडे दिनांक ०८.१२.२००९ रोजी सादर केले. या प्रकरणी दिनांक २१.१२.२००९ (दिनांक ०८.१२.२००९ ची तहकुब सभा) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र.७७५ अन्वये Concession Agreement च्या Draft Term Sheet ला तसेच Request for Proposal (RFP) Document ला मान्यता दिलेली आहे. त्यानुसार Draft Concession Agreement मंजुर तसेच RFP document नुसार निविदा कार्यवाही सुरु करण्यात आली.

टप्पा-२ Request for Porposal (RFP) ची निविदा कार्यवाही अंतर्गत दिनांक ३०.११.२०१० रोजी निविदा दाखल करण्याच्या अंतिम वेळेपर्यंत पात्र ९ निविदाधारकांपैकी खालीलप्रमाणे दोन निविदा औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झाल्या.

१. Subhash Project Marketing Limited, (SPML)
   National water and sewerage Corporation (NWSC)
   Va tech Wabog Ltd.

२. IL&FS Water Ltd.
   M/s Puncak Niaga Holdings Berhad (PNHB)

३. दिनांक ०१.१२.२०१० रोजी RFP निविदेच्या Technical Bid उघडण्यात आल्या. दरम्यान दोन्ही निविदांच्या तांत्रिक Bid ची तपासणी केल्यानंतर निविदाधारकांनी त्यांच्या Approach Methodology & Business Plan संदर्भाने दिनांक १४.१२.२०१० रोजी दुपारी ०३.०० वाजता महानगरपालिके अंतर्गत गठीत पी.पी.पी. सेलसमोर सविस्तर सादरीकरण केले आणि त्याच दिवशी सर्व पी.पी.पी. सेलच्या सदस्यांसमक्ष व संबंधीत च्या Bidders च्या प्रतिनिधींसमक्ष Financial Bid उघडण्यात आले. त्यात दोन्ही निविदाधारकांनी Annual Operational Support Grant (AOSG) मागीतलेली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | Subhash Project Marketing Limited, (SPML)<br>National water and sewerage Corporation (NWSC)<br>Va tech Wabog Ltd. | :- | पहिल्या वर्षा करीता<br>रुपये ६३ कोटी |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | IL&FS Water Ltd.<br>M/s Puncak Niaga Holdings Berhad (PNHB) | :- | पहिल्या वर्षा करीता<br>रुपये ११२.९० कोटी |

४. Subhash Project Marketing Limited, (SPML) यांनी Annual Operational Support Grant (AOSG) म्हणून प्रथम वर्षा करीता रुपये ६३ कोटी एवढी रक्कम मागीतली होती. या AOSG च्या रकमेची IL & FS Water Ltd. ने मागीतलेल्या AOSG च्या रुपये ११२.९० कोटी या रकमेशी तुलना करता SPML यांनी मागीतलेली AOSG ची रक्कम रुपये ४९.९० कोटी इतकी कमी होती. तसेच IL & FS Water Ltd.यांनी सादर केलेल्या Financial Bid मध्ये अटी व शर्ती नमुद असल्याने त्यांची Non Responsive Bid निविदा ठरली.

५. पीपीपी योजनेच्या ठळक बाबी :

- कन्सेशन कालावधी (अपॉइंटेड डेट पासून)
- तयारी कालावधी ६ महिने (कन्सेशन ॲग्रीमेंट व अपॉइंटेड डेट पासून)
- बांधकाम व पुनर्वसन कालावधी - ३ वर्ष (अपॉइंटेड डेट पासून)
- संचलन व देखभाल दुरुस्ती कालावधी - १७ वर्ष

६. औरंगाबाद महानगरपालिकेने SPML & Consortium यांची निविदा अंतिम केली. त्यानुसार दिनांक २२.०३.२०११ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेने ठराव क्र.२१३ अन्वये कन्सेशनरची नियुक्ती केलेली आहे. निविदा अटी व शर्तीनुसार SPML & Consortium यांनी स्थापन केलेल्या Aurangabad City Water Utility Company Limited (SPV) सोबत दिनांक २२.०९.२०११ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेने कन्सेशन ॲग्रीमेंट केले. निविदा अटी व शर्तीनुसार दोन्ही पक्षांना कन्डीशन्स प्रेसिडेंटची पुर्तता करणे,कन्सेशनर आणि त्यांच्या भागीदारामध्ये आपआपसात वाद निर्माण झाल्यामुळे प्रविष्ठ न्यायालयीन प्रकरण, राज्य शासनाने महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा उपविधीला दिनांक १४.०३.२०१४ रोजी दिलेली मान्यता तसेच समांतर पाणी पुरवठा योजना सार्वजनिक खाजगी सहभाग (पीपीपी) तत्वावर राबविण्यास महाराष्ट्र शासनाने दिनांक २७.०५.२०१४ रोजी दिलेली मान्यता इ. बाबी अंतीम झाल्यानंतर दिनांक ०१.०९.२०१४ रोजी अपॉइंडेड डेट होवून अस्तित्वातील संपुर्ण पाणी पुरवठा योजना औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनी लि. (SPV) या कन्सेशनरकडे पुढील संचलन, देखभाल दुरुस्ती व नविन योजनेचे बांधकाम करण्यासाठी हस्तांतरीत करण्यात आली.

७. वरील कार्यवाही अंती दिनांक ०१.०९.२०१४ रोजी Appointed Date होऊन पाणी पुरवठा योजना पुढील कार्यवाहीसाठी कन्सेशनरकडे हस्तांतरीत करण्यात आली. दिनांक ०१.०९.२०१४ पासुन अस्तीत्वातील योजनेचे संचलन व देखभाल दुरुस्तीची कामे कन्सेशनर मार्फत सुरु झाली.

**कन्सेशनरकडे योजना ताब्यात दिल्यानंतर झालेल्या कार्यवाहीचा तपशील**

१. दिनांक ०१.०९.२०१४ पासुन कन्सेशनर सोबत वेळोवेळी आढावा बैठका घेतलेल्या आहेत. कन्सेशन ॲग्रीमेंट मधील तरतुदींनुसार प्रकल्पाची भांडवली खर्चाची कामे करण्यासाठी माईलस्टोन अंतिम करणे, विविध कामांचे नियोजन करणे, विविध उपांगाकरीता डिझाईन्स ॲण्ड ड्रॉईंग्ज अंतिम करणे इत्यादींकरीता कन्सेशनर यांना वेळोवेळी बैठकांमधून सुचना देण्यात आल्या होत्या.

२. दिनांक २१.०३.२०१६ रोजी मा.सचिव, नवि-२ यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. बैठकीला श्री.संतोष कुमार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण तथा अध्यक्ष राज्य शासन नियुक्त समिती, तत्कालीन आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद, सह सचिव, नगर विकास

विभाग, शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद, महानगरपालिकेचे सल्लागार प्रकल्पाचे स्वतंत्र अभियंता व स्वतंत्र लेखा परिक्षक उपस्थित होते.

३. सदर बैठकीचे इतिवृत्त दिनांक २४.०३.२०१६ च्या पत्रान्वये महानगरपालिकेस प्राप्त झाले. सदर बैठकीमध्ये तत्कालीन आयुक्त श्री.सुनील केंद्रेकर यांनी शासनास व चौकशी समितीस सादर केलेला अहवाल, त्यावर सध्याचे आयुक्त यांनी राज्य शासन नियुक्त चौकशी समितीस सादर केलेला अहवाल व त्यानुषंगाने चौकशी समितीने शासनास सादर केलेला अहवाल यावर चर्चा होऊन "त्यानुसार कन्सेशनर यांचे Financial Closure चा अहवाल अद्यापही सादर न झाल्यामुळे त्यांचेमार्फत प्रकल्पासाठी कशा प्रकारे निधी उभारणार, कन्सेशनर यांनी माईलस्टोन नुसार कामे न करणे, कन्सेशनर यांनी स्वतःच्या सहभागाची रक्कम न गुंतवणे, पाणी परिमाण वाढविणाऱ्या उपांगांची कामे प्रथम प्राधान्याने हाती न घेणे, इत्यादी बाबी पाहता कन्सेशनर यांना १५ दिवसांच्या कालावधीची नोटीस देऊन त्याबाबत त्यांचा खुलासा घेण्याची कार्यवाही करावी. खुलाश्यानुसार पुढील कार्यवाही बाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेसमोर ठेवून महानगरपालिकेने याबाबत आवश्यक तो निर्णय घ्यावा. यासाठी विधी व वित्त विषयक सल्ला घेऊन महानगरपालिकेच्या मान्यतेने घेतलेल्या निर्णयाची माहिती राज्य शासनास सादर करण्याची" बाब नमुद होती.

४. कन्सेशन ॲग्रीमेंटनुसार सर्वात महत्वाची अट म्हणजे Financial Closure करून बँकेकडून कर्जाचा पहिला हफ्ता प्राप्त करणे ही आहे. तथापी, कन्सेशनर यांना त्यांच्या वित्तीय संस्थेकडून कर्जाचा पहिला हफ्ता देखील मिळालेला नाही. कन्सेशनर यांनी दिनांक ०५.०८.२०१५ रोजी पत्र देवून त्यांना जरी बँकेमार्फत कर्जाचा हफ्ता अद्याप मिळालेला नाही तरी प्रकल्पाच्या माईलस्टोनची सर्व कामे स्वखर्चाने करण्यात येतील असे कळविले. प्रकल्पाची कामे पुर्ण करण्यासाठी एकुण १२ माईलस्टोन ठरविण्यात आले असून कन्सेशनर यांना पहिल्या चार एकत्रित माईलस्टोन करीता प्राप्त शासन अनुदाना पैकी (Grant) रुपये २०.०८ कोटी रक्कम अदा करण्यात आली. निविदा अटी व शर्तीनुसार कन्सेशनर यांना जुन-२०१६ अखेर १८२.६४ कोटी प्रोजेक्ट ग्रँट, AOSG तसेच पाणीपट्टीची रक्कम अदा केलेली आहे.

५. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता हा प्रकल्प महानगरपालिकेसाठी फायद्याचा व आर्थिकदृष्ट्या परवडणारा दिसून येत नसल्याने, कन्सेशनर प्रकल्पाशी सचोटी राखण्यास असमर्थ ठरणे, हस्तांतरणानंतर २२ महिन्यांचा कालावधी होवूनही ठोस कार्यवाही न होणे, स्वतःची गुंतवणूक न करता प्रकल्पाचा खर्च भागविणे, अवास्तव नफा कमवून सार्वजनिक पैशाचा अपव्यय करणे इत्यादी कारणांमुळे सदरील पीपीपी प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय दिनांक ३०.०६.२०१६ रोजी संपन्न झालेल्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने विषय क्र.४७४ नुसार सर्वानुमते घेतलेला आहे.

६. महानगरपालिकेने कन्सेशनरमार्फत प्रकल्प राबविण्यासाठी होत असलेल्या अनियमिततेबाबत कन्सेशनर यांना दिनांक ०४.०७.२०१६ रोजी करारनाम्याच्या कलम ३४.१(a) नुसार 'Intention to Terminate the Concession Agreement' ही ३० दिवस मुदतीची नोटीस दिली. कन्सेशनर यांनी दिनांक ०१.०८.२०१६ रोजी त्यांचा खुलासा महानगरपालिकेस सादर केला.

७. कन्सेशनर यांच्या अनियमितता पाहता औरंगाबाद महानगरपालिकेने समांतर जलवाहिनी योजना रद्द करण्यासाठी दिनांक ०१.१०.२०१६ रोजी कन्सेशनर यांना Termination Notice दिलेली असून औरंगाबाद पाणी पुरवठा योजना ताब्यात घेण्यात आली असून योजनेचे संचलन, देखभाल-दुरुस्ती महानगरपालिका करत आहे. या विरुध्द कन्सेशनर यांनी न्यायालयात दावा दाखल केला.

**कन्सेशनर यांना टर्मिनेशन नोटीस दिल्यानंतर न्यायालयीन / आर्बिट्रेशन कार्यवाही**

१. या प्रकरणात कन्सेशनर यांनी मा.जिल्हा सत्र न्यायालयात दाखल केलेल्या आर्बिट्रेशन ॲण्ड कॉन्सीलेशन ॲक्टच्या कलम ९ अंतर्गत M.A.R.J.I.No.214/2016 प्रकरणात मा.न्यायालयाने दिनांक ०८.०९.२०१६ रोजी आदेश पारीत केलेले असून कन्सेशनर यांनी पारीत केलेल्या आदेशा विरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद येथे आर्बिट्रेशन अपिल क्र.१२/२०१६ दाखल केले होते.
२. कन्सेशनर यांनी मा.जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद येथे MARJI No.214/2016 अन्वये प्रकरण दाखल करून "a) That pending the Arbitration Proceeding, this Hon'ble Court may be pleased to restrain the Respondent, their servants, agents, and subordinate officers by an Order and Injunction of this Hon'ble Court in any manner from taking any coercive action against the petitioner in respect of the Water Supply Project without following the due process as provided under the Concession Agreement dated 22/09/2011 या प्रमाणे राहत मिळविली.
३. महानगरपालिकेच्या वतीने दिनांक ०१.१०.२०१६ रोजी कन्सेशनर यांना टर्मिनेशन नोटीस दिली होती व त्यास मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद Uphold यांनी केले होते.
४. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णया विरोधात कन्सेशनर यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लिव्ह पीटीशन (SLP) क्र.३२४१५ व ३२४१६ दाखल केल्यावर न्यायालयाने "जैसे थे" आदेश दिले होते. सध्या प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात सुनावणी अंतर्गत आहे.
५. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशानुसार तसेच कन्सेशन ॲग्रीमेंटमधील तरतुदीनुसार कन्सेशनर व महानगरपालिका यांचे वतीने लवादाची नियुक्ती झालेली आहे व औरंगाबाद शहर समांतर जलवाहिनी पीपीपी प्रकल्पा संदर्भाने प्रकरण सद्यस्थितीत आर्बिट्रेशनमध्ये आहे. या अंतर्गत आर्बिट्रेशन प्रकरणी औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीने रु.८५६.४६ कोटी चा क्लेम दाखल केला होता. या संदर्भाने मुंबई येथे संपन्न झालेल्या तिसऱ्या बैठकीत महानगरपालिकेच्या वतीने रक्कम रुपये १६६८.७८ कोटीचा काऊंटर क्लेम दाखल करण्यात आला आहे. प्रकरण कार्यवाही अंतर्गत आहे.

**कंपनीने प्रकल्प पुनरूज्जीवन करीता दिलेला प्रस्ताव व त्यावर आतापर्यंत झालेली कार्यवाही**

१. मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवर दि.०४.०७.२०१८ रोजी मा.सर्वोच्च न्यायालय येथे झालेल्या सुनावणी दरम्यान कन्सेशनर यांचे मार्फत समांतर जलवाहिनी प्रकल्पाचे पुनरूज्जीवन करण्यासाठी प्रस्ताव दाखल केला. यात मुख्यत्वे पीपीपी मॉडेलमधील मान्य निविदाधारक Lead Consortium मेंबर एस.पी.एम.एल.ऐवजी ESSEL कंपनीला देणे, मुळ योजनेतील साहित्य बदल जसे डी.आय.पाईप ऐवजी एच.डी.पी.ई. पाईप वितरण व्यवस्थेत टाकण्यास परवानगी देणे, कन्सेशनर यांनी तयार केलेल्या असेटवर चार्ज निर्माण करण्यास परवानगी देणे, बाजार भाव / दरसुची वाढ मुळे वाढलेली रक्कम रु.७९ कोटी अधिक अतिरिक्त काम करीता रु.११५ कोटी अधिक जीएसटी करापोटी ९५ कोटी अशी एकुण २८९ कोटी अतिरिक्त मिळणे, कंपनीने केलेल्या कामापोटी थकीत रक्कम अदा करणे या प्रमुख मागण्या होत्या.
२. त्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने कन्सेशनर यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचा अभ्यास करून अहवाल महापालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर उचित निर्णयास्तव दि.११.०७.२०१८ रोजी सादर केला होता. या प्रस्तावावर दि.२७.०८.२०१८ रोजी मा.सर्वसाधारण सभेत चर्चा झाली.

३. प्रकरणात दिनांक ०१.०९.२०१८ रोजी या संदर्भाने मा.प्रधान सचिव, नवि-२, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सद्यस्थिती कळविली आहे.

४. दि.०४.०९.२०१८ रोजी आयोजीत मा.सर्वसाधारण सभेत समांतर जलवाहिनी प्रकल्प पुनरूज्जीवन करणे व "कन्सेशनर" कंपीनीला काम देण्याबाबतचा ठराव क्र.५५१ काही अटी व शर्तीसह पारीत केलेला आहे.

५. पारीत ठरावाची प्रत औरंगाबाद "कन्सेशनर" सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लि.यांना दिनांक ०६.०९.२०१८ रोजी दिल्यानंतर संबंधितांनी दि.२९.०९.२०१८ रोजी त्यांचे मत व पुन्हा मुळ प्रस्तावातील अटींना मान्यता मिळावी म्हणून महानगरपालिका प्रशासनाला कळविले आहे.

६. मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षते खाली दि.२३.०८.२०१८ रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्स बैठकीस मा.मुख्यमंत्री महोदय यांनी प्रकल्प पुनरूज्जीवन करण्यासाठी शासन सर्व ती आर्थिक मदत करणार असल्याबाबत आश्वासीत केले.

७. मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षते खाली औरंगाबाद येथे दि.१०.१०.२०१८ रोजी संपन्न झालेल्या आढावा बैठकीयमध्ये समांतर जलवाहिनी प्रकल्प पुनरूज्जीवन विषयी चर्चा झाली. त्यानुसार वर नमुद मुद्या संदर्भाने कन्सेशन ॲग्रीमेंटमधील तरतूद, सर्वसाधारण सभेचा पारीत ठराव व कन्सेशनरची मागणी पाहता याबाबत कायदेशीर तसेच तांत्रिक मत/अभिप्राय घेण्याबाबत निर्देश प्राप्त झाले.

८. त्या अनुषंगाने "कन्सेशनर" यांनी मागणी केलेल्या मुख्य मुद्यां संदर्भाने मा.सचिव, विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई व मा.मुख्य सरकारी अभियोक्ता, उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांना पीपीपी मॉडेलमधील मान्य निविदाधारक Lead consortium मेंबर एस.पी.एम.एल. ऐवजी ESSEL कंपनीला करता येवू शकते काय याबाबत तसेच मुळ योजनेतील साहित्य बदल जसे डी.आय. पाईप ऐवजी एच.डी.पी.ई. पाईप वितरण व्यवस्थेत वापरता येतील काय यासाठी मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि कन्सेशनर यांनी तयार केलेल्या असेटवर चार्ज निर्माण करून तसेच फायनान्शीयल क्लोझर बाबत नॅशनल हायवे ऑथॉरीटी ऑफ इंडिया यांची काम करावयाची पध्दत जाणून घेण्यासाठी संचालक श्री.अजय गाडेकर यांना दि.१७.१०.२०१८ च्या स्वतंत्र पत्रान्वये अभिप्राय मागविण्यात आले.

९. वरील बाबी पाहता तसेच मा.सर्वोच्च न्यायालय व लवादामध्ये सुरु असलेल्या प्रकरणात विलंब होत असल्यामुळे प्रकल्प पुनरुज्जीवनाच्या कार्यवाही संदर्भाने पुर्तता लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने दिनांक १४.११.२०१८ रोजी "कन्सेशनर" एस.पी.व्ही. कंपनी औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लि. यांना पत्र देवून Lead Consortium मेंबर एस.पी.एम.एल. ऐवजी ESSEL कंपनीला करता येवू शकते काय याबाबत काही मुद्यांचे पुरक दस्तावेज मागविले.

१०. त्यानंतर मुद्यांचे निराकरण करण्यासाठी कन्सेशनर यांना दि.१४.११.२०१८ व १६.११.२०१८ रोजी आवश्यक माहिती व दस्तावेज देण्याबाबत कळविण्यात आले तथापी त्यांचेकडुन आवश्यक माहिती व योग्य तो प्रतिसाद मिळालेला नाही.

११. पुनरुज्जीवन प्रस्तावासंदर्भाने मार्गदर्शनासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व मुख्य सरकारी अभियोक्ता तसेच प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे महानगरपालिका स्तरावर सातत्याने पाठपुरावा व प्रत्यक्ष भेटी तसेच चर्चा करून यांना आवश्यक माहिती पुरविण्यात आली. तसेच अभिप्राय देण्याबाबत वेळोवेळी विनंती करण्यात आली.

१२. दि.२९.१२.२०१८ रोजी मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबद यांनी २५० मीमी व्यासाच्या वितरण व्यवस्थेत जलवाहीन्यांसाठी डी.आय. पाईप ऐवजी एच.डी.पी.ई. पाईप वापरण्यास हरकत नाही. परंतु सदर प्रकल्प पीपीपी तत्वावर हाती घेतलेला असल्याने या बाबतीत होणाऱ्या करारनाम्यातील विविध कलमांचा तसेच होणाऱ्या परिणामांचा योग्य तो निर्णय आपले स्तरावर घेणे आवश्यक आहे. असे कळविले आहे.

१३. दि.२०.१२.२०१८ रोजी मुख्य सरकारी अभियोक्ता, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी "In my opinion, the change of lead member in the Consortium at this stage is not permissible in view of the terms of the bid, clauses of the agreement and articles of association of company" असे कळविले आहे.

१४. दिनांक ०१.०२.२०१९ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सूनावणीमध्ये प्रकरण Adjourned केले आहे. त्यानंतर ८ आठवड्यानंतर पुढील सुनावणी घेण्यात येणार आहे.

१५. वरील परिस्थितीमध्ये सरकारी अभियोक्ता (Govt. Pleader) यांच्या कायदेशिर मताप्रमाणे लीड कन्सोर्शियम मेंबर मध्ये बदल करणे शक्य नसल्याने, कंपनीला फायनान्शीयल क्लोजर करणे शक्य नसल्याने ते प्रकल्प पुनरुज्जीवीत करू शकणार नाहीत असे कंपनीने पत्राव्दारे कळविले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये समांतर जलवाहीनी प्रकल्प पुनरुज्जीवीत होणे शक्य वाटत नाही.

१६. कंपनीने दि.०१.०१.२०१९ रोजी मुख्य लीड मेंबर SPML ऐवजी एस्सेल ग्रुप बदल होवू शकत नसल्यामुळे पत्राव्दारे प्रकल्पापोटी त्यांची बँक गॅरंटी तसेच त्यांचे म्हणणेप्रमाणे रू. १३५.१२ कोटी झालेला खर्च परत दिल्यास सर्व वाद संपूष्टात आणुन न्यायालयीन प्रकरणे मागे घेण्यात येतील म्हणून कळविले आहे.

वरील सर्व बाबींचा सर्वंकश विचार करून सादर प्रस्तावाच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेचे पाणी पुरवठा प्राधान्य, शहराची भविष्याची पाण्याची गरज व अस्तित्वातील योजना जुन्या झाल्यामुळे नविन योजना तात्काळ राबविण्याच्या दृष्टीने खालील कार्यवाही करण्यात यावी.

कंपनीने दि.०१.०१.२०१९ रोजी मुख्य लीड मेंबर SPML ऐवजी एस्सेल ग्रुप बदल होवु शकत नसल्यामुळे पत्राव्दारे प्रकल्पापोटी त्यांची बँक गॅरंटी तसेच त्यांचे म्हणणेप्रमाणे रू.१३५.१२ कोटी झालेला खर्च परत दिल्यास सर्व वाद संपुष्टात आणून न्यायालयीन प्रकरणे मागे घेण्यात येतील म्हणून कळविले आहे. यापूर्वी पारीत पुनरुज्जीवन ठरावामध्ये महानगरपालिकेने कंपनीकडून झालेल्या कामाचे तांत्रिक व आर्थिक हिशोब प्रकल्पाचे स्वतंत्र अभियंता व स्वतंत्र लेखापरीक्षक यांचेकडून अंतीम करणेस मान्यता दिलेली आहे.

यासंदर्भाने खालील निर्णय घेण्यात येत आहे.

१. कंपनीने केलेल्या कामाबाबत लेखी मागणी केलेल्या रु.१३५.१२ कोटी रक्कमेपैकी सवतंत्र अभियंता यांनी पुर्वी जी रक्कम प्रमाणित केलेली आहे ती रक्कम देण्यात यावी. तसेच बँक गॅरंटी परत करावी. रक्कम रू.१३५.१२ कोटी पैकी उर्वरीत रकमेबाबत स्वतंत्र अभियंता यांनी तपासणी केल्यानंतरच ते जी देय रक्कम प्रमाणित करतील ती कंपनीला देणेबाबतची कार्यवाही करावी. या बदल्यात कंपनीने सर्व न्यायालयीन केसेस/दावे व आर्बिट्रेशनमधील केस/दावा काढून घ्यावा म्हणजे नविन निविदा काढण्याचा मार्ग मोकळा होईल. कंपनीने केलेल्या कामाची वर नमुद केलेली रक्कम वगळता कंपनीने मागणी केलेले क्लेम, नुकसान भरपाई व इतर रक्कमांची मागणी फेटाळावी व त्या पोटी एक पैसाही कंपनीला देवू नये. तसे लेखी हमीपत्र कंपनीकडून स्टँप पेपरवर घ्यावे. वरील बाबत महानगरपालिका व कंपनीने एक सामंजस्य करारनामा करावा म्हणजे समांतर जलवाहीनी

प्रकल्पाच्या निविदेची / कामाची सर्व प्रक्रिया संपुष्टात येईल व त्यानंतर महानगरपालिका या कामासाठी नव्याने निविदा काढू शकेल.

२. वरीलप्रमाणे कंपनीसोबत चर्चा करून अंतीम निर्णय झाल्यानंतर योग्य त्या तोडग्याअंती मुळ मंजुर UIDSSMT प्रकल्पातील जायकवाडी ते नक्षत्रवाडी या मुख्य जलवाहीनी टाकण्याच्या कामाची निविदा कार्यवाही तात्काळ करणे.

३. मुळ मंजुर UIDSSMT प्रकल्पा व्यतिरिक्त शहरात आवश्यक त्या अतिरिक्त टाक्या बांधणे, संपुर्ण महानगरपालिका क्षेत्रातील उर्वरीत भागांसाठी आवश्यक लांबीच्या जलवाहीन्या टाकणे यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल पीएमसी नेमुन तयार करणे व त्या सविस्तर प्रकल्प अहवालाला तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेणे. त्याचप्रमाणे अतिरिक्त निधीची मागणी शासनाकडे करणे इत्यादी.

४. नविन प्रकल्प अहवालामध्ये सद्याच्या अस्तित्वातील योजनेचे बळकटीकरण व आवश्यक दुरूस्तीच्या कामाचा समावेश करणे तसेच वाढीव शहराचा समावेश करणे.

५. केंद्र व राज्य शासनाचा योजनेसाठी प्राप्त झालेला निधी, त्यावरील मिळालेले व्याज, महानगरपालिकेने वॉटर पेमेंट रिझर्व अकाऊंटसाठी घेतलेले कर्ज व त्यावरील मिळालेले व्याज इत्यादी मनपाकडील सद्यस्थितीस उपलब्ध एकूण निधीच्या वापरास शासनाकडून मान्यता घेवून संपुर्ण प्रकल्पाकरीता लागणाऱ्या अतिरिक्त निधीची मागणी करणे. अशा प्रकारचा सर्वकंष प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव सादर करणे.

६. नविन पाणी पुरवठा प्रकल्प पुर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेला स्वत:चा देखील निधी वापरावा लागेल. यासाठी कटाक्षाने आगामी प्रत्येक वर्षात वसूल होणारी संपूर्ण पाणीपट्टीची रक्कम बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडून त्यामध्ये जमा करणे व त्याचा वापर योजना राबविण्यासाठी करणे.

७. नविन पाणी पुरवठा प्रकल्पासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या व विभागांच्या ना हरकत / परवानगी घेणे संदर्भाने योग्य ती कार्यवाही करणे.

८. नविन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा कार्यवाही करणे, प्रकल्पावर देखरेखीसाठी प्रकल्प व्यवस्थापन संकल्पनार्थी यांची वैधानिक पध्दतीने त्वरीत नियुक्ती करणे.

९. शासनास यापुर्वी तत्कालीन महानगरपालिका आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरिया यांनी दि.१८.१०.२०१६ रोजी प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय यांना पत्र देवून महानगरपालिकेकडे पीपीपी योजनेसाठी व्याजासह उपलब्ध असलेला निधी वापरुन जायकवाडी ते नक्षत्रवाडी जलकुंभा पर्यंत मुख्य जलवाहीनी टाकणे व त्यानूषंगाने आवश्यक उपांगाची कामे करणेस्तव मंजुरी देणे बाबत विनंती केली होती. तसेच याबाबत महानगरपालिके तर्फे शासनास याच आशयाची चार पत्र देखील देण्यात आली. मात्र याबाबत शसनाकडुन अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही व अद्याप काहीही निर्णय अथवा सुचना शासनाकडुन प्राप्त नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

समांतर जलवाहीनी प्रकल्पाचे पुनरुज्जीवन सद्य परिस्थतीत करता येणे शक्य नसल्याने प्रकल्प पुनरूज्जीवनाचा व कन्सेशनर कंपनीला काम पुन्हा सुरू करू देण्याचा दि.०४.०९.२०१८ रोजीचा सर्वसाधारण सभेच्या ठरावा ऐवजी आता वरील अ.क्र.१ ते ९ प्रमाणे कार्यवाही करावी. तसेच औरंगाबाद शहरासाठी नविन पाणी पुरवठा योजना “गंगा-गोदावरी पेय जल योजना” या नावाने राबविण्यात यावी. यासाठी सर्व अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका यांना प्रदान करण्यात येत आहे. प्रस्ताव दुरुस्ती मंजुर करण्यात येत आहे. त्यानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात यावी.

**<u>विषय क्रमांक ९२७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गृहविभाग महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक ०९.१०.२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार रस्त्याच्या कडेला अनेक दिवसांपासून उभी असलेली २६५ बेवारस/भंगार वाहने महानगरपालिका पोलीस व आरटीओ यांच्या संयुक्त पथकाने जप्त केली आहेत. सदर मोहिम दि.०१.१२.२०१८ ते दि.०३.१२.२०१८ अशी सलग तीन दिवस राबवण्यिात आली. सदरील मोहिम राबविण्यासाठी महानगरपालिकेचा रु.१०,२६,७५०/- खर्च झालेला आहे.

(अ) या खर्चाची वसुली करण्यासाठी जप्त करण्यात आलेल्या वाहनांच्या वाहनधारकांकडून खालील प्रमाणे द्रव्यदंड आकारण्यात येत आहे. तरी सदर बाब मा.सर्वसाधारण सभेच्या माहितीस्तव सविनय कळविण्यात येत आहे.

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | वाहनांची संख्या | प्रस्तावीत द्रव्यदंडाची रक्कम (प्रतिनग) |
|---|---|---|---|
| १. | दु-चाकी (मोपेड/मोटरसायकल) | ४४ नग | १०००/- |
| २. | तीन चाकी (रिक्षा) | ५८ नग | २०००/- |
| ३. | चार चाकी (कार/जीप/टेंपो) | १५३ नग | ५०००/- |
| ४. | चार चाकी (मिनीट्रक/ट्रॅक्टर इ.) | ०८ नग | १०,०००/- |
| ५. | सहा चाकी (बस/मोठी ट्रक इ.) | ०२ नग | २०,०००/- |
| | **एकुण वाहने** | **२६५ नग** | |

(ब) जप्त करण्यात आलेली बेवारस/भंगार वाहने घेऊन जाण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीर प्रकटन देण्यात येईल. जाहीर प्रकटनात नमुद केलेल्या विहीत मुदतीत वाहनधारकांकडून द्रव्यदंड भरून घेऊन वाहने सोडण्यात येतील. तथापि, जे वाहनधारक विहीत मुदतीत वाहने घेऊन जाणार नाहीत त्यांची वाहने स्क्रॅप करून जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यात येतील. सदरची प्रक्रिया महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४३८ नुसार करण्यात येईल. करीता वरील प्रमाणे जप्त करण्यात आलेल्या बेवारस/बंद स्थितीतील वाहने स्क्रॅप करून लिलावाद्वारे निर्लेखित करण्यात येतील.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गृहविभाग महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक ०९.१०.२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार महानगरपालिका पोलीस व आरटीओ यांच्या संयुक्त पथकाने रस्त्याच्या कडेला असलेले २६५ बेवारस/भंगार वाहने जप्त करण्यात आलेली आहेत ती बेवारस/भंगार वाहने घेऊन जाण्यासाठी जाहीर प्रकटनात नमुद केलेल्या विहीत मुदतीत वाहनधारकांकडून द्रव्यदंड भरून घेऊन वाहने सोडण्यास तसेच जे वाहनधारक विहीत मुदतीत वाहने घेऊन जाणार नाहीत त्यांची वाहने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४३८ नुसार स्क्रॅप करून जाहीर लिलावाद्वारे विक्री करणे व निर्लेखित करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९२८:-**

सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक असल्याने, मालमत्ता कर दर निश्चितीचा प्रस्ताव प्रशासनातर्फे दिनांक ०१/०२/२०१९ रोजीच्या स्थायी समिती सभेपूढे विषय क्रं.२१३ अन्वये सादर करण्यात आलेला होता. सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रशासनाने मागील वर्षीचेच कराचे दर सादर केलेले असल्यामुळे, सन

२०१८-२०१९ साठी लागू असलेले दर हे सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षासाठीही लागू राहतील, असे सर्वानुमते ठरले. त्यानुसार प्रस्तुत प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आली.

## प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेवुन फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचेच दर कायम करण्यात आले होते. सन २०१२-१३ ते मागील वर्षापर्यंत कोणतीही कर वाढ करण्यात आलेली नाही. सन २०१९-२०२० मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक, शैक्षणिक संस्था, भारत सरकारच्या मिळकती, मोबाईल टॉवर्स असे गट करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे,

०१. **निवासी** :- राहते घर, -माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७, दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.) धर्मादाय संस्था, स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था.

०२. **निवासेत्तर** :- वकीलाचे कार्यालये, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेली वस्तीगृहे, स्वतंत्र वस्तीगृहे.

०३. **व्यावसायीक** :- पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने व शासकीय कार्यालये, डॉक्टरांचे क्लिनीक, खाजगी हॉस्पीटल्स्, कमर्शीयल पेड पार्कींगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल. तसेच ज्या इमारती व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिल्या असतील अशा इमारतींनां सुध्दा व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल. **धार्मिक स्थळाच्या जागेवर जर व्यावसायीक वापर होत असेल तर त्यास व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल.**

०४. **शैक्षणिक संस्थाः-अ)** ज्या शैक्षणिक संस्था अनुदानित आहेत. अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३० टक्के व इतर कर निवासेत्तर दराने आकारण्यात येईल.
**ब)**ज्या शैक्षणिक संस्था विनाअनुदानित आहेत, इंजिनियरींग कॉलेज, मेडीकल कॉलेज अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३७.५ टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

०५. **भारत सरकारच्या मिळकतीः**-मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भारत सरकार व त्यांच्या अंगीकृत असलेली कार्यालये व इतर मिळकती यांना वापरानुसार कर आकारणी करून त्यांना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या सुविधानुसार एकूण कराच्या ७५ टक्के, ५० टक्के व ३३.३३ टक्के रक्कम सेवा शुल्क म्हणून वसूल करण्यात येईल.

०६. **मोबाईल टॉवर्सः**-टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार किंवा भाडेपट्टा करारनामानुसार यापैकी जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारण्यात येईल. तसेच बी.एस.एन.एल. व इतर दूर संचार कंपनीचे स्वतःच्या जागेत मोबाईल टॉवर असल्यास अशा मोबाईल टॉवरला तळाचे क्षेत्रफळानुसार रू.९००/- प्रती चौ.मी. प्रती महा दरानुसार कर आकारणी करण्यात येईल. तसेच अनाधिकृत टॉवर्सला मालमत्ता कराची दुप्पट शास्ती लागु राहील.

**०७. औद्योगीक**:-एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.

वरील संज्ञेत मोडत असलेल्या मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे राहील.

**०८. सामान्य करा बाबतचा तक्ता :-**

| सामान्य कराचा प्रकार वापराप्रमाणे | सध्याचे सामान्य कराचे दर | प्रस्तावित सामान्य कराचे दर |
|---|---|---|
| **१.** निवासी (उपरोक्त प्रमाणे) | ३०% | ३०% |
| **२.** निवासेत्तर (उपरोक्त प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| **३.** व्यावसायीक(उपरोक्त प्रमाणे) | ४५% | ४५% |
| **४.** औद्योगीक (उपरोक्त प्रमाणे) | ३६% | ३६% |
| **५.** अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| **६.** विना अनुदानित शैक्षणिक संस्था | ३७.५% | ३७.५% |

**०९. उपभोक्ता कर :-**

घनकचरा व्यवस्थापणेसाठी लागणारा खर्च शहरातील सर्व मिळकत धारकांकडुन उपभोक्ता कर म्हणुन वसुल करण्यासाठी खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**०१** निवासी वापराच्या मिळकतीस रू.१००/- उपभोक्ता कर आकारण्यात येईल.

**०२** निवासेत्तर, व्यावसायीक, शैक्षणिक, औद्योगिक वापराच्या मिळकतीस रू.५००/- उपभोक्ता कर आकारण्यात येईल.

**१०. नामांतर शुल्क :-**

खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

| निवासी व व्यावसायीक कर योग्य मुल्य | नामांतर शुल्क | |
|---|---|---|
| | (शहर, सिडको व औद्योगिक भागातील निवासी मिळकतींसाठी) | (शहर, सिडको भागातील व्यावसायीक मिळकतींसाठी) |
| रू. ०१ ते १०,०००/- | रू.१५००/- | रू.३०००/- |
| रू. १०,००१/- ते ५०,०००/- | रू.४५००/- | रू.९०००/- |
| रू. ५०,००१/- ते पुढे | रू.९०००/- | रू.१८,०००/- |
| **औद्योगिक वसाहतीतील व्यावसायीक मिळकतींसाठी** | | |
| रू.०१ ते ५०,०००/- | | रू.१८,०००/- |
| रू.५०,००१ ते १,००,०००/- | | रू.३०,०००/- |
| रू.१,००,०००/- च्या पुढे | | रू.७५,०००/- |

**११. अदत्त रकमेवरील शास्ती :-**

चालु मागणीचे बिल प्राप्त झाल्यानंतर अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रथम सहामाही देयकाची रक्कम ३० जुन पूर्वी व द्वितीय सहामाही देयकाची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरणे बंधनकारक आहे. जर कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशा अद्त रकमेबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण-८ कराधान नियम ४१ अन्वये प्रत्येक महिन्यासाठी कराच्या २ टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून द्यावी लागेल.

**११.१ अवैध इमारतीवर शास्ती बसविणे** :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २६७ (अ) नुसार दि.०१-०४-२००८ पासनु अवैध इमारतीवर शास्ती आकारण्यात येते.

उक्त नियमान्वये कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरीत्या बांधकाम करील किंवा पुर्नर बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरूध्द दाखल करता

येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी, अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटी इतकी शास्ती भरण्यास पात्र असेल तथापी,

शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३०५/नवि-२०, मंत्रालय मुंबई, दिनांक ११ जानेवारी २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनाधिकृत निवासी बांधकामासाठी शासनाने शास्तीची आकारणी खालील प्रमाणे करणे बाबत निर्देश दिलेले आहे.

| अ.क्र. | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारण्याच्या शास्तीवर दर |
|---|---|---|
| १. | ६०० चौ. फुटापर्यतचे निवासी बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये |
| २. | ६०१ ते १००० चौ. फुटापर्यतचे निवासी बांधकाम | प्रती वर्षी मालमत्ता कराच्या ५० टक्के दराने शास्ती आकारण्यात यावी. |
| ३. | १००१ चौ. फुटापुढील निवासी बांधकाम | प्रती वर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी (सध्याच्या दाराने) |

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा असे अवैध बांधकाम किंवा पुर्नर बांधकाम, ते अस्तित्वात असे तो पर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुर्नर बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही, मग असा कालावधी कितीही असो.

**(२)** पोट कलम (१) अन्वये देय असलेली शास्ती ही, जणू काही शास्तीची रक्कम ही अशा व्यक्तीकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये निर्धारीत करण्यात येते, करिता सदर शासन निर्णय प्रमाणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**१२. विशेष सवलती :-**

**१२.१** पाच वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षीक कराच्या सामान्य करात दोन वर्षाची सूट देण्यात येईल.

**१२.२** तीन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्या एक वर्षातील वार्षीक कराच्या सामान्य करात ५०% सूट देण्यात येईल.

**१२.३** जे मालमत्ताधारक चालु वर्षाचा खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील
त्यांना सन २०१९-२० करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |
| जुन | ६% |

जुलै ते मार्च पर्यंतच्या कालावधीत चालु आर्थिक वर्षातील मागणीवर तसेच थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

**१२.४. आजी/माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या** मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सन २०१९-२० या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एका मिळकतीस सामान्य करात १००% सूट दिली जाईल.

**१२.५** जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

**१२.६** जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्तेस रेन हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Harvesting System) लागु करतील, अशा मालमत्ताधारकास सामान्य करात २५% सवलत दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

**१२.७** जे मिळकतधारक नेट बॅकींग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्डव्दारे ऑन-लाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना अशा मिळकतधारकांना चालु आर्थिक वर्षातील मालमत्ता कराच्या सामान्य करात ५% सूट देय राहील.

**१३. <u>कर आकारणी प्रणाली</u> :-**

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या/जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन मुल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किमंती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागातील मूल्य (जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) होवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

**१३.१** सन २०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक ०१-०४-२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग हे मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.९८५ दि.२०-२-२०१० नुसार पूर्वी प्रमाणेच करण्यात आलेले होते. त्यानुसार सन २०१२ मध्ये देखील चार भाग करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सन २०१६ साठी शिघ्र शिध्द गणकाचे दर शासनातर्फे प्रसिध्द झाल्याने सन २०१७ मधील सिध्द शिघ्र गणकातील दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. खालील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

| अ. क्र. | विभाग | सन २०१२ च्या विभागानुसार मिळकतीचा सन २०१६-१७ पर्यंतचा प्रचलित दर प्रती चौ.मी. | सन २०१६ च्या विभागानुसार सन २०१७-१८ करीता प्रस्तावित मिळकतीचा दर प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | अ | रू.१७,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती | रू.४५,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| २ | ब | रू.१३,००० ते रू.१६,९९९/- | रू.३४,९०० ते रू.४४,९९९/- |
| ३ | क | रू.११,००० ते रू.९,९९९/- | रू.३१,७९९ ते रू.३४,८९९/- |
| ४ | ड | रू.८५०० ते रू.१०,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) | रू.२५,००० ते ३१,८००/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे. सदरील दर सन २०१९-२० साठी कायम ठेवण्यात यावेत.

**१४.** सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे आहेत.:-

### निवासी इमारत

**१४.१** निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. सन २०१८-१९ चे आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.६/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.८/- | रू.७/- | रू.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.८/- | रू.३/- | रू.२/- | रू.१/- |

**निवासेतर इमारत**

**१४.२ (अ)** सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/- | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.६/- | रू.३/- | रू.२/- |

**अनुदानीत शैक्षणिक संस्था**

**१४.३ (ब)** सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१३/- | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१२/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.११/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |

कायम विना अनुदानीत संस्था

**१४.४ (क)** सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१५/- | रू.१४/- | रू.१३/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

**व्यावसायीक इमारती**

**१४.५** सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२८/- | रू.२६/- | रू.२४/- | रू.२२/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.१०/- |

**१४.६ औद्योगिक क्षेत्रासाठी दर :-**

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन २०१८-१९ साठी आस्तीत्वातील दर सन २०१९-२० साठी कायम करण्यात यावे |
|---|---|---|
| | | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | १४.६४ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | १०.३२ |
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ११.६२ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ९.०४ |
| २ | कारखाना परिसरातील कॅन्टीन | २४.०० |
| ३ | गोदाम (आर.सी.सी.) | ९.६८ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ९.६८ |
| | अर्ध पक्के | ५.८२ |
| | कच्चे आणि विना छताचे | ३.२२ |
| ४ | शेड | २.५८ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | ३.८६ |
| ६ | मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.) | ११.४० |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ८.८२ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ७.१० |
| | कच्चे बांधकाम | ३.१० |
| ७ | निवासी क्षेत्र (आर.सी.सी.) | १६.१४ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | १२.९२ |
| | अर्धे पक्के बांधकाम | ११.४० |
| | कच्चे बांधकाम | ६.४४ |
| ८ | सहान जागा | |
| | कारखाना वापर | १२.०४ |
| | रिकामे | ९.०३ |

**१४.७** सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणी करीता प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी

भूखंडासाठी खुल्या जागेची आकारणी करीता खालील प्रमाणे प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.००/- | रू.२.५०/- | रू.२.००/- | रू.२/- |

**१४.८** सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर/व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळया जागेसाठी कर आकारणी करीता प्रती माह प्रती चौ.मी. आस्तीत्वातील दर सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी निवासेतर/व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळया जागेसाठी कर आकारणी करीता खालील प्रमाणे प्रती माह प्रती चौ.मी. कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात | रू.१२.५०/- | रू.१०.५०/- | रू.९.००/- | रू.७/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | | | | |

**टिप** :- मोकळ्या जागेची आकारणी करतांना फक्त सामान्य कर आकारण्यात येईल.

**१५.** मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०१८-२०१९ या वर्षाचे आस्तीत्वातील दर सन २०१९-२० कायम करण्यात यावे हे दर पुढील प्रमाणे :-

| **अ.क्र.** | **कराचे नांव** | **कर योग्य मुल्य रूपये** | **सन २०१८-१९ चे आस्तीत्वातील दर सन २०१९-२० साठी कायम करण्यात यावे** |
|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% |
| | | ४. औद्योगिक वापर | ३६% |
| | | ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% |
| | | ६. विना अनुदानित शै.संस्था | ३७.५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % |
| | | ४. औद्योगिक वापरासाठी | १०% |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % |
| ६ | पथकर | | २% |
| ७ | जललाभ कर | | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % |
| ९ | सेवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १० % |
| | | २. निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | १५ % |
| | | ३. औद्योगिक वापरासाठी | ५ % |
| | | ४. औद्योगिक वसाहतीतील निवासी वापर | १० % |
| १० | उपभोक्ता कर | निवासी वापरासाठी | १०० प्रती वर्ष |
| | | निवासेतर / व्यावसायीक वापरासाठी | ५०० प्रती वर्ष |

**१६** **शासनाचे कर** :- तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

वरील प्रमाणे सन २०१८-१९ चा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभे मध्ये ठेवला असता दि.१९-०३-२०१८ रोजीच्या सभेमध्ये सदरील प्रस्ताव अशंतः बदल करून विषय क्र. ३५२ नुसार खालील प्रमाणे ठराव घेण्यात आला.

**०१.** जे नागरीक ऑनलाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना सामान्य करात १ टक्के सुट ऐवजी ५ टक्के सूट मान्य करण्यात येते.

**०२.** शैक्षणिक संस्थाचे बाबतीत मा. सर्वसाधारण सभेने पारित केलेला ठराव क्र.५१०/ई दि.०७-१२-२०१४ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

**०३.** आजी-माजी सैनिक व स्वातंत्र सैनिकांना व त्यांचे पत्नीचे नावे असलेले एका निवासी मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सूट देय राहील व ही सूट संबधित मिळकतधारक ह्यात असे पर्यंत लागु राहील. त्यासाठी प्रत्येक वर्षी वार्ड कार्यालयाकडून मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

**०४.** समुहगृह योजना तसेच एकाच प्रकारचे फ्लॅट/ईमारती यांना या सर्व इमारतींना सारखाच मालमत्ता कर आकारण्यात यावा. एकाच योजनेत वेगवेगळ्या फ्लॅटधारकांना वेगवेगळी आकारणी करण्यात येवू नये.

व्यावसायीक इमारतीमध्ये ए.सी./प्लॉन्ट व मशीनरीची जागा असल्यास त्याचे कर योग्य मुल्य निवासी दराने करण्यात यावे.

व्यावसायीक इमारतीत इमारत मालक/भोगवटा वाहनतळाचा उपयोग व्यावसायीक स्वरूपात करत असेल तर अशा पार्कींग/वाहनतळास निवासेत्तर दराने कर आकारणीत करण्यात यावी. व त्यासाठी फक्त निवासेत्तर दराने (३७.५ टक्के) दराने सामान्य कर हा मालमत्ता कर म्हणून आकारण्यात यावा. त्यावर इतर कर आकारण्यात येवू नये.

प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे अनाधिकृत वसाहती / गुंठेवारी क्षेत्र या भागातील मालमत्तांना चालु वर्षापासुन कर आकारणी करण्यात येते ती पुढील वर्षासाठी सुरू ठेवणे बाबत विचारार्थ.

सातारा-देवळाई हा भाग दि.१८-०१-२०१६ रोजी महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आला आहे या भागात पूर्वीच्या नगरपालिकेने, सिडको प्राधिकरणाने तसेच पुर्वीच्या ग्रामपंचायती कार्यालयामार्फत बांधकाम परवानगी दिलेल्या ग्राह्य धरून अधिकृत बांधकामाची कर आकारणी करण्याची प्रचलित पध्दती पुढील वर्षासाठी सुरू ठेवण्यासाठी विचारार्थ.

वादग्रस्त व व्यावसायीक प्रकरणामध्ये अतिरिक्त आयुक्त-१, कर निर्धारक व संकलक, सहा. कर निर्धारक व संकलक व संबंधित वार्ड अधिकारी, यांना प्रकरण Out of court settelment करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

काही प्रकरणात वाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहतील.

दूहेरी नोंद/तिहेरी नोंद आढळल्यास ते रद्द करण्याचे अधिकार वार्ड अधिकारी यांना राहतील.

तसेच नामांतर प्रकणे अंतिम करण्याचे अधिकार संबंधित वार्ड अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

केंद्र शासनाचे इमारतींना सर्व्हीस चार्जची आकारणी मालमत्ता कराच्या ७५ टक्के ऐवजी ५० टक्के ३३ टक्के दराने आकारणीस मान्यता देण्यात येत आहे.

दि.१९-०३-२०१८ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभा विषय क्र. ३५२ नुसार झालेला ठराव हा सन २०१९-२० साठी कायम करणे योग्य.

करिता, वरील प्रमाणे सन २०१९-२० साठी मालमत्ता कर आकारणी व वसूलीचे दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :या प्रस्तावात माजी सैनिकांना मालमत्ता करामध्ये सवलत देणेबाबत मा.न्यायालयाचे जे निर्देश आहेत, त्याचा समावेश करून दुरुस्तीसह हा विषय मंजुर करण्यात येतो. तसेच

सन २०१८-१९ साठी असलेले मालमत्ता कराचे दर हे सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठीही लागू राहतील.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशी असलेल्या, देशासाठी प्राणाची बाजी लावून, जिवाची परवा न करता निस्वार्थपणे देशाची संरक्षण करतांना बजावण्यात आलेल्या उत्कृष्ट कामगिरी करीता संरक्षण दलातील शौर्य पदकधारकांना आणि माजी सैनिकांच्या विधवांना तसेच संरक्षण दलातील अविवाहीत शहीद झालेल्या सैनिकाच्या नामनिर्देशीत मालमत्ताधारकास व आजी व माजी सैनिक यांच्या स्वत:च्या/कुटूंबाच्या वापरासाठी असलेल्या एका निवासी मालमत्तेस मालमत्ताकर व इतर कर तसेच त्याच मालमत्तेसाठी असलेल्या घरगुती वापरासाठी असलेल्या अर्धाइंची नळ कनेक्शनसाठी लागणाऱ्या पाणीपट्टीतून पूर्णत: सुट देण्यात येते.

तसेच या मालमत्तेस कोणताही वाणिज्य अथवा इतर वापर सुरु झाल्यास त्यास नियमानुसार मालमत्ताकर व पाणीपट्टीची आकारणी करण्यात येईल. सदरची सवलत ही देशाच्या संरक्षणासाठी योगदान दिलेल्या किंवा देत असलेल्या सैनिकांचा व शहीदांचा सन्मान त्याचा कुटूंबाचा निवासाकरीता असलेल्या मालमत्तेस व त्याच मालमत्तेच्या पाणीपट्टी पुर्णत: सुट देवून सन्मान करण्यात येतो. या सवलतीसाठी पात्र ठरणाऱ्या व्यक्तीने जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

यापुर्वी मालमत्ता कराची आकारणी प्रत्यक्ष अथवा अंदाजित भाडेतत्वावर करण्यात येत होती. परंतु त्यामुळे सारख्याच क्षेत्रफळाच्या व वापराच्या मिळकतींच्या कर आकारणीत असमानता होत असे ती टाळण्यासाठी दिनांक ०१.०४.२००६ पासून भाडेतत्वावरील मालमत्ता कराची आकारणी बंद करून चटई क्षेत्रानुसार करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ज्या मालमत्ताधारकांचा मालमत्ताकर अद्यापही भाडेतत्वावर सुरु आहे. त्यांच्या करयोग्य मुल्यांची सुधारणा करून त्या मालमत्तांना इतर मालमत्तांप्रमाणे दिनांक ०१.०४.२००६ पासुन चटई क्षेत्रावरच आकारणी करण्यात यावी व संबंधीतांची जास्तीची मालमत्ता कराची रक्कम जमा असल्यास त्या रक्कमेचे समायोजन करण्यात यावे. तसेच माजी सैनिकांना मालमत्ता करामध्ये सवलत देणेबाबत मा.न्यायालयाचे जे निर्देश आहेत, त्याचा समावेश करणे तसेच स्थायी समितीने सादर केल्यानुसार सन २०१९-२०२० मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक, शैक्षणिक संस्था, भारत सरकारच्या मिळकती, मोबाईल टॉवर्स असे गट करण्यात आलेले आहे. या सर्व मिळकतींना सन २०१८-१९ साठी असलेले मालमत्ता कराचे दर हे सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठीही लागू करण्यास तसेच वर नमुद केल्याप्रमाणे दुरुस्तीसह वरील प्रस्तावास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९२९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०३ वेदांतनगर येथील रेखांकनातील खुल्या जागेत भगवान श्री.महावीर रिक्रीएशन हॉल बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन २०१७-१८ नुसार तयार करण्यात आले असून सदर कामासाठी अर्थसंकल्प सन २०१८-१९ मध्ये पान क्रमांक GBR-Zone-९ अ.क्र.४ पान क्रमांक-९९ र.रु.३ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. या कामासाठी करण्यात आलेल्या अंदाजपत्रकात खालील बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | विवरण | अ.प.र.रु. | शेरा |
|---|---|---|---|
| १. | स्थापत्य विषयक काम | १,९६,९३,५८३.०० | बांधकामासाठीचे अंदाजपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | उदवाहन (Lift) | ३६,००,०००.०० | स्थापत्य विषयक कामे पुर्ण झाल्यानंतर ही कामे हाती घेता येतील. |
| ३. | विद्युतीकरणासाठी | १५,७५,४८७.०० | |
| ४. | लॅण्ड स्पेकींगसाठी | १,००,००,०००.०० | |
| ५. | वातानुकूलीत यंत्रणेसाठी | २९,५४,०३७.०० | |
| ६. | श्री भगवान महावीर यांच्या मुर्तीसाठी | १०,००,०००.००. | |
| ७. | इतर किरकोळ खर्च | १९,४१,१५५.०० | |
| | **एकूण** | **४,०७,६४,२६२.००** | |

सदर कामाच्या अंदाजपत्रकाची संचिका लेखा विभागास आर्थिक तरतुद नोंदणीसाठी वर्ग केली असता, त्यांनी या कामासाठी अर्थसंकल्पात पुर्ण रक्कमेची तरतुद नसल्याने व या कामाचा प्रस्ताव १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे अंतर्गत पाठविण्यात आलेला असल्याने व या कामास अद्याप मान्यता झालेली नसल्याने सदर वस्तुस्थिती मा.सर्वसाधारण सभेच्या निदर्शनास आणून देणे बाबत व उचित निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे बाबत अभिप्राय नोंदविला आहे.

या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या प्राप्त पत्रानुसार सदर कामाचा प्रस्ताव त्यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे. मात्र त्यास अद्याप मान्यता झालेली नसल्याने सदरचे काम व यासाठी महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१८-१९ मध्ये रु.३.०० कोटीची तरतुद असल्याने सदर कामास मनपा स्तरावरून प्रशासकीय मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्याची विनंती स.सभागृहनेता यांनी केली आहे. सदरचे काम मोठ्या स्वरुपाचे असल्याने यासाठी किमान कालावधी १८ महिने लागण्याची शक्यता असल्याने या आर्थिक वर्षात आर्थिक तरतुद काही प्रमाणात खर्चीत झाल्यानंतर आर्थिक वर्ष सन २०१९-२० मध्ये शिल्लक तरतुद करता येईल. तसेच मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून या कामास मंजुरी प्राप्त झाल्यास प्राप्त होणाऱ्या निधी प्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल.

तरी एकूण अंदाजपत्रक र.रु.४,०७,६४,२६२/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे. बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

श्री.विकास जैन :यापूर्वी आपण संशोधन केंद्र करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणेच हे केंद्र उभारावे. माजी महापौर श्रीमती अनितानाताई घोडेले यांची घोषणा होती ते काम आज होत आहे. काम थांबले जाऊ नये. इस्क्रो अकाऊंट ओपन करावे यात रक्कम टाकावी. तर ते काम करणे सोपे जाईल.

श्री.गजानन बारवाल :हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.सचिन खैरे :मंजूर करावा. शहरातील सर्व लोकांना फायदा होणार आहे.

श्री.राजू शिंदे :इस्क्रो अकाऊंट ओपन करावे. स्मारक चांगले व्हावे. हे काम तातडीने मार्गी लावावे.

मा.महापौर :सदस्यांनी जी सुचना केली त्यानुसार निधीची कमतरता पडणार नाही. याची दखल घेऊन इस्क्रो अकाऊंट ओपन करावे. दररोज रु.१ लक्ष त्यात टाकावे. तसेच राज्य शासनाकडून एक रकमी पैसा मिळत असेल तर तसे प्रयत्न करावे. दुरूस्तीसह विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०३ वेदांतनगर येथील रेखांकनातील खुल्या जागेत भगवान श्री.महावीर रि-क्रीएशन हॉल बांधण्याचा कामाच्या प्रस्तावातील परिच्छेद क्र.०१ ते ०७ मधील दर्शविलेल्या विविध कामाच्या एकुण रक्कम रुपये ४,०७,६४,२६२/- च्या अंदापत्रकास मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील कामासाठी स्वतंत्र ESCROW खाते उघडण्यास व त्या खात्यामध्ये प्रति दिन महानगरपालिकेच्या निधीमधून रुपये एक लाख जमा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र व राज्य शासन अनुदानातून शहरातील विविध भागात जलनि:स्सारण वाहीनी टाकणे व सिव्हेज ट्रीटमेंट प्लान्ट बांधणे या कामा करीता रु.३६५.६९ कोटीचा प्रकल्प प्रस्ताव राज्य शासनाकडून लहान व मध्यम शहराच्या पायाभूत सोयी सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) अंतर्गत केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास केंद्र शासनाने त्यांच्या शहरी विकास मंत्रालयाचे पत्र क्रमांक/के/१४०११/१५/२०१३/युडी-१ दिनांक २४ डिसेंबर २०१३ च्या Office Memorandum नुसार मंजुरी प्रदान केली आहे.

सदर प्रकल्पासाठी रितसर निविदा कार्यवाही करण्यात आली असून निविदा कार्यवाही अंती मा.स्थायी समितीने ठराव क्रमांक-२३१ दिनांक २९.०४.२०१४ अन्वये मे.खिलारी इन्फ्रा प्रा.लि. आणि घारपुरे इंजि.कन्स्ट्रक्शन प्रा.लि.(जेव्ही) यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०.७८% जास्त दराची निविदा अंतिम केली आहे. निविदा अंतिम करतेवेळी लागू असलेली दरसुची सन २०१३-१४ नुसार तुलना केली असता, हे दर अं.प.दरापेक्षा केवळ २.१८% एवढे जास्त येतात.

सदर प्रकल्पातील कामाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष काम करतांना येणाऱ्या अडचणी व झालेले बदल या बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर दिनांक ३१.११.२०१६ रोजी सादर करण्यात आलेला होता. तथापि, मा.महापौर यांनी बदललेल्या परिस्थिती नुसार सुधारित प्रस्ताव सादर करण्याची सुचना प्रशासनाला केल्याने तसा सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सद्यस्थितीत प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ८८.४८% काम पुर्ण झाले आहे. प्रकल्पातील झालेल्या बदलाच्या अनुषंगाने तसा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल प्रकल्पाचे व्यवस्थापन सल्लागार यांनी सादर केला असून तो शिल्लक असलेली कामे पुर्ण करून प्रकल्प रु.३९०.०० कोटी मध्ये पुर्ण करण्यात येणार आहे. या बाबतचा तांत्रिक तपासणीसाठी प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मार्फत शासनास सादर करण्यात आला आहे. या योजनेत अंतर्गत पुर्व नियोजनानुसार व सविस्तर प्रकल्प अहवालात (DPR) नुसार रेल्वे पुलाच्या खालून अस्तित्वातील जलनि:स्सारण वाहीनी काढून त्या ठिकाणी नवीन मोठ्या व्यासाची मुख्य जलनि:स्सारण वाहीनी टाकण्याचे नियोजन होते. मात्र प्रत्यक्ष काम करण्यापुर्वी रेल्वे विभागाशी पत्रव्यवहार केला असता, त्यांनी नमुद केले की, रेल्वे विभागाचे नियम बदलले असून सुरक्षिततेच्या कारणास्तव आता रेल्वे पुलाच्या खालून जलनि:स्सारण वाहीनी टाकण्यास किंवा इतर काम करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यामुळे आता त्या ऐवजी रेल्वे ट्रॅकच्या खालून Trench less Technologhy द्वारे जलनि:स्सारण वाहीनी टाकण्याचे काम करावे असे निर्देशीत केले आहे. त्यानुसार रेल्वे विभागाने नमुद केल्यानुसार यासाठी Way leave charges तसेच planning & Design charges म्हणुन रु.६४.६१ लक्षचा भरणा त्यांच्याकडे करण्यात आला आहे. योजनेच्या तपशीलानुसार औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजनेअंतर्गत ५ ठिकाणी रेल्वे ट्रॅक खालून Trech less Technologhy वापरून जलनि:स्सारण वाहीनी टाकण्याचे काम करण्यात येत आहे. आतापर्यंत

रेल्वे ट्रॅक खालून झाल्टा भागात, प्रतापनगर, प्रशांतनगर व सिडको भागात रेल्वे ट्रॅक खालून जलनि:स्सारण वाहीनी टाकण्याचे काम पुर्ण करण्यात आले असून बनेवाडी येथे रेल्वे क्रॉसींगचे काम करणे गरजेचे आहे. पुर्व नियोजनानुसार या ५ ठिकाणाहून जलनि:स्सारण वाहीनी टाकण्याचे काम करण्यासाठी सुधारीत अंदाजपत्रकानुसार रु.७,८८,२६,३८५/- एवढा खर्च अपेक्षित होता. तथापि, बनेवाडी रेल्वे क्रॉसींगच्या ठिकाणी या योजनेचे नियोजन वर्ष २०३० विचारात घेऊन केलेले असल्याने व सद्यस्थितीत या ठिकाणचा मल-जलाचा प्रवाह एक मार्गी जलनि:स्सारण वाहीनी टाकण्याचे प्रस्तावीत आहे. बदललेल्या परिस्थितीनुसार या योजनेचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.फोट्रेस इन्फ्रा.ॲड. सर्व्हीसेस यांना सुचित केले असता, त्यांनी या ५ ठिकाणाचे रेल्वे ट्रॅक खालून जलनि:स्सारण वाहीनी टाकण्याच्या कामास सुधारित अनुमानानुसार रु.५.६० कोटी एवढा खर्च अपेक्षित असल्याचे पत्रान्वये कळविले आहे. या कामासाठीचे जे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्या अंदाजपत्रकातील बाबींचा समावेश सा.बां.दरसुचीमध्ये नसल्याने Micro Tunneling व Manual Jacking pushing Method साठी बृहन्मुंबई महानगरपालिका दरसुची सन-२०१३ व Indian Standard Trechless Society च्या दरसुची सन-२०१७, पुणे, मनपा दरसुची सन-२०१६ चा वापर करून सदरचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. यामध्ये काही आवश्यक बाबींसाठी बाजार भावातील दर घेण्यात आले आहेत. रेल्वे विभागाने महानगरपालिकेच्या विनंतीनुसार अशा प्रकारे काम करणेसाठी मंजुरी प्रदान केली असून तसे GAD मनपाला उपलब्ध करून दिले आहे. पुर्वी रेल्वे विभागाच्या सुचनेनुसार रेल्वे ट्रॅकच्या दोन्ही बाजुस ६ मीटर अंतरापर्यंत काम करणे आवश्यक होते. मात्र अंतिम मंजुरी देतेवेळी यामध्ये रेल्वे विभागाने बदल करून ज्या हद्दीपर्यंत रेल्वे रुळाच्या दोन्ही बाजुस त्याची जागा आहे. त्या हद्दीपर्यंत वरील पध्दत वापरून काम करणे बाबत कळविलेले आहे. व त्यानुसार काम करण्यात येत आहे. सुधारीत अनुमानानूसार सदर प्रकल्प रु.४६४.०० कोटी ऐवजी रु.३९० कोटी मध्येच पुर्ण होत आहे. रेल्वे विभागाच्या सुचनेनुसार या कामाच्या अंदाजपत्रकात बदल झाल्याने त्यांच्याकडे आवश्यक शुल्कांनी रक्कम यापुर्वीच भरणा करण्यात आलेली आहे.

तरी वरील परिच्छेदात नमुद नुसार रेल्वे विभागाने दिलेल्या अंतिम मान्यतेनुसार काम करणे अपरिहार्य असुन अशा प्रकारचे काम करणे ही बाब अतिरीक्त बाब ठरत असून यासाठी या योजनेचे मुळ कंत्राटदार मे.खिलारी इन्फ्रा.प्रा.लि.आणि घारपुरे इंजि.कन्स्ट्रक्शन प्रा.लि.(जेव्ही) यांना काम करणे बाबत विचारणा केली असता, सदरचे काम यासाठीच्या तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या खर्चात काम करणे बाबत संमती दर्शविली आहे. करीता, उपरोक्त नमुद प्रमाणे पाच ठिकाणी रेल्वे ट्रॅक च्या खालून जलनि:स्सारण वाहीनी टाकण्याच्या कामास अतिरीक्त बाब म्हणुन मान्यता देणे बाबतचा व सदरचे काम कामाचे मुळ कंत्राटदार मे.खिलारी इन्फ्रा.प्रा.लि. आणि घारपुरे इंजि.कन्स्ट्रक्शन प्रा.लि.(जेव्ही) यांच्याकडून करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :खिल्लारी कंपनीने अनेक कामे केली नाही. मोठा गॅप आहे शहरातील आतील लाईनचे काम बाकी आहे शहरातील कामे करणे व जॉईन्ट करणे जरूरी आहे. त्यानंतरच हा विषय मंजूर करावा.

श्रीमती किर्ती शिंदे :नियोजीत काम करणेसाठी शासनाची मंजूरी घेतली का? अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकरणाची मान्यता आहे का?

श्री.राजेंद्र जंजाळ :हा प्रस्ताव यापूर्वी आला होता त्यास फेटाळले होते. परंतु का आला? घेता येतो का? डीपीआर तयार केला, सभेने मान्यता दिली, राज्य शासनाची मान्यता घेतली. जेथे अतिक्रमण आहे तेथे लाईन टाकण्याचा त्यावेळी डीपीआर मंजूर

करून घेतला आता अतिक्रमण काढता येत नाही म्हणुन दुसरीकडून टाकल्या. तो खर्च वाढला. काही रस्त्यावरून टाकल्या तो खर्च वाढला व असा ठराव मांडण्याची वेळ आली. जे कंपनीने काम केले. समाधानकारक नाही. यास विरोध आहे. लाईन जोडल्या नाही. नक्षत्रवाडीत एसटीपी बनवला. तीथपर्यंत पाणी जाईल त्रृटी ठेवल्या. खुलासा घ्यावा.

श्री.राजू शिंदे :पीएमसीला काम दिले तर त्यांनी सर्व गोष्टी विचारात घेऊन काम केले पाहिजे. नैसर्गीक वाढ होणे. ठिक आहे. परंतु टेक्नीकल वाढ यात झाली. पीएमसीने केलेले काम बोगस आहे. त्यांचे पैसे थांबवावे असे सांगीतले होते.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रस्ताव फेटाळला होता. डीपीआर तयार करतांना त्यावेळी विचार का केला नाही? हा खर्च मनपाने का द्यायचा? प्रस्ताव फेटाळावा. जो खर्च येईल तो पीएमसीकडून वसुल करावा.

श्री.राजू शिंदे :यास विरोधच आहे परंतु चांगला मार्ग कसा काढता येईल? त्याप्रमाणे काम करावे. मा.आयुक्तांच्या स्तरावर कार्यवाही करावी. पीएमसीचे पेमेंट थांबवून ठेवावे. त्या पीएमसीची चौकशी केली पाहिजे ही पीएमसी त्यास सलग्न आहे का? ही चौकशी करावी.

मा.महापौर :पीएमसी बाबत वेगळी टिप्पणी ठेवावी. प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजनेअंतर्गत ५ ठिकाणी रेल्वे ट्रॅकच्या खालून ट्रेंचलेस टेक्नॉलॉजी वापरून मुख्य जलनि:स्सारण वाहीनी टाकणे, यासाठीच्या अंदाजपत्रकीय खर्च रु.५.६० कोटीच्या कामास मान्यता प्रदान करण्यात येत असून यासाठी आवश्यक असलेले रेल्वे विभागाचे सेवा शुल्क अदा करणे तसेच सभागृहात झालेल्या चर्चेत नमूद प्रमाणे या योजनेअंतर्गत ज्या अतिरीक्त बाबी होत आहेत त्यास व योजनेअंतर्गत ज्या बाबींच्या परिमाणामध्ये १५०% पेक्षा अधिकची वाढ होत आहे. ती कामे कामाचे मुळ कंत्राटदार मे.खिल्लारी इन्फ्रा.प्रा.लि. आणि घारपुरे इंजि.कन्स्ट्र.कं.प्रा.लि. (जेव्ही) यांच्याकडून करून घेणेस्तव व सुधारीत प्रकल्प किंमत रु.३६९.०० कोटीच्या मर्यादेत राहून काम अंतिम करणे बाबत (Fore closure) मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विश्वशांती विपश्यना केंद्र भिमटेकडी, सुभाषनगर, जटवाडा रोड, औरंगाबाद येथे सन १९९० पासुन आहे. येथे गेल्या २० वर्षापासुन बौध्द महिला धम्म परिषद आयोजित केले जाते. या धम्म परिषदेला संपुर्ण महाराष्ट्रातून व देश-विदेशातुन बौध्द भिक्खु व भिक्खुनी, उपासक-उपासिका व नामांकित साहित्यीक-विचारवंत या परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित असतात. त्याच बरोबर १०/१० दिवसांचे विपश्यना शिबीर घेण्यात येतात. त्याच बरोबर अनागरिका प्रशिक्षण शिबीर, उपासक-उपासिका प्रशिक्षण शिबीर, बाल संस्कार शिबीर, भिक्खुनी ट्रेनिंग सेंटर, आर्थिक दृष्टीने कमजोर असलेले मुला-मुलींचे सामुदायिक विवाह आयोजीत केले जातात. दारु व्यसन मुक्ती शिबीर मागील २० वर्षापासून सातत्याने विनामुल्य शासनाचा कुठलाही निधी न घेता उपक्रम आयोजीत केले जातात.

विश्वशांती बौध्द विहारामध्ये बौध्द धम्माचे प्रशिक्षण सर्व स्तरावरील संपूर्ण महाराष्ट्र राज्यातुन उपासक-उपासिकांना दिल्या जाते. त्यामध्ये सहभागी होतात. तसेच विटभट्टी कामगार व आर्थिक

बाबतीत शुन्य असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक छोटी इंग्लिश शाळा विनामुल्य चालवल्या जाते. त्यामुळे विशेषत: मराठवाड्यामध्ये एक धार्मिक केंद्र म्हणुन बौध्द उपासक, आंबेडकरी अनुयायीचे श्रध्दास्थान मानले जाते.

तसेच विपश्यना केंद्र राज्य सरकारच्या धार्मिक व सांस्कृतीक व ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्वाच्या स्थळ आहे. पर्यटन क्षेत्रातील दर्जा या स्थळाला मिळण्याकरीता राज्य शासनाला महानगरपालिका औरंगाबाद सर्वसाधारण सभेमध्ये एक मताने ठराव पारीत करून महाराष्ट्र शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी ठराव पाठविण्या करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती जयेश अभंग

**अनुमोदक:-**श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड, श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे, श्रीमती आशा विजय निकाळजे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिमटेकडी, सुभाषनगर, जटवाडा रोड येथे सन १९९० पासुन असलेले विश्वशांती विपश्यना केंद्रास पर्यटन क्षेत्रातील दर्जा या स्थळाला मिळण्याकरीता राज्य शासनाला महानगरपालिका औरंगाबाद सर्वसाधारण सभेमध्ये एक मताने ठराव पारीत करून महाराष्ट्र शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी ठराव पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती शाईस्ता परवीन मोहम्मद हमजा पटेल या सहाय्यक शिक्षिका उर्दु प्राथमिक शाळा, महानगरपालिका शाळा क्र.०३ अमरावती येथे सध्या कार्यरत आहे. परंतु त्यांचे पती श्री.मुन्सीफ खान हे महेंद्रा ॲग्री सोल्युशन्स लि.औरंगाबाद या कंपनीमध्ये कार्यरत असून व त्यांचा मुलगा श्री.मुस्तफा अजलान खॉन औरंगाबाद येथे वॉईज स्कूल (Wise School) येथे शिकत आहे. तसेच यांचे सासू-सासरे हे सुध्दा औरंगाबाद स्थायीक असून त्यांच्या देखभालीसाठी यांची जिल्हा बदली अमरावती महानगरपालिका शाळेतून औरंगाबाद महानगरपालिकेत करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ **अनुमोदक:-**श्री.रामेश्वर बाबुराव भादवे

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती शाईस्ता परवीन मोहम्मद हमजा पटेल, सहाय्यक शिक्षिका, उर्दु प्राथमिक शाळा, महानगरपालिका शाळा क्र.०३ अमरावती यांची जिल्हा बदली अंतर्गत अमरावती महानगरपालिका शाळेतून औरंगाबाद महापालिकेत करण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६६ येथे नागरीकांच्या मागणीनुसार व त्यांच्या सोयीकरीता खालील नमुद तक्त्यामधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| सन २०१८-१९ मधील मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली कामे | र.रु. (हजारात) | च्या ऐवजी | र.रु. (हजारात) |
|---|---|---|---|
| **लेखाशिर्षक:नाला** | ५०००/- | **लेखाशिर्षक: शहरी भागात खुल्या गटारी** | १०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| **ट्रेनिंग कामे**<br>६. कैलासनगर येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे. GBR-Zone-09–P.No.102, | | वॉर्ड क्र.६६ अंतर्गत कैलासनगर येथील राम मंदिराजवळील गटार दुरुस्त करणे व ढापे बसविणे. | |
| | | वॉर्ड क्र.६६ अंतर्गत रोकडीया कॉलनी येथील श्री.सुशिल बजाज यांच्या गल्लीतील गटार दुरुस्त करणे व ढापे बसविणे. | ५००/- |
| | | वॉर्ड क्र.६६ अंतर्गत गौतमनगर येथील गटार दुरुस्त करणे. | ५००/- |
| | | **लेखाशिर्षक:जलनि:सारण देखभाल दुरुस्ती**<br>वॉर्ड क्र.६६ अंतर्गत श्रीनिकेतन कॉलनी येथील श्री.प्रशांत नागरे यांच्या घराजवळील ड्रेनेज लाईनचे काम करणे. | १०००/- |
| | | वॉर्ड क्र.६६ अंतर्गत मिलींदनगर येथील विविध ठिकाणचे ड्रेनेज लाईनचे काम करणे. | १०००/- |
| | | वॉर्ड क्र.६६ अंतर्गत श्री.बेलसरे यांच्या गल्लीत कॉंक्रीटींग करणे. | १०००/- |

**सुचक:-**श्रीमती आशा नरेश भालेराव **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६६ येथे खालील नमुद तक्त्यामधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलास मंजुरी देण्यात येते.

| सन २०१८-१९ मधील मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली कामे | र.रु. (हजारात) | च्या ऐवजी | र.रु. (हजारात) |
|---|---|---|---|
| **लेखाशिर्षक:नाला ट्रेनिंग कामे**<br>६. कैलासनगर येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे. GBR-Zone-09–P.No.102, | ५०००/- | **लेखाशिर्षक: शहरी भागात खुल्या गटारी**<br>वॉर्ड क्र.६६ अंतर्गत कैलासनगर येथील राम मंदिराजवळील गटार दुरुस्त करणे व ढापे बसविणे. | १०००/- |
| | | वॉर्ड क्र.६६ अंतर्गत रोकडीया कॉलनी येथील श्री.सुशिल बजाज यांच्या गल्लीतील गटार दुरुस्त करणे व ढापे बसविणे. | ५००/- |
| | | वॉर्ड क्र.६६ अंतर्गत गौतमनगर येथील गटार दुरुस्त करणे. | ५००/- |
| | | **लेखाशिर्षक:जलनि:सारण देखभाल दुरुस्ती**<br>वॉर्ड क्र.६६ अंतर्गत श्रीनिकेतन कॉलनी येथील श्री.प्रशांत नागरे यांच्या घराजवळील ड्रेनेज लाईनचे काम करणे. | १०००/- |
| | | वॉर्ड क्र.६६ अंतर्गत मिलींदनगर येथील विविध ठिकाणचे ड्रेनेज लाईनचे काम करणे. | १०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वॉर्ड क्र.६६ अंतर्गत श्री.बेलसरे यांच्या गल्लीत कॉंक्रीटींग करणे. | १०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८४, ज्ञानेश्वरी कॉलनी येथील मनपाच्या शाळेमधील शौचालय हे बऱ्याच दिवसांपासून मोडकळीस आलेले असून मुलींना/मुलांना शौचालयासाठी अतिशय त्रास सहन करावा लागत आहे. सदरील शौचालय हे विमान प्राधिकरण अधिकारी यांच्या निधीमधून नविन शौचालय बांधून देत असुन त्याकरीता मोडकळीस आलेले शौचालय निष्काशित करून नविन शौचालय उभारण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.कमलाकर शामराव जगताप **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८४, ज्ञानेश्वरी कॉलनी येथील मनपाच्या शाळेमधील मोडकळीस आलेले शौचालय निष्काषित करून विमान प्राधिकरण अधिकारी यांच्या निधीमधून नविन शौचालय उभारण्यासाठी परवानगी देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जयशिवशंकर बहुउद्देशिय सामाजिक व शैक्षणिक संस्था ही संस्था सन-२०१० पासून विविध सामाजिक व शैक्षणिक कामांमध्ये कार्यरत आहे. या संस्थेमार्फत विविध उपक्रमाअंतर्गत वृक्षारोपण करण्यात आलेले आहे. शालेय स्तरावर मुलांना व बचतगटांसाठी विविध ठिकाणी लोककलेच्या माध्यमातून समाज प्रबोधन केले आहे. 'पाणी अडवा पाणी जिरवा' हा उपक्रम राबविण्यात आलेला आहे. तसेच समाजामध्ये स्वच्छतेचे महत्व समजावून सांगणे असे विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आलेले असून अनेक उल्लेखनिय कामे करण्यात आलेली आहेत.

या संस्थेच्या माध्यमातून विविध कला क्षेत्रात आपले भवितव्य घडू इच्छिणाऱ्या युवकांसाठी औरंगाबाद जिल्ह्यातील तसेच मराठवाडा क्षेत्रातील कलावंतांना योग्य ते मार्गदर्शन करून कलाक्षेत्रात उंच भरारी घेण्यासाठी व देश पातळीवर त्यांचे नाव होऊन त्यांचे भवितव्य घडविण्यासाठी या संस्थेच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यासाठी जयशिवशंकर बहुउद्देशीय सामाजिक व शैक्षणिक संस्था संचलित कला अकादमीच्या माध्यमातून मराठवाड्यातील होतकरू कलावंतांचे भवितव्य घडविणे यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेचे एन-२ येथील कम्युनिटी सेंटर हे नाममात्र भाडेतत्वावर देण्यात यावे. जेणेकरून या ठिकाणी कला क्षेत्राशी निगडीत सर्व उपक्रम राबविण्यात येईल व नाट्य क्षेत्रातील, नृत्य क्षेत्रातील तसेच संगीत क्षेत्रातील चांगले कलावंत येथून घडविता येतील.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे **अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप

श्रीमती सत्यभामा शिंदे :मा.महापौर सदरील कम्युनिटी सेंटर हे जयशिवशंकर बहुउद्देशिय सामाजीक व शैक्षणिक संस्थेस २९ वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात यावे.

मा.महापौर :विषय मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद जिल्ह्यातील तसेच मराठवाडा क्षेत्रातील कलावंतांना योग्य ते मार्गदर्शन करून कलाक्षेत्रात उंच भरारी घेण्यासाठी व देश पातळीवर त्यांचे नाव होऊन त्यांचे भवितव्य घडविण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेचे एन-२ येथील कम्युनिटी सेंटर जयशिवशंकर बहुउद्देशिय सामाजिक व शैक्षणिक संस्थेस २९ वर्षाच्या कालावधीसाठी अटी व शर्तीच्या अधिन राहून नियमानुसार नाममात्र भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०५ अंतर्गत राहुलनगर, सादातनगर येथे असलेले NUHM अंतर्गत हॉस्पीटल आहे. तसेच सदरील ठिकाणी नागरीकांच्या वारंवार मागणी नुसार या हॉस्पीटलचे नाव “हजरत सय्यद सादात साहब (रहे) हॉस्पीटल” असे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद **अनुमोदक:-**श्री.खान अय्युब मं.हुसेन खान

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०५ अंतर्गत राहुलनगर, सादातनगर येथे NUHM अंतर्गत असलेल्या दवाखान्यास “हजरत सय्यद सादात साहब (रहे) हॉस्पीटल” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर अंतर्गत विविध विकास कामांचे सन २०१८-२०१९ या वर्षाच्या अर्थसंकल्पामधून लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत एकनाथनगर येथील मनपाच्या खुल्या जागेजवळील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे. (GBR-Zone-09–P.No.102,Sr.No.5) (र.रु.२५.०० लक्ष.) | वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत एम.आय.डी.सी. कॉलनी येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. (र.रु.२५.०० लक्ष.) |
| वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत गिरजामाता मंदिर येथे विविध विकास कामे करणे. (GBR-Zone-09–P.No.100,Sr.No.13 (र.रु.२५.०० लक्ष.) | वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत कल्पना हौसिंग सोसायटी अंतर्गत विविध ठिकाणी विकास कामे करणे. (र.रु.२५.०० लक्ष.) |
| वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत कोकणवाडी येथे विविध विकास कामे करणे. (GBR-Zone-09–P.No.100,Sr.No.16) (र.रु.२५.०० लक्ष.) | वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत कोकणवाडी, नवयुग कॉलनी, विवेकानंद कॉलनी येथे विविध विकास कामे करणे. (र.रु.२५.०० लक्ष.) |

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन **अनुमोदक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०३, वेदांतनगर अंतर्गत खालील विविध विकास कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत एकनाथनगर येथील मनपाच्या खुल्या जागेजवळील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे. (GBR-Zone-09–P.No.102,Sr.No.5) (र.रु.२५.०० लक्ष.) | वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत एम.आय.डी.सी. कॉलनी येथे विविध ठिकाणी सिमेंट कॉँक्रीटीकरण करणे. (र.रु.२५.०० लक्ष.) |
| वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत गिरजामाता मंदिर येथे विविध विकास कामे करणे. (GBR-Zone-09–P.No.100,Sr.No.13) (र.रु.२५.०० लक्ष.) | वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत कल्पना हौसिंग सोसायटी अंतर्गत विविध ठिकाणी विकास कामे करणे. (र.रु.२५.०० लक्ष.) |
| वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत कोकणवाडी येथे विविध विकास कामे करणे. (GBR-Zone-09–P.No.100,Sr.No.16) (र.रु.२५.०० लक्ष.) | वॉर्ड क्र.१०३ अंतर्गत कोकणवाडी, नवयुग कॉलनी, विवेकानंद कॉलनी येथे विविध विकास कामे करणे. (र.रु.२५.०० लक्ष.) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९३८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा-बेगमपुरा मधील नागरीकांच्या मागणीनुसार खालील प्रमाणे जुने लेखाशिर्ष बदलून देण्यात यावे.

| अ.क्र | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा येथे विविध ठिकाणी पथदिवे व पोलची व्यवस्था करणे. लाईट स्पील पेज नं.३२७, रु.१५.०० लक्ष. | १) पहाडसिंगपुरा येथे विविध ठिकाणी नविन पोल व पथदिव्यांची व्यवस्था करणे. रु.२०.०० लक्ष. |
| २ | वॉर्ड क्र.१२, बेगमपुरा येथे ट्युब फिटींग काढून नविन उर्जा बचत पथदिवे लावणे. लाईट स्पील पेज नं.३२७, रु.०५.०० लक्ष. | |
| ३ | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा मधील सतपालनगर येथे सिमेंट रस्त्याचे कॉँक्रीटीकरण करणे. एससीआर-झोन-०१-पेज नं.२,रु.२०.०० लक्ष. | २) पहाडसिंगपुरा, बेगमपुरा येथे हायमास्ट मिनी हायमास्ट, उर्जा बचत फिटींग बसविणे. रु.२०.०० लक्ष. |
| ४ | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा येथे विविध ठिकाणी विद्युत पथदिवे व एलईडी लाईट व खांब उभे करणे.एससीआर-झोन-०१-पेज नं.३,रु.१०.०० लक्ष. | ३) पहाडसिंगपुरा येथे विविध ठिकाणी सिमेंट रस्ता कॉँक्रीटींग करणे. रु.१०.०० लक्ष. |
| ५ | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा, देवनंदी येथे सिमेंट रस्त्याचे कॉँक्रीटींग करणे. एससीआर-झोन-०१-पेज नं.२, रु.७.०० लक्ष. | ४) पहाडसिंगपुरा मधील जैस्वाल प्लॉटींग येथे खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे. रु.०७.०० लक्ष. |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सचिन सुर्यकांत खैरे **अनुमोदक:-**श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा-बेगमपुरा येथे खालील प्रमाणे जुने लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा येथे विविध ठिकाणी पथदिवे व पोलची व्यवस्था करणे. लाईट स्पील पेज नं.३२७, रु.१५.०० लक्ष. | १) पहाडसिंगपुरा येथे विविध ठिकाणी नविन पोल व पथदिव्यांची व्यवस्था करणे. रु.२०.०० लक्ष. |
| २ | वॉर्ड क्र.१२, बेगमपुरा येथे ट्युब फिटींग काढून नविन उर्जा बचत पथदिवे लावणे. लाईट स्पील पेज नं.३२७, रु.०५.०० लक्ष. | |
| ३ | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा मधील सतपालनगर येथे सिमेंट रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. एससीआर-झोन-०१-पेज नं.२,रु.२०.०० लक्ष. | २) पहाडसिंगपुरा, बेगमपुरा येथे हायमास्ट मिनीहायमास्ट, उर्जा बचत फिटींग बसविणे. रु.२०.०० लक्ष. |
| ४ | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा येथे विविध ठिकाणी विद्युत पथदिवे व एलईडी लाईट व खांब उभे करणे.एससीआर-झोन-०१-पेज नं.३,रु.१०.०० लक्ष. | ३) पहाडसिंगपुरा येथे विविध ठिकाणी सिमेंट रस्ता कॉंक्रीटींग करणे. रु.१०.०० लक्ष. |
| ५ | वॉर्ड क्र.१२, पहाडसिंगपुरा, देवनंदी येथे सिमेंट रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. एससीआर-झोन-०१-पेज नं.२, रु.७.०० लक्ष. | ४) पहाडसिंगपुरा मधील जैस्वाल प्लॉटींग येथे खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे. रु.०७.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९३९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७४ येथील नागरीकांच्या मागणीनुसार व त्यांच्या सोयी करीता खालील नमुद तक्त्यामधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| सन २०१८-१९ मधील मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली कामे | र.रु. (हजारात) | च्या ऐवजी | र.रु. (हजारात) |
|---|---|---|---|
| **लेखाशिर्षक:नविन पथदिवे व्यवस्था पोलसहित**<br>१. वॉर्ड क्र.७४ अंतर्गत पथदिवे लावणे. GBR-Zone-09–P.No.98, | १०००/- | **लेखाशिर्षक:भांडवली कामे पाणी पुरवठा**<br>वॉर्ड क्र.७४ अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे. | १०००/- |
| **लेखाशिर्षक:नविन पथदिवे व्यवस्था पोलसहित**<br>२. वॉर्ड क्र.७४ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे. GBR-Zone-09–P.No.98, | ५००/- | **लेखाशिर्षक:भांडवली कामे पाणी पुरवठा**<br>वॉर्ड क्र.७४ अंतर्गत शिवशंकर कॉलनी तसेच विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे. | ५००/- |

**सुचक:-**श्री.नितीन दशरथ साळवी **अनुमोदक:-**श्री.सिध्दांत संजय शिरसाट

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७४ येथे खालील नमुद तक्त्यामधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलास मंजुरी देण्यात येते.

| सन २०१८-१९ मधील मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली कामे | र.रु. (हजारात) | च्या ऐवजी | र.रु. (हजारात) |
|---|---|---|---|
| **लेखाशिर्षक:नविन पथदिवे व्यवस्था पोलसहित**<br>१. वॉर्ड क्र.७४ अंतर्गत पथदिवे लावणे. GBR-Zone-09–P.No.98, | १०००/- | **लेखाशिर्षक:भांडवली कामे पाणी पुरवठा**<br>वॉर्ड क्र.७४ अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे. | १०००/- |
| **लेखाशिर्षक:नविन पथदिवे व्यवस्था पोलसहित**<br>२. वॉर्ड क्र.७४ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे. GBR-Zone-09–P.No.98, | ५००/- | **लेखाशिर्षक:भांडवली कामे पाणी पुरवठा**<br>वॉर्ड क्र.७४ अंतर्गत शिवशंकर कॉलनी तसेच विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे. | ५००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८२, अंबिकानगर, मुकूंदवाडी येथील लेखाशिर्षकात बदल करून देण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामांचे लेखाशिर्ष | त्याऐवजी करावयाचे कामांचे नाव |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.८२, अंबिकानगर अंतर्गत मुकूंदवाडी गाव स्मशानभूमी मध्ये विविध विकाम कामे करणे. (रु.२० लक्ष) GBR-Zone-06–Sr.No.01-P.No.67, | १. वॉर्ड क्र.८२ अंतर्गत न्यु एस.टी.कॉलनी (म्हसोबा गल्ली ते जाधव ते तुपे यांच्या गल्लीत सिमेंट रस्ता तयार करणे. (रु.२० लक्ष) |
| २ | वॉर्ड क्र.८२, अंबिकानगर अंतर्गत पाणी पुरवठा लाईन टाकणे (रु.२० लक्ष) GBR-Zone-06–Sr.No.02-P.No.70, | २. वॉर्ड क्र.८२ अंबिकानगर अंतर्गत महालक्ष्मी कॉलनी येथे सिमेंट रस्ता तयार करणे. (रु.२० लक्ष) |

**सुचक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप

**अनुमोदक:-**श्री.सोहेल शकील शेख, श्री.खान अय्युब मं.हुसैन खान

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८२, अंबिकानगर, मुकूंदवाडी येथे लेखाशिर्षक बदलास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामांचे लेखाशिर्ष | त्याऐवजी करावयाचे कामांचे नाव |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.८२, अंबिकानगर अंतर्गत मुकूंदवाडी गाव स्मशानभूमी मध्ये विविध विकाम कामे करणे. (रु.२० लक्ष) GBR-Zone-06–Sr.No.01-P.No.67, | १. वॉर्ड क्र.८२ अंतर्गत न्यु एस.टी.कॉलनी (म्हसोबा गल्ली ते जाधव ते तुपे यांच्या गल्लीत सिमेंट रस्ता तयार करणे. (रु.२० लक्ष) |

| | | |
|---|---|---|
| २ | वॉर्ड क्र.८२, अंबिकानगर अंतर्गत पाणी पुरवठा लाईन टाकणे (रु.२० लक्ष) GBR-Zone-06–Sr.No.02-P.No.70, | २. वॉर्ड क्र.८२ अंबिकानगर अंतर्गत महालक्ष्मी कॉलनी येथे सिमेंट रस्ता तयार करणे. (रु.२० लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेले नविन कामाची यादी अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील वॉर्ड क्र.९५ अंतर्गत तरतुद केलेल्या कामाचे लेखाशिर्षक बदलण्या करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

| पान क्रमांक | अ.क्र. | जुने कामाचे नाव | नविन कामाचे नाव |
|---|---|---|---|
| GBR-Zone-07, P.No.74 | २८ | वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विजय नगर येथे श्री.गायकवाड यांच्या घरापासून ते श्री.नामदेव बनकर ते श्री.मदन यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता बनवणे. रु.२० लक्ष. | वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे, अप्रुटींग करणे, मेन होल दुरुस्त करणे. रु.१० लक्ष. |

**सुचक:-**श्रीमती मोरे ज्योती राजाराम **अनुमोदक:-**श्रीमती शोभा गुरुलिंगअप्पा बुरांडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९५ अंतर्गत तरतुद केलेल्या कामाचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक | अ.क्र. | जुने कामाचे नाव | नविन कामाचे नाव |
|---|---|---|---|
| GBR-Zone-07, P.No.74 | २८ | वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विजय नगर येथे श्री.गायकवाड यांच्या घरापासून ते श्री.नामदेव बनकर ते श्री.मदन यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता बनवणे. रु.२० लक्ष. | वॉर्ड क्र.९५ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे, अप्रुटींग करणे, मेन होल दुरुस्त करणे. रु.१० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भारताचे पंतप्रधान स्व.अटलबिहारी वाजपेयी यांचे जीवनकार्याची आठवण सतत स्मरणात रहावी म्हणुन त्यांचे स्मारक आपल्या शहरात असावे अशी औरंगाबाद शहरातील नागरीकांची मागणी आहे. त्यासाठी शहरातील श्रीमती देसरडा राखी प्रशांत यांच्या वॉर्ड क्रमांक ६५ सुराणा नगर भागातील कॅनॉट प्लेस येथे सदरील स्मारक उभारणेसाठी व येथे असलेल्या महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याचे व परिसराचे सुशोभिकरण करणेचा प्रस्ताव तसेच उभारणेसाठी आवश्यक निधी रक्कम रुपये २५.०० कोटी निधी महाराष्ट्र शासनाकडून उपलब्ध होणेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ, श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्री.विकास रतनलाल जैन

**अनुमोदक:-**श्रीमती राखी प्रशांत देसरडा, श्री.राजु रामराव शिंदे, श्री.दिलीप गंगाधर थोरात, श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड, श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे, श्री.विजय साईनाथ औताडे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्रमांक ६५ सुराणा नगर भागातील कॅनॉट प्लेस येथे स्व.अटलबिहारी वाजपेयी यांचे स्मारक उभारणेसाठी व येथे असलेल्या महाराणा प्रताप यांच्या पुतळ्याचे व परिसराचे सुशोभिकरण करणेसाठी र.रु.२५.०० कोटी निधी महाराष्ट्र शासनाकडून उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे संत एकनाथ रंगमंदिर अद्यावत करणेसाठी प्रेक्षागृहाच्या खुर्च्या बदलणे, स्टेज वुडण फ्लोरिंग बदलणे, प्रेक्षागृहात वुलन कारपेट बसविणे, ग्रीनरुमचे नुतनीकरण करणे, सर्व स्वच्छतागृहांचे नुतनीकरण करणे, छताचे पत्रे बदलणे, प्रेक्षागृहाच्या सिलिंगचे कामे व अग्निशमन व्यवस्था इत्यादी कामे करणेसाठी सुमारे र.रु.२२५.०० लक्ष रकमेस आणि वातानुकुलित व्यवस्था, प्रेक्षागृहातील विद्युत व्यवस्था आणि ध्वनी व्यवस्था इत्यादी कामे करणेसाठी सुमारे र.रु.२७५.०० लक्ष असे एकुण ५००.०० लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त असुन निविदा प्रक्रिया करुन कार्यादेशअंती सदरील कामे प्रगतीपथावर आहेत. सदरील कामे जिल्हा नियोजन योजने अंतर्गत प्राप्त रु.२००.०० लक्ष शासन निधी आणि रु.३००.०० लक्ष मनपा निधी मधुन प्रस्तावित आहे.

तसेच संत एकनाथ रंगमंदिर अद्यावत करणेसाठी बाल्कनी खालील फॉल सिलींग, वॉल ॲकॉस्टीक, वॉल पॅनलिंग, बांबु मंडपी, कलर पॉलीस्टर फायबर शीट, सिलींगसाठी ग्लास ऊल, ॲकॉस्टींक डोअर, ॲल्युमिनिअम पार्टीशन, इलिव्हेशन टाईल्स्, पॅनल रूम, ए.एच.यु.प्लॅटफॉर्म, इमारतीस रंग-रंगोटी इत्यादी सिव्हील कामे तसेच एल.ई.डी. नामफलक, ध्वनीक्षेपण व्यवस्थेतील उर्वरीत कामे, स्टेज पडदे व पडदे संबंधीतील विद्युतीकरण, यांत्रिकीकरण इत्यादी कामे करणेसाठी लागणारी आवश्यक तरतुद अर्थसंकल्पात उपलब्ध नाही. त्यामुळे यासाठी तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

करीता संत एकनाथ रंगमंदिर अद्यावत करणेस्तव उपरोक्त प्रमाणे विविध प्रकारचे सिव्हील कामे करणेसाठी रक्कम रू.१,४९,४०,३०८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तसेच एल.ई.डी. नामफलक, ध्वनीक्षेपण व्यवस्थेतील उर्वरीत कामे, स्टेज पडदे व पडदे संबंधीतील विद्युतीकरण, यांत्रिकीकरण इत्यादी कामे करणेसाठी रक्कम रू.१,४९,७१,६१२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. यानुसार संत एकनाथ रंगमंदिर अद्यावत करणेसाठी उक्त कामे करणेसाठी सुमारे र.रु.३००.०० लक्ष अतिरीक्त तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे. यानुसार संत एकनाथ रंगमंदिर अद्यावत करणेच्या सर्व प्रकारच्या कामासाठी सुमारे एकुण रु.८००.०० लक्ष (र.रु.आठ कोटी) खर्च येणार आहे.

विषयांकित प्रकरणी मा.महापौर आणि स.पदाधिकारी यांच्यासह मा.महापौर यांच्या दालनात झालेल्या बैठकीतील चर्चा व सुचनेनुसार सिध्दार्थ उद्यान येथील मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालयाचे पहिल्या मजल्याचे बांधकाम करणेसाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत प्राप्त निधी रक्कम रू.३००.०० लक्ष प्राप्त असुन, सिध्दार्थ उद्यानातील मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालयाच्या इमारतीच्या पहील्या मजल्याचे बांधकाम तांत्रिक अडचणीमुळे करणे शक्य नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासनाच्या परवानगीने सदर रक्कम संत एकनाथ रंगमंदिर अद्यावत करणेसाठी वळती करणेबाबत सुचित करण्यात आले आहे.

तरतुद उपलब्धतेअंती वरील उर्वरीत नमुद स्वरूपांच्या कामांसाठी स्वतंत्र तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेअंती अल्प मुदतीची निविदा बोलावुन अथवा परिस्थितीनूरूप चालु असलेल्या कामात सुधारीत अंदाजपत्रके तयार करून वरील बाबींची शिल्लक कामे तातडीने हाती घेणे आवश्यक आहे.

करीता उक्त परिस्थितीतील मान्यतेनुसार संत एकनाथ रंगमंदिर अद्यावत करणेसाठी रु.३००.०० लक्ष तरतुद उपलब्ध करून देणेच्या मान्यतेसह उपरोक्त सिव्हील व विद्युतीकरण कामांचे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा. महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंगमंदिर अद्यावत करणे अंतर्गत विविध स्थापत्य कामे करणेसाठी र.रु.१५०.०० लक्ष आणि ध्वनीक्षेपणाच्या चालू असलेल्या कामातील उर्वरीत बाबींची कामे करणेसाठी तसेच एल.ई.डी.नामफलक, स्टेज, पडदे व पडदे संबंधीतील विद्युतीकरण, यांत्रिकीकरण इ.कामे करणेसाठी र.रु.१५०.०० लक्ष अशी एकूण र.रु.३००.०० लक्ष अतिरीक्त तरतुद उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येते.

वरील तरतुदी मधून संत एकनाथ रंगमंदिर अद्यावत करणेसाठी विविध स्थापत्य कामे करणे या मुळ मंजुर अ.प.र.रु.४९,९९,९९३/- च्या प्रगतीपथावर असलेल्या कामात तयार करण्यात आलेले सुधारीत अंदाजपत्रक र.रु.१,१९,३३,३२२/- यास व सदरील कामात ज्या बाबी मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट आहेत. त्या बाबींची कामे मंजुर निविदा दर १२% जास्त दराने आणि अतिरीक्त बाबींची कामे चालू दरसुची सन २०१८-२०१९ नुसार तसेच दरसुचीत नसलेल्या बाबींची कामे मार्केट दरानुसार दरपृथ्थकरण करून आलेल्या अंदाजपत्रकीय दराने या कामाचे मुळ कंत्राटदार श्री.काझी मोहम्मद मुबारीशउद्दीन यांचेकडून करून घेणेस मान्यता देण्यात येते.

तसेच संत एकनाथ रंगमंदिर येथे ध्वनी व्यवस्था करणे या मुळ मंजुर अं.प.र.रु.४९,९९,९९६/- च्या प्रगतीपथावर असलेल्या कामात तयार करण्यात आलेले सुधारीत अंदाजपत्रक र.रु.१,०६,३१,८७५/- यास व सदरील कामात ज्या बाबी मुळ अंदाजपत्रात समाविष्ट आहेत. त्या बाबी मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट आहेत. त्या बाबींची कामे मंजुर निविदा दर १५.५०% कमी दराने आणि अतिरीक्त बाबींची कामे चालु दरसुची सन २०१८-२०१९ नुसार तसेच दरसुचीत नसलेल्या बाबीची कामे मार्केट दरानुसार दरपृथ्थकरण करून आलेल्या अंदाजपत्रकीय दराने या कामाचे मुळ कंत्राटदार मे.ओव्हरसीज इलेक्ट्रॉनिक्स, पुणे यांचेकडून करून घेणेस मान्यता देण्यात येते.

तसेच संत एकनाथ रंगमंदिर येथे विद्युतीकरण करणे या मुळ मंजुर अं.प.र.रु.४९,०१,२३८/- च्या प्रगतीपथावर असलेल्या कामाच्या अंदाजपत्रकासोबत पुर्वीच समाविष्ट असलेले परंतु निधीअभावी विद्युतीकरणाच्या कामासोबत हाती न घेलेले काम, च्भाग-बछ सोलार सिस्टीमच्या कामाची र.रु.५६,९५,०४०/- प्रगतीपथावरील कामाच्या रकमेत एकत्रित सुधारित अं.प.र.रु.१,०५,९६,२७८/- यास व सदरील कामात ज्या बाबी मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट आहेत, त्या बाबींची कामे मंजुर निविदा १.५% कमी दराने आणि अतिरीक्त बाबींची च्भाग-बछ ची कामे चालू दरसुची सन २०१८-१९ नुसार तसेच दरसुचीत नसलेल्या बाबींची कामे मार्केट दराननुसार दरपृथ्थकरण करून आलेल्या अंदाजपत्रकीय दराने या कामाचे मुळ कंत्राटदार मे.न्यु इरा इलेक्ट्रिकल्स, औरंगाबाद यांचेकडून करून घेणेस मान्यता देण्यात येते.

या व्यतिरीक्त उर्वरीत कामे अल्प मुदतीची निविदा काढून हाती घेणेस्तव मान्यता देण्यात येते.

तसेच सिध्दार्थ उद्यान येथील मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालयाचे पहिल्या मजल्याचे बांधकाम करणेसाठी जिल्हा नियोजन समितीकडून र.रु.३००.०० लक्ष प्राप्त निधी काही तांत्रिक अडचणीमुळे तेथे खर्च करणे शक्य नसल्याने जिल्हा प्रशासनाच्या परवानगीने सदर र.रु.३००.०० लक्ष संत एकनाथ रंगमंदिर येथील चालू असलेल्या अद्यावत करणेच्या कामासाठी वळती करणेसाठी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१८-२०१९ मधील वॉर्ड क्र.२१ येथे खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधा करीता बदलण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र.व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| अ.क्र.०७ GBR पान क्र.०१ आर्थिक तरतुद रु.२५ लक्ष | वॉर्ड क्र.२१ अंतर्गत डांबरीकरण करणे बाबत. | वॉर्ड क्र.२१, बुद्धीलेन, कबाडीपुरा अंतर्गत शाहजमाल बाबा कब्रस्तान येथे संरक्षित भिंत बांधणे बाबत. आर्थिक तरतुद रु.२५ लक्ष |

**सुचक:-**श्रीमती परवीन कैसर खान **अनुमोदक:-**श्री.सचिन सुर्यकांत खैरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२१ येथे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र.व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| अ.क्र.०७ GBR पान क्र.०१ आर्थिक तरतुद रु.२५ लक्ष | वॉर्ड क्र.२१ अंतर्गत डांबरीकरण करणे बाबत. | वॉर्ड क्र.२१, बुद्धीलेन, कबाडीपुरा अंतर्गत शाहजमाल बाबा कब्रस्तान येथे संरक्षित भिंत बांधणे बाबत. आर्थिक तरतुद रु.२५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली सन २०१८-२०१९ करीता जीबीआर झोन ०१ अंतर्गत नविन कामे विकास योजने अंतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे अंतर्गत आदर्श रस्ते पान क्रमांक १८ वरील अनुक्रमांक ०२ हर्सुल ते पिसादेवी रोड २४ मी. रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.०३.७५ कोटी | १. प्रभाग क्रमांक ०७, मयुरपार्क अंतर्गत पिसादेवी रोड ते यशोदा निकम यांचे घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.०१.७५ कोटी<br>२. प्रभाग क्रमांक ०७, मयुरपार्क अंतर्गत वडाचे झाड ते प्रकाश चव्हाण यांचे घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.०२.०० कोटी. |

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-०७ येथे खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करण्यासाठी लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामाचे नाव | करावयाचे कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली सन २०१८-२०१९ करीता जीबीआर झोन ०१ अंतर्गत नविन कामे विकास योजने अंतर्गत | १. प्रभाग क्रमांक ०७, मयुरपार्क अंतर्गत पिसादेवी रोड ते यशोदा निकम यांचे घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.०१.७५ कोटी. |

| | | |
|---|---|---|
| | मुलभूत सुविधा पुरविणे अंतर्गत आदर्श रस्ते पान क्रमांक १८ वरील अनुक्रमांक ०२ हर्सुल ते पिसादेवी रोड २४ मी. रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.०३.७५ कोटी | २. प्रभाग क्रमांक ०७, मयुरपार्क अंतर्गत वडाचे झाड ते प्रकाश चव्हाण यांचे घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.०२.०० कोटी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक, ०७, मयुरपार्क अंतर्गत एसबीओए शाळेसमोरील चौकास माजी पंतप्रधान “अटल बिहारी वाजपेयी चौक” तसेच या ठिकाणी भव्य प्रवेशद्वार बांधणेस व त्यास अटल बिहारी वाजपेयी प्रवेशद्वारे असे नाव देण्याबाबत या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. नागरीकांच्या मागणीचा साहनुभूतीपुर्वक विचार करून या चौकास अटल बिहारी वाजपेयी चौक व प्रवेशद्वारास “अटल बिहारी वाजपेयी प्रवेशद्वार” असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक, ०७, मयुरपार्क अंतर्गत एसबीओए शाळेसमोरील चौकास माजी पंतप्रधान “अटल बिहारी वाजपेयी चौक” तसेच याच ठिकाणी भव्य प्रवेशद्वार बांधुन त्या प्रवेशद्वारास “अटल बिहारी वाजपेयी प्रवेशद्वार” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-०७, मयुरपार्क अंतर्गत सर्व्हे नं.१७९/१ अंबिकानगर चौकास सरपंच “कै.शंकर पाटील औताडे चौक” तसेच या ठिकाणी भव्य प्रवेशद्वार बांधणेस व त्यास सरपंच “कै.शंकर पाटील औताडे प्रवेशद्वार” असे नाव देण्याबाबत या परिसरातील न गरीकांची मागणी आहे. नागरीकांच्या मागणीचा साहनुभूतीपुर्वक विचार करून या चौकास सरपंच “कै.शंकर पाटील औताडे चौक” व प्रवेशद्वारास सरपंच “कै.शंकर पाटील औताडे प्रवेशद्वार” असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक, ०७, मयुरपार्क अंतर्गत सर्व्हे नं.१७९/१ अंबिकानगर चौकास सरपंच “कै.शंकर पाटील औताडे चौक” तसेच याच ठिकाणी भव्य प्रवेशद्वार बांधून त्यास सरपंच “कै.शंकर पाटील औताडे प्रवेशद्वार” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-०७, मयुरपार्क अंतर्गत हर्सुल टी पॉईंट येथील चौकास “हरसिध्दी माता चौक” असे नाव देण्याबाबत या परिसरातील नागरीकांची मागणी आहे.

नागरीकांच्या मागणीचा साहनुभूतीपुर्वक विचार करून या चौकास “हरसिध्दी माता चौक” असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक, ०७, मयुरपार्क अंतर्गत हर्सुल टी पॉईंट येथील चौकास “हरसिध्दी माता चौक” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९४९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक, ०७, मयुरपार्क अंतर्गत गट क्रमांक १८८ मधील चौकास “छत्रपती शंभूराजे चौक” असे नाव देण्याबाबत या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. नागरीकांच्या मागणीचा साहनुभूतीपुर्वक विचार करून या चौकास “छत्रपती शंभूराजे चौक” असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक, ०७, मयुरपार्क अंतर्गत गट क्रमांक १८८ मधील चौकास “छत्रपती शंभूराजे चौक” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक, ०७, मयुरपार्क मधील श्रीनिवास किराणा दुकानाच्या बाजुला असलेल्या चौकास “माता तुळजा भवानी चौक” असे नाव देण्याबाबत या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. नागरीकांच्या मागणीचा साहनुभूतीपुर्वक विचार करून या चौकास “माता तुळजा भवानी चौक” असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक, ०७, मयुरपार्क मधील श्रीनिवास किराणा दुकानाच्या बाजुला असलेल्या चौकास “माता तुळजा भवानी चौक” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक, ०७,मयुरपार्क मधील वडाच्या झाडाच्या बाजुला असलेल्या चौकास “छत्रपती शिवाजी महाराज चौक” असे नाव देण्याबाबत या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. नागरीकांच्या मागणीचा साहनुभूतीपुर्वक विचार करून या चौकास “छत्रपती शिवाजी महाराज चौक” असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-०७, मयुरपार्क मधील वडाच्या झाडाच्या बाजुला असलेल्या चौकास "छत्रपती शिवाजी महाराज चौक" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक, ०७,मयुरपार्क मधील उद्यानास "स्व.सौ.अनिता साईनाथ औताडे उद्यान" असे नाव देण्याबाबत या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. नागरीकांच्या मागणीचा सहानुभूतीपुर्वक विचार करून मयुरपार्क मधील उद्यानास "स्व.सौ.अनिता साईनाथ औताडे उद्यान" असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक, ०७, मयुरपार्क मधील उद्यानास "स्व.सौ.अनिता साईनाथ औताडे उद्यान" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८ अंतर्गत एन-१ ही उच्चभ्रु वसाहत आहे व एन-सिडको सेक्टर बी-सेंट लॉरेन्स शाळेसमोर मोठ्या प्रमाणात मोकळी जागा उपलब्ध असल्याने तसेच या ठिकाणी जॅपनीज गार्डन तयार करण्याची नागरीकांची मागणी असल्याने सदर ठिकाणी पुणे जिल्ह्यात असलेल्या याच प्रकारचे जॅपनीज गार्डन प्रमाणे आपल्या शहरात सुध्दा एन-१, सिडको येथे जॅपनीज गार्डन तयार झाल्यास नागरीकांना सुविधा होईल व शहराच्या विकासात व सौंदर्यात भर पडेल व शहरातल्या सर्व नागरीकांना उत्कृष्ट पध्दतीचे जॅपनीज गार्डन सुविधा उपलब्ध होईल.

करीता, जॅपनीज गार्डन तयार करण्यासाठी रु.०५ कोटी रुपयांची तरतुद स्मार्ट सिटी अंतर्गत करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके

मा.महापौर :विषय मंजुर.

श्री.राजू शिंदे :हे काम करणेसाठी टोकन अमाऊंट ठेवावी.

मा.महापौर :रू.५० लक्ष टोकन अमाऊंट स्मार्ट सीटीतून ठेवू. तात्काळ कार्यवाही करावी. मंजूर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८ अंतर्गत एन-सिडको सेक्टर बी-सेंट लॉरेन्स शाळेसमोर मोकळ्या जागेत जॅपनीज गार्डन तयार करण्यास व सदरील कामासाठी रु.०५ कोटीची तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.मुजाहीद अब्दुल जलील शेख हे वॉर्ड क्र.२२ अंतर्गत लोटाकारंजा, औरंगाबाद येथील रहिवासी असून भिवंडी मनपा प्राथमिक शिक्षण विभागात ऊर्दु माध्यम शाळेमध्ये सहशिक्षक या पदावर कार्यरत आहे आणि त्यांच्या आई-वडील वृध्दावस्थेत वयस्कर असून त्यांची देखभालीसाठी व प्रक्रुती असल्याने त्यांची काळजी घेणारे कोणीही नाही. यामुळे यांना आपल्या

औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवर पदस्थापना मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती तसनीम बेगम अब्दुल रऊफ **अनुमोदक:-**श्री.कादरी जमीर अहेद रहीम अहेमद
मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.मुजाहीद अब्दुल जलील शेख, सहशिक्षक, ऊर्दु माध्यमीक शाळा, भिवंडी यांची बदली जिल्हा बदली अंतर्गत औरंगाबाद महापालिकेत करण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०५ अंतर्गत खालील तरतुद वळतीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्पातील नविन कामाचे नाव व तरतुद | करावयाचे कामाचे नाव व रक्कम |
|---|---|
| वॉर्ड क्र.०५ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे.SCR-zone-4, P.No.17, Sr.No.02 तरतुद रु.२५.०० लक्ष | वॉर्ड क्र.०५ अंतर्गत वानखेडेनगर, होणाजीनगर, एन-१३, सी-सेक्टर येथे १००,१५०,२०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.०७ जलवाहिनी टाकणे. रु.०५.०० लक्ष. |

**सुचक:-**श्री.राजगौरव हरिदास वानखेडे **अनुमोदक:-**श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०५ अंतर्गत खालील तरतुद वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अर्थसंकल्पातील नविन कामाचे नाव व तरतुद | करावयाचे कामाचे नाव व रक्कम |
|---|---|
| वॉर्ड क्र.०५ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे.SCR-zone-4, P.No.17, Sr.No.02 तरतुद रु.२५.०० लक्ष | वॉर्ड क्र.०५ अंतर्गत वानखेडेनगर, होणाजीनगर, एन-१३, सी-सेक्टर येथे १००,१५०,२०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.०७ जलवाहिनी टाकणे. रु.०५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७० अंतर्गत नागरीकांच्या मागणीनुसार व त्यांच्या सोयीकरीता खालील नमुद तक्त्यामधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| सन २०१८-१९ मधील मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली कामे | र.रु. (हजारात) | च्या ऐवजी | र.रु. (हजारात) |
|---|---|---|---|
| **लेखाशिर्षक: विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण**<br>१. प्रभाग क्र.७०, पदमपुरा अंतर्गत विविध विकास कामे करणे. | ५०००/- | **लेखाशिर्षक:जलनि:स्सारण देखभाल दुरुस्ती**<br>वॉर्ड क्र.७० अंतर्गत सोनार गल्ली येथील ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे | १५००/- |
| | | **लेखाशिर्षक:जलनि:स्सारण देखभाल** | १०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| SCR-zone-09, P.No.40 | | **दुरुस्ती**<br>वॉर्ड क्र.७०, पदमपुरा येथील ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे. | |

**सुचक:-**श्री.गजानन रामकिसन बारवाल **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७० येथे खालील नमुद तक्त्यामधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलास मंजुरी देण्यात येते.

| सन २०१८-१९ मधील मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली कामे | र.रु. (हजारात) | च्या ऐवजी | र.रु. (हजारात) |
|---|---|---|---|
| **लेखाशिर्षक: विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण**<br>१. प्रभाग क्र.७०, पदमपुरा अंतर्गत विविध विकास कामे करणे.<br>SCR-zone-09, P.No.40 | ५०००/- | **लेखाशिर्षक:जलनि:स्सारण देखभाल दुरुस्ती**<br>वॉर्ड क्र.७० अंतर्गत सोनार गल्ली येथील ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे | १५००/- |
| | | **लेखाशिर्षक:जलनि:स्सारण देखभाल दुरुस्ती**<br>वॉर्ड क्र.७०, पदमपुरा येथील ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे. | १०००/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९५७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१९ मधील मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र.व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| जीबीआर झोन-१, पान क्र.०६ अ.क्र.५५ | १. वॉर्ड क्र.१९, सलमान हिल ते डॉ.सोहेल सर यांच्या घरापासून सिमेंट रस्ते तयार करणे.<br>आर्थिक तरतुद रु.१२ लक्ष | १. वॉर्ड क्र.१९, निशात हौ.सो.येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षण भिंत बांधणे.<br>या कामासाठी आर्थिक तरतुद वळती करणे. |

**सुचक:-**श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद

**अनुमोदक:-**श्रीमती शेख नरगीस सलीम, श्री.अजीम अहेमद रफिक

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१९ मधील मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र.व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| जीबीआर झोन-१, पान | १. वॉर्ड क्र.१९, सलमान हिल ते | १. वॉर्ड क्र.१९, निशात हौ.सो.येथील |

| | | |
|---|---|---|
| क्र.०६ अ.क्र.५५ | डॉ.सोहेल सर यांच्या घरापासून सिमेंट रस्ते तयार करणे.<br>आर्थिक तरतुद रु.१२ लक्ष | मनपाच्या खुल्या जागेस संरक्षण भिंत बांधणे.<br>या कामासाठी आर्थिक तरतुद वळती करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९५८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा-देवळाई परिसर महानगरपालिका हद्दीमध्ये दिनांक २६.०२.२०१६ रोजी समाविष्ट झाला. सदर परिसर मोठ्या प्रमाणात विकसीत होत असून सन २०११ च्या जनगणनेनुसार या भागाची लोकसंख्या ५०,५७७ इतकी आहे. शहरासाठी असलेल्या अस्तित्वातील १०० दलली व ५६ दलली या दोन्ही योजनांद्वारे उपलब्ध होणारे कमी पाणी परिमाण व शहराची आजची २४० दलली मागणी यामध्ये असलेली मोठी तफावत पाहता, शहराला ३ दिवसाआड पाणी पुरवठा करावा लागत आहे.

शासन निर्णय क्र:संकीर्ण २०१२/प्र.क्र.२४/नवि-१६, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.२७ जुन २०१२ नुसार उपरोक्त हद्द वाढीमुळे समाविष्ट झालेल्या सातारा-देवळाई भागासाठी नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य योजनेअंतर्गत पाणी पुरवठा क्षेत्रासाठी अर्थसहाय्य मिळणार आहे. त्यानुसार शासन निणर्यामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे सातारा-देवळाई भागासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या माध्यमातून पाणी पुरवठा योजनेसाठी रु.४१५.७३ कोटी रुपये खर्चाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. प्रकल्प अहवालास मान्यतेस्तव आणि शासनाकडे निधी उपलब्धतेसाठी सादर करणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :या विषयी पावर पॉईन्ट प्रेझेन्टेशन नुसार माहिती देण्यात येत आहे. सर्वांनी शांततेने ऐकावे त्यानंतर आपले प्रश्न उपस्थित करावे.

(या वेळी डीपीआर संदर्भात पावर पॉईन्ट प्रेझेन्टेशननुसार माहिती देण्यात येते.)

श्री.राजू शिंदे :यापूर्वी भुमिगत गटार योजना शासनाने मंजूर केली, काम चालू झाले. मध्यंतरीच शासनाची स्किम बदलली. त्यामूळे त्यानंतर महापालिकेला जो हिस्सा टाकायचा होता तो वाढला त्यामूळे कर्ज घ्यावे लागते. डीएसआर बदलणे, स्किमला वेळ होणे त्या सर्व गोष्टीचा विचार करून वाढीव होणारी किंमत यात समावेश करून दिली पाहिजे. २० टक्के रक्कम भरण्याचे नियोजन काय आहे? ८० टक्के शासन अनुदान देणार आहे.

मा.महापौर :हा डीपीआर २६ फेब्रुवारी २०१९ पर्यंत पाठवायचा आहे.

श्री.राजू शिंदे :तात्काळ शासनाकडे पाठवावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :हा भाग महापालिकेत येणेपूर्वी शहरातील अनेक भाग महापालिकेत आहे जे की तेथे पाणी व ड्रेनेजची सुविधा नाही. ते लोक टॅक्स भरतात सुविधा नाही. असे असतांना तेथे नो-नेटवर्क एरिया म्हणुन संचिका मंजूर होत नाही. ज्या प्रमाणे या भागासाठी डीपीआर तयार केला तसाच शहरातील इतर भागातील जे लोक २४-२५ वर्षापासून राहतात त्यांना सुविधा नाही. तेथेही सुविधा देणेसाठी डीपीआर करावा. १८ खेडी समाविष्ट केले तेथेही विकास नाही. माझे वार्डात सुध्दा काही भागात पाणी व ड्रेनेज लाईन नाही.

श्री.सचिन खैरे :१८ खेडी मनपात समावेश केले तेथे अद्याप विकास नाही. तेथेही कामे करावीत.

मा.महापौर :उर्वरीत भागाचाही डीपीआर वेगळा तयार करण्यात यावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :माझे वार्डात मोठमोठ्या इमारती झाल्या. त्यांना पाणी दिले जात नाही. पुंडलिकनगर, हनुमाननगर, विश्रांतीनगर, जयभवानीनगर, मुकूंदवाडी, रामनगर, एसटी कॉलनी पर्यंत पाण्याची लाईन नाही. अशा भागात कामे करणेसाठी डीपीआर केला पाहिजे.

श्री.सचिन खैरे :डीपीआर बरोबर केला आहे का? चेक करावे.

श्री.विकास जैन :महत्वाचा विषय आहे शासन यास ८० टक्के अनुदान देणार आहे. आजही ३०-४० टक्के भागात पाण्याची व्यवस्था नाही. वेळेवर प्रस्ताव आणला तातडीने शासनाकडे पाठवावा.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रस्ताव आला, अभिनंदन. मयूरपार्क, हर्सूल, राधास्वामी कॉलनी, भगतसिंग नगर भागातही सुविधा दिल्या पाहिजे. तेथील लोकांनी बेटरमेंट चार्जेस भरणा केले आहे. सर्व शहरातील काम करणे बाबतचा डिपीआर तयार करून कामे करावीत.

मा.महापौर :सदस्यांनी केलेल्या सुचनाचा विचार करावा. प्रशासनाने दखल घेऊन दुरूस्ती करून त्या दुरूस्तीचे अधिकार मा.आयुक्तांना देण्यात येते. इतर भागांसाठी कामे करणेसाठी सुचना केल्या त्याचीही दखल घ्यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :या भागात दोन तलाव आहे. तेथून पाणी उपलब्ध करता येईल का? ते पहावे. विचार करावा. त्याचा समावेश डीपीआरमध्ये करावा.

मा.आयुक्त : स्मार्ट सिटीच्या अंतर्गत सर्व सर्व्हे करणेचे काम सुरू केले आहे.

श्री.विकास जैन :महत्वाचा विषय आहे. यासाठी शासन ८० टक्के अनुदान देणार आहे. जुन्या शहरातील ३० ते ४० टक्के भागात आजही पाणी पाणीपुरवठा होत नाही. यास मंजुरी देण्यात यावी व हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

मा.महापौर :विषय दुरुस्तीसह मंजुर करण्यात येतो. या बाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येतात. तातडीने हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फेब्रुवारी २०१६ मध्ये महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या सातारा-देवळाई परिसरास पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. शासन निर्णय क्र:संकीर्ण २०१२/प्र.क्र.२४/नवि-१६, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.२७ जुन २०१२ नुसार उपरोक्त हद्द वाढीमुळे समाविष्ट झालेल्या सातारा-देवळाई भागासाठी नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत पाणी पुरवठा क्षेत्रासाठी अर्थसाहाय्य मिळणार आहे. त्यानुसार शासन निर्णयामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे सातारा-देवळाई भागासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या माध्यमातून पाणी पुरवठा योजनेसाठी रु.४१५.७३ कोटी खर्चाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. या प्रकल्प अहवालास मान्यतेस्तव नगर परिषद प्रशासन संचालनालय, शासनास मान्यतेस्तव सादर करणे, तांत्रिक/इतर तपासणी/परवानगी व त्यासाठी आवश्यक फी अदा करावयाची कार्यवाही करणे, शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध करून घेणे, योजनेसंदर्भाने वेळोवेळी आवश्यक पत्र व्यवहार करणे, मान्यतेनंतर या करीता स्वतंत्र लेखाशिर्ष अंतर्गत आवश्यक आर्थिक तरतुद करणे,

स्वतंत्र बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडणे, शासन निर्णयानुसार एकूण प्रकल्प किंमतीच्या २०% रक्कम भरणा बाबत हमीपत्र शासनास सादर करणे, तसेच शासन निर्णयानुसार अनुषंगीक कार्यवाही करण्याकरीता मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्राधिकृत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९५९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६४, गुलमोहर कॉलनी अंतर्गत सेक्टर-एच मधील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१७-१८ च्या एसएसआर नुसार रक्कम रु.५७,७६,०१४/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील लेखाशिर्ष नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा मधून प्रस्तावीत आहे. सदरील कामास दिनांक १६.०८.२०१८ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे.

करीता अंदाजपत्रक रक्कम रु.५७,७६,०१४/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६४, गुलमोहर कॉलनी अंतर्गत सेक्टर-एच मधील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेच्या काम मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील लेखाशिर्ष नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा मधून करण्याच्या र.रु.५७,७६,०१४/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९६०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६६ अंतर्गत कैलासनगर ते लक्ष्मणचावडी या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक राज्य दरसुची (SSR) सन २०१८-१९ नुसार रक्कम रु.९९,९९,२१४/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पातील नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येणार असून सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.

करीता प्रस्तावीत कामाचे रक्कम रु.९९,९९,२१४/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :या रस्त्यातील खांब अद्याप काढले नाही त्या पोटी दीड कोटी रूपये भरायचे होते का भरले नाही? तीन दिवसात कार्यवाही करावी.

श्री कैलास गायकवाड :पुढचे कामच करता येत नाही. काम बंद ठेवले आहे. पैसे भरणे आवश्यक आहे. कैलासनगर भागात मंदीराच्या बाजूला काहींनी अतिक्रमण केले ते प्रकरण कोर्टात आहे स्टे मिळाला. मनपाने काय कार्यवाही केली? जे कोर्टात गेले बसैयेनगर ले-आऊट व त्यांचा काही संबंध नाही. बॉण्डवर ती प्रॉपर्टी दाखवल्यामुळे जे की, रस्त्यात आमचे घरे बाधीत आहे असे दाखवले. मनपाचे म्हणणे कोर्टात मांडावे. या रस्त्याच्या संदर्भात काही केसेस दाखल आहे त्या संदर्भात सीव्हील अप्लीकेशन दाखल केले आहे. ते मनपाने कशासाठी दाखल केले? हा रस्ता ४० वर्षापूर्वी विकास आराखड्यात मंजूर असून तो रस्ता सरळ करायचा आहे. सी.ए. का दाखल केला?

श्री.सचिन खैरे :त्या रस्त्यावर अतिक्रमण झाले ते काढावे. स्मशानमारोती समोर अतिक्रमण आहे.

मा.महापौर :श्री.एस.एस.कुलकर्णी यांनी पाहणी करून कार्यवाही करावी. विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६६ अंतर्गत कैलासनगर ते लक्ष्मणचावडी या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे तयार करण्यात आलेले र.रु.९९,९९,२१४/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१००, ज्योतीनगर अंतर्गत विविध विकास कामांचे सन २०१८-२०१९ या वर्षाच्या अर्थसंकल्पामधून लेखाशिर्ष बदलण्याचा व स्थळ बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव |
|---|---|
| **लेखाशिर्ष:शहरीभागात पुनर्डांबरीकरण करणे.** वॉर्ड क्र.१०० अंतर्गत ज्योतीनगर भागातील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणे. GBR-zone-09, P.No.92, Sr.No.01 (रु.५०.०० लक्ष) | **लेखाशिर्ष:नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत विविध भागात कॉंक्रीट रस्ते बनविणे. (रु.५०.०० लक्ष) |
| **लेखाशिर्ष:विकास योजनेअंतर्गत भुखंड संरक्षण** वॉर्ड क्र.१०० अंतर्गत विविध मनपाच्या खुल्या जागा विकसीत करणे. GBR-zone-09, P.No.99, Sr.No.08 (रु.५०.०० लक्ष) | **लेखाशिर्ष:नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत विविध रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. (रु.५०.०० लक्ष) |
| **लेखाशिर्ष:विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण** वॉर्ड क्र.१०० अंतर्गत विविध मनपाच्या खुल्या जागेतील जॉगींग ट्रॅकची दुरुस्ती करणे. GBR-zone-09, P.No.99, Sr.No.09 (रु.५०.०० लक्ष) | वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत विविध विकास कामे करणे. (रु.५०.०० लक्ष) |
| **लेखाशिर्ष:नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१००, ज्योतीनगर अंतर्गत महाराष्ट्र गॅरेज ते एम.एच.बी.कॉलनी व इतर रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे.GBR-zone-09,Spill-P.No.299,Sr.No.222 (रु.१५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत एम.एच.बी.कॉलनी परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. (रु.१५.०० लक्ष) |
| **लेखाशिर्ष:नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत धन्वंतरीनगर तसेच डॉ.वरे यांच्या घराजवळील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. Zone-09,Spill-P.No.299,Sr.No.223 (रु.१५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.१००, ज्योतीनगर अंतर्गत एम.एच.बी.सह्याद्री कॉलनी परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. (रु.१५.०० लक्ष) |
| **लेखाशिर्ष:नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१०० अंतर्गत रामकृपा कॉलनी रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. Zone-09,Spill-P.No.299, | **लेखाशिर्ष:नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१००, अंतर्गत जयनगर भागातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. (रु.३०.०० |

| | |
|---|---|
| Sr.No.229(रु.३०.०० लक्ष) | लक्ष) |
| **लेखाशिर्ष:विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण** वॉर्ड क्र.१००, अंतर्गत जयनगर, दशमेशनगर तसेच विविध मनपाच्या खुल्या जागेतील जॉगींग ट्रॅक, संरक्षित भिंतीची दुरुस्ती करणे. Zone-09,Spill-P.No.303,Sr.No.24 (रु.१५.०० लक्ष) | **लेखाशिर्ष:नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१०० अंतर्गत जयनगर भागामध्ये विविध रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. (रु.१५.०० लक्ष) |
| **लेखाशिर्ष:विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण** वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत दशमेशनगर येथील श्री.पवार यांच्या घराजवळील मनपाच्या खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे. Zone-09,Spill-P.No.303, Sr.No.25 (रु.१५.०० लक्ष) | **लेखाशिर्ष:नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१०० अंतर्गत बिकानेर भुजीयावाला ते ताहेर पिठाची गिरणी व एम.एस.टेलर ते दर्गा रोड येथे नविन कॉंक्रीट रस्ता तयार करणे. (रु.१५.०० लक्ष) |
| **लेखाशिर्ष:विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण** वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत विविध मनपाच्या खुल्या मैदानात खेळणी बसविणे. GBR-Zone-09, P.No.99, Sr.No.10 (रु.२०.०० लक्ष) | वॉर्ड क्र.१०० डॉ.वरे हॉस्पीटलच्या लगतचे कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. (रु.१०.०० लक्ष)<br>वॉर्ड क्र.१०० अंतर्गत विविध ठिकाणी खेळणी बसविणे. (रु.१०.०० लक्ष) |

**सुचक:-**श्रीमती सुमित्रा गिरजाराम हाळनोर **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१००, ज्योतीनगर अंतर्गत विविध विकास कामांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा अर्थसंकल्पामधून लेखाशिर्ष बदलण्याचा व स्थळ बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर. मंजुरी देण्यात येते.

| जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव |
|---|---|
| **लेखाशिर्ष:शहरीभागात पुनर्डांबरीकरण करणे.** वॉर्ड क्र.१०० अंतर्गत ज्योतीनगर भागातील रस्तांचे पुनर्डांबरीकरण करणे. GBR-zone-09, P.No.92, Sr.No.01 (रु.५०.०० लक्ष) | **लेखाशिर्ष:नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत विविध भागात कॉंक्रीट रस्ते बनविणे. (रु.५०.०० लक्ष) |
| **लेखाशिर्ष:विकास योजनेअंतर्गत भुखंड संरक्षण** वॉर्ड क्र.१०० अंतर्गत विविध मनपाच्या खुल्या जागा विकसीत करणे. GBR-zone-09, P.No.99, Sr.No.08 (रु.५०.०० लक्ष) | **लेखाशिर्ष:नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत विविध रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. (रु.५०.०० लक्ष) |
| **लेखाशिर्ष:विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण** वॉर्ड क्र.१०० अंतर्गत विविध मनपाच्या खुल्या जागेतील जॉगींग ट्रॅकची दुरुस्ती करणे. GBR-zone-09, P.No.99, Sr.No.09 (रु.५०.०० लक्ष) | वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत विविध विकास कामे करणे. (रु.५०.०० लक्ष) |
| **लेखाशिर्ष:नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** | वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत |

| | |
|---|---|
| वॉर्ड क्र.१००, ज्योतीनगर अंतर्गत महाराष्ट्र गॅरेज ते एम.एच.बी.कॉलनी व इतर रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे.GBR-zone-09,Spill-P.No.299,Sr.No.222 (रु.१५.०० लक्ष) | एम.एच.बी.कॉलनी परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. (रु.१५.०० लक्ष) |
| **लेखाशिर्षः नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत धन्वंतरीनगर तसेच डॉ.वरे यांच्या घराजवळील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. Zone-09,Spill-P.No.299,Sr.No.223 (रु.१५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.१००, ज्योतीनगर अंतर्गत एम.एच.बी. सह्याद्री कॉलनी परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. (रु.१५.०० लक्ष) |
| **लेखाशिर्षः नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१०० अंतर्गत रामकृपा कॉलनी रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. Zone-09,Spill-P.No.299, Sr.No.229 (रु.३०.०० लक्ष) | **लेखाशिर्षः नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१००, अंतर्गत जयनगर भागातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. (रु.३०.०० लक्ष) |
| **लेखाशिर्षः विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण** वॉर्ड क्र.१००, अंतर्गत जयनगर, दशमेशनगर तसेच विविध मनपाच्या खुल्या जागेतील जॉगींग ट्रॅक, संरक्षित भिंतीची दुरुस्ती करणे. Zone-09,Spill-P.No.303,Sr.No.24 (रु.१५.०० लक्ष) | **लेखाशिर्षः नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१०० अंतर्गत जयनगर भागामध्ये विविध रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. (रु.१५.०० लक्ष) |
| **लेखाशिर्षः विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण** वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत दशमेशनगर येथील श्री.पवार यांच्या घराजवळील मनपाच्या खुल्या जागेत संरक्षित भिंत बांधणे. Zone-09,Spill-P.No.303, Sr.No.25 (रु.१५.०० लक्ष) | **लेखाशिर्षः नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग** वॉर्ड क्र.१०० अंतर्गत बिकानेर भुजीयावाला ते ताहेर पिठाची गिरणी व एम.एस.टेलर ते दर्गा रोड येथे नविन कॉंक्रीट रस्ता तयार करणे. (रु.१५.०० लक्ष) |
| **लेखाशिर्षः विकास योजने अंतर्गत भुखंड संरक्षण** वॉर्ड क्र.१०० ज्योतीनगर अंतर्गत विविध मनपाच्या खुल्या मैदानात खेळणी बसविणे. GBR-Zone-09, P.No.99, Sr.No.10 (रु.२०.०० लक्ष) | वॉर्ड क्र.१०० डॉ.वरे हॉस्पीटलच्या लगतचे कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. (रु.१०.०० लक्ष)<br>वॉर्ड क्र.१०० अंतर्गत विविध ठिकाणी खेळणी बसविणे. (रु.१०.०० लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९७, रामकृष्णनगर/काबरानगर अंतर्गत विविध विकास कामांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा अर्थसंकल्पामधून लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.९७ अंतर्गत काबरानगर येथील नाल्यावर पुल बांधणे. GBR-Zone-07,P.No.72,Sr.No.01 (रु.१५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत तिरुपती विहार येथे पेव्हर ब्लॉक बसविणे.(रु.१५.०० लक्ष) |

| | |
|---|---|
| वॉर्ड क्र.९७ अंतर्गत साहस सोसायटी ते तिरुपती विहार येथे सिमेंट रस्ता तयार करणे. GBR-Zone-07,P.No.74,Sr.No.36(रु.२५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे.(रु.२५.०० लक्ष) |
| वॉर्ड क्र.९७ अंतर्गत डॉ.बाबसाहेब आंबेडकर मुख्य रस्ता तयार करणे. GBR-Zone-07,P.No.74,Sr.No.38(रु.२५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत विविध विकास कामे करणे. (रु.२५.०० लक्ष) |

**सुचक:-**श्रीमती सीमा काहानुलाल चक्रनारायण
**अनुमोदक:-**श्री.कमलाकर शामराव जगताप, श्री.सिताराम इसराम सुरे,
मा. महापौर :विषय मंजुर.

**ठराव : -**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९७, रामकृष्णनगर/काबरानगर अंतर्गत खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.९७ अंतर्गत काबरानगर येथील नाल्यावर पुल बांधणे. GBR-Zone-07,P.No.72,Sr.No.01 (रु.१५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत तिरुपती विहार येथे पेव्हर ब्लॉक बसविणे.(रु.१५.०० लक्ष) |
| वॉर्ड क्र.९७ अंतर्गत साहस सोसायटी ते तिरुपती विहार येथे सिमेंट रस्ता तयार करणे. GBR-Zone-07,P.No.74,Sr.No.36 (रु.२५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे.(रु.२५.०० लक्ष) |
| वॉर्ड क्र.९७ अंतर्गत डॉ.बाबसाहेब आंबेडकर मुख्य रस्ता तयार करणे. GBR-Zone-07,P.No.74,Sr.No.38 (रु.२५.०० लक्ष) | वॉर्ड क्र.९७ अंतर्गत विविध विकास कामे करणे. (रु.२५.०० लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०, रोझाबाग-भारतमाता नगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| जुने कामांचे नाव ह्यापैकी | ज्याऐवजी नविन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.१० विद्यालंकार शाळा ते सत्यविष्णू नाली दुरुस्त करणे व आवश्यक ठिकाणी ढापे टाकणे. (रु.२५ लक्ष).GBR-Zone-04,P.No.47,Sr.No.01 | वॉर्ड क्र.१०, रोझाबाग येथे विविध ठिकाणी ओपन स्पेस व रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. रु.२५ लक्ष. |

**सुचक:-**श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०, रोझाबाग-भारतमाता नगर अंतर्गत खालील दर्शविलेल्या विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| जुने कामांचे नाव ह्यापैकी | ज्याऐवजी नविन कामांचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.१० विद्यालंकार शाळा ते सत्यविष्णू नाली दुरुस्त करणे व आवश्यक ठिकाणी ढापे टाकणे. (रु.२५ लक्ष). GBR-Zone-04,P.No.47,Sr.No.01 | वॉर्ड क्र.१०, रोझाबाग येथे विविध ठिकाणी ओपन स्पेस व रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. रु.२५ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.श्रीमती आलिया कौसर खान, वैद्यकिय अधिकारी गट-अ, ह्या महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागा अंतर्गत शासकीय उपजिल्हा रुग्णालय, तालुका अंबड, जि.जालना येथे कायमस्वरुपी सेवेत आहेत. त्या व त्यांचे कुटूंबिय हे औरंगाबाद येथील मुळ रहिवासी आहे. त्यांचे पती औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी कार्यरत आहे. त्यांचे पती विविध व्याधीने ग्रस्त असल्यामुळे त्यांचेवर नेहमीच वैद्यकीय उपचार चालु असतो. तसच त्यांच्या सासू ह्या ९० वर्षाच्या असून त्या देखील विविध आजाराने अंथरुणावर आहेत. त्यांना देखील नेहमीच उपचाराची गरज भासते. तसेच त्यांचा मुलगा इयत्ता दहावीत शिक्षण घेत असून ती देखील एकटी राहत आहे.

वरील विविध कारणास्तव त्यांना औरंगाबाद येथे कायमस्वरुपी वास्तव्यास असणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदावरील त्यांची सेवा पती-पत्नी एकत्रीकरण अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वर्ग करून त्यांना कायमस्वरुपी समायोजीत करून घेण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.वैद्य रेणकुादास (राजु) दत्तोपंत

**अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन, श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद येथील मुळ रहिवासी डॉ.श्रीमती आलिया कौसर खान, वैद्यकिय अधिकारी गट-अ, ह्या महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागा अंतर्गत शासकीय उपजिल्हा रुग्णालय, तालुका अंबड, जि.जालना येथे कायमस्वरुपी सेवेत आहेत. त्यांचे पती औरंगाबाद महानगरपालिकेत कायमस्वरुपी सेवेत असून ते विविध व्याधीने ग्रस्त असल्यामुळे पती-पत्नी एकत्रीकरण अंतर्गत वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदावर त्यांची सेवा औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर वर्ग करून त्यांना कायमस्वरुपी समायोजीत करण्याकरीता कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.०२.२०१६ विषय क्र.३०३ नुसार वॉर्ड क्र.१९, आरेफ कॉलनी येथील महानगरपालिकेच्या शाळा परिसरातील उपलब्ध जागेवर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र नविन बिल्डींग बांधणेसाठी मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामासाठी निविदा बोलविण्यात आल्या असता कंत्राटदार शेख मुर्तुझा शेख युसूफ यांची निविदा सर्वात कमी दर म्हणजेच १५.००% कमी दराची असल्याने ती मा.स्थायी समिती ठराव क्र.१७७ दिनांक ०७.०४.२०१७ च्या मंजुरीनुसार जा.क्र./मनपा/स्लम/२०१७/७२ दि.०१.०६.२०१७ रोजी संबंधीत कंत्राटदारास रीतसर कार्यादेश देऊन कामास सुरुवात करण्यात आलेली असून हे काम पूर्णत्वाकडे आहे. कामाची

अंदाजपत्रकीय रक्कम रु.७०.०० लक्ष असल्यामुळे या कामावर थर्ड पार्टी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर कामाच्या ठिकाणी संपूर्ण काळी माती असल्यामुळे इमारतीचा पाया खोदकाम व बांधकामामध्ये खुप वाढ झालेली आहे. तसेच सदर ठिकाणी उपलब्ध भुखंडाचे क्षेत्रफळ जास्त असल्यामुळे कुंपण भिंत, पेव्हर ब्लॉक तसेच इतर सर्व संबंधीत कामाच्या बाबीमध्ये वाढ झाली आहे. करीता हे काम पूर्ण करून अंतिम देयक अदा करणेसाठी प्रत्यक्ष परिस्थितीनुरूप सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून ते रक्कम रुपये ८३,९७,८९४/- चे होत आहे.

प्रस्तावित वाढीव कामातील अतिरिक्त बाबी या अंदाजपत्रकीय दराने आणि परिशिष्ट-ब मधील बाबींची कामे ही मंजुर निविदा दर १५.००% कमी दराने अशी एकत्रीत प्रत्यक्ष रक्कम रुपये ७२,३५,४९६/- खर्च अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | बाब | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | मुळ मंजुर अंदाजपत्रक | ७०,००,०००/- |
| २. | निविदा रक्कम | ५७,९५,५६०/- |
| ३. | प्रत्यक्ष परिस्थितीनुरूप सुधारीत अंदाजपत्रक (४+७) | ८३,९७,८९४/- |
| ४. | परिशिष्ट-ब मधील बाबींची सुधारीत रक्कम | ७७,४९,३२४/- |
| ५. | अ.क्र.४ च्या सुधारीत रकमेवर १५.००% कमी निविदा दरानुसार होणारी बचत रक्कम | ११,६२,३९९/- |
| ६. | परिशिष्ट-ब मधील बाबींच्या कामासाठी प्रत्यक्षात लागणारी रक्कम (४+५) | ६५,८६,९२६/- |
| ७. | अतिरिक्त बाबीची रक्कम | ६,४८,५७०/- |
| ८. | प्रत्यक्ष कामावर होणारा अपेक्षित खर्च (६+७) | ७२,३५,४९६/- |
| ९. | काम पूर्ण करणेसाठी अं.प.र.रु.७० लक्ष पेक्षा प्रत्यक्षात जास्त लागणारी रक्कम रु (८-१) | २,३५,४९६/- |

करीता, सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये ८३,९७,८९४/- व अप्रत्यक्षात होणारा खर्च रक्कम रुपये ७२,३५,४९६/- यास मान्यतेस्तव, वाढीव कामे मुळ परिशिष्ट-ब मधील बाबी १५.००% कमी दराने आणि अतिरिक्त बाबी अंदाजपत्रक दराने श्री.शेख मुर्तुझा शेख युसुफ यांचेकडून करून घेणेस प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.०२.२०१६ विषय क्र.३०३ नुसार वॉर्ड क्र.१९, आरेफ कॉलनी येथील महानगरपालिकेच्या शाळा परिसरातील उपलब्ध जागेवर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र नविन बिल्डींग बांधणेसाठी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये ८३,९७,८९४/- व अप्रत्यक्षात होणारा खर्च रक्कम रुपये ७२,३५,४९६/- ची वाढीव कामे मुळ परिशिष्ट-ब मधील बाबी १५.००% कमी दराने आणि अतिरिक्त बाबी अंदाजपत्रक दराने या कामाचे मुळ कंत्राटदार श्री.शेख मुर्तुझा शेख युसुफ यांचेकडून करून घेणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९७ मधील सुतगिरणी, काबरानगर या रस्त्यावर अवैधरित्या मास विक्री मोठ्या प्रमाणावर होत असून मास विक्रेते मासाचे तुकडे व वेस्टेज आजुबाजूस

फेकतात. त्यामुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणात घाण होऊन मोकाट कुत्रे जमा होतात. जमा झालेली कुत्रे सदर मास खाऊन येणाऱ्या जाणाऱ्या नागरीकांवर चवताळून जाऊन लचके तोडतात. अशाच प्रकारे दिनांक ०९ फेब्रुवारी २०१९ रोजी माझ्या वॉर्डातील कु.आकांक्षा सागर शेजवळ या बालिकेचा मोकाट कुत्र्यांनी लचका तोडून तीस अनेक ठिकाणी जखमी केले आहे. याबाबत दै.सामना, दै.लोकमत, दै.पुण्यनगरी, दै.दिव्य मराठी, दै.पुढारी अशा अनेक वर्तमान पत्रात बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत.

सदरील बालिकेच्या घरची परिस्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे दवाखान्यामधील खर्च ते झेपू शकत नसल्याने संबंधीत बालिकेच्या पालकांना महानगरपालिकेतर्फे रु.०१ लक्ष पर्यंत आर्थिक मदत करण्या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सीमा काहानुलाल चक्रनारायण **अनुमोदक:-**श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ

मा.महापौर :विषय मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९७ मधील सुतगिरणी, काबरानगर येथील रहिवाशी कु.आकांक्षा सागर शेजवळ या बालिकेचा मोकाट कुत्र्यांनी लचका तोडून अनेक ठिकाणी जखमी केले असून तिच्या पालकांस दवाखाना औषधोपचार करण्यासाठी नियमानुसार महानगरपालिकेतर्फे रु.०१ लक्षची आर्थिक मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६२, संभाजी कॉलनी अंतर्गत विविध विकास कामांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा अर्थसंकल्पामधून लेखाशिर्ष बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव |
|---|---|
| १. वॉर्ड क्र.६२ अंतर्गत एफ सेक्टर दक्षिणमुखी हनुमान मंदिरासमोर सामाजिक सभागृह बांधणे. (GBR-Zone-05,P.No.55,Sr.No) (रु.२५ लक्ष)<br>२. २.वॉर्ड क्र.६२ उद्यान विकसीत करणे. (GBR-Zone-05,P.No.59,Sr.No) (रु.२० लक्ष) | वॉर्ड क्र.६२ येथील विविध ठिकाणी खुले रंगमंच विकसीत करणे व खुल्या जागेत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. (रु.४५ लक्ष) |

**सुचक:-**श्रीमती शितल विरभद्र गादगे **अनुमोदक:-**श्रीमती स्वाती किशोर नागरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६२, संभाजी कॉलनी अंतर्गत विविध विकास कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| जुने कामांचे नाव | नविन कामांचे नाव |
|---|---|
| १. वॉर्ड क्र.६२ अंतर्गत एफ सेक्टर दक्षिणमुखी हनुमान मंदिरासमोर सामाजिक सभागृह बांधणे. (GBR-Zone-05,P.No.55,Sr.No) (रु.२५ लक्ष)<br>२. वॉर्ड क्र.६२ उद्यान विकसीत करणे. (GBR-Zone-05,P.No.59,Sr.No) (रु.२० लक्ष) | वॉर्ड क्र.६२ येथील विविध ठिकाणी खुले रंगमंच विकसीत करणे व खुल्या जागेत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. (रु.४५ लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात विविध गर्दीच्या ठिकाणी महिला व पुरूषांसाठी पे ॲण्ड युज शौचालय बांधण्याचा उपक्रम महानगरपालिकेने हाती घेतला आहे. या उपक्रम अंतर्गत आतापर्यंत २० पे ॲण्ड युज शौचालय बांधून कार्यान्वीत करण्यात आली असून या व्यतिरिक्त औरंगपुरा व बीबीका मकबरा परिसराजवळील केवळ महिलांसाठीचे शौचालय कार्यान्वीत करण्यात आली आहेत. महानगरपालिकेने याच अनुषंगाने शहरातील उद्योजक, सामाजीक संस्था यांना आवाहन केले असता शहरातील नोंदणीकृत सामाजीक संस्था माहेश्वरी मंडल, औरंगाबाद यांनी औरंगाबाद महानगरपालिकेस संपर्क करून त्यांच्या CSR फंडातून सेव्हनहील येथे महानगरपालिकेच्या अग्निशमन दल कार्यालयाच्या परिसरातील मोकळ्या जागेवर महिला व पुरुषांसाठी संयुक्त वापराचे पे ॲण्ड युज शौचालय बांधण्याची तयारी दर्शविली आहे. सदर परिसर हा गर्दीचा परिसर असल्याने येथे शौचालयाची आवश्यकता आहे. याच अनुषंगाने त्यांनी त्यांच्या वास्तूविशारद यांच्या मार्फत नियोजन करून प्रस्तावीत शौचालयाचा ढोबळ मानाने नकाशा सादर केला आहे. या व्यतिरिक्त शहरात इतर ठिकाणी जागा उपलब्ध झाल्यास अधिक संख्येने पे ॲण्ड युज शौचालय बांधण्याची सदर संस्थेने तयारी दर्शविली आहे.

तरी, सदर संस्था त्यांच्या CSR फंडातून महानगरपालिकेस पे ॲण्ड युज शौचालय बांधून देण्यास तयार असल्याने त्यांचा प्रस्ताव स्विकारणे योग्य वाटते सदर संस्थेने शौचालय बांधल्या नंतर त्याचे संचलन महानगरपालिकेने त्यांच्या नियमानुसार करावे व शौचालयाचे बांधकाम प्रगतीपथावर असतांना त्याची पाहणी व तपासणी करणेची अनुमती द्यावी अशी विनंती केली आहे. दिलेला प्रस्ताव योग्य असल्याने उपलब्ध जागेवर त्यांना शौचालय बांधणेसाठी मंजुरी देणे, त्यांच्या समवेत यासाठी आवश्यक करार करणे व इतर अनुषंगीक कार्यवाही करणे, इतर ठिकाणी जागा उपलब्धतेनुसार त्यांना शौचालय बांधणे बाबत मंजुरी देणे इत्यादीचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात विविध गर्दीच्या ठिकाणी महिला व पुरूषांसाठी पे ॲण्ड युज शौचालय बांधण्याचे महानगरपालिकेने हाती घेतलेल्या उपक्रमाच्या अनुषंगाने शहरातील नोंदणीकृत सामाजीक संस्था माहेश्वरी मंडल, औरंगाबाद यांनी महिला व पुरुषांसाठी संयुक्त वापराचे पे ॲण्ड युज शौचालय बांधण्याची तयारी दर्शविली असल्याने आणि दिलेला प्रस्ताव योग्य असल्याने उपलब्ध जागेवर त्यांना शौचालय बांधणेसाठी मंजुरी देणे, त्यांच्या समवेत यासाठी आवश्यक करार करणे व इतर अनुषंगीक कार्यवाही करणे, इतर ठिकाणी जागा उपलब्धतेनुसार त्यांना शौचालय बांधणे बाबत मंजुरी देणे इत्यादीचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९६९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या सातारा-देवळाई भागासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून सदरचा अहवाल मा.संचालक नगर परिषद संचालनालय मुंबई यांना दिनांक २५.०१.२०१९ अन्वये ८०% चे विशेष अर्थसहाय्य शासन निर्णय संकिर्ण-२०१२/प्र.क्र./२४/नवि-१६, मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २७ जुन-२०१२ च्या अनुषंगाने सादर करण्यात आला आहे. सातारा व देवळाई प्रभाग शासन निर्णय दिनांक २६ फेब्रुवारी २०१६ नुसार महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट करण्यात आला असून यामध्ये सातारा

महसुली गावातील गट क्र. ०१ ते १९, गट क्र.१२८ ते १५६ (गट क्र.१२० ते १२७ वगळून) तसेच मौजे देवळाई महसुली गावातील गट क्र.०१ ते १४५ व गावठाणचा समावेश करण्यात आलेला आहे. शासनाच्या जाहीर निर्णयानुसार नव्याने समाविष्ट भागासाठी ज्या बाबींची कमतरता आहे. अशा सर्व मुलभूत सोयीसुविधा मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने पूरविणे आवश्यक आहे. यामध्ये घनकचरा व्यवस्थापन, पाणी पुरवठा व मलनिःसारण सामाजीक पायाभुत सुविधा, नागरी दळणवळण सुविधा, शालेय शिक्षणाशी निगडीत सुविधा, नागरी आरोग्याशी निगडीत सुविधा तसेच लोकउपयोगी व सार्वजनिक स्वरुपाची संकिर्ण कामे इत्यादी कामांचा समावेश आहे. सदर बाब विचारात घेऊन मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक २४९ दिनांक ०९.०२.२०१८ अन्वये ठराव पारित केला असून यामध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी नियुक्ती करणे, त्यांच्या सेवा शुल्कासाठी अर्थसंकल्पात आर्थीक तरतुद करणे, एकुण प्रकल्प किंमतीच्या २०% एवढ्या आर्थिक तरतुदीची मनपा अर्थसंकल्पात तजविज करणे., सविस्तर प्रकल्प अहवालाची सक्षम तांत्रिक प्राधिकाऱ्याकडून मंजुरी घेणे, त्यांची तांत्रिक फी अदा करणे व परिपुर्ण प्रस्ताव शासनास सादर करणे इत्यादी बाबीसाठी मंजुरी प्रदान केली आहे. याच मंजुरीच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूकीसाठी दिनांक २८.०३.२०१८ च्या जाहीर नोटीसद्वारे प्रस्ताव मागविले होते. त्यामध्ये ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यातील गुणात्मक दृष्ट्या यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स LLP यांची निविदा सरस ठरली असून त्यास मा.स्थायी समिती सभा विषय क्र.३८ दिनांक १०.०६.२०१८ अन्वये मंजुरी प्रदान केली आहे. या मंजुरी नंतर संबंधीत संस्थेला कार्यादेश देण्यात आला असून त्यांनी वर नमुद प्रमाणे आवश्यक बाबीची पुर्तता करून व आवश्यक असणारे सर्व्हेक्षण करून तसा या भागासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केला आहे. या सातारा-देवळाई भागासाठी तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालात सन २०२०-२१ हे बेसीक वर्ष गृहीत धरून पुढील ३० वर्षासाठीचे अनुमान गृहीत धरुन नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्प अहवाला नुसार सातारा-देवळाई भागामध्ये १० ठिकाणी मुख्य सिवर लाईनचे आऊट फॉल येत असून ते मुळ शहरातील राबविण्यात आलेले औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजनेतील १४०० मीमी जोडण्याचे प्रस्तावीत केले आहे. यामध्ये मुख्य सिवर लाईनची एकुण लांबी २८३ कि.मी. एवढी असून त्यासाठी २०० मीमी ते १२०० मीमी चे RCC NP-3 पाईप वापरण्यात येणार आहेत. सदरचा भाग सखल स्वरुपाचा असल्यामुळे यासाठी दोन ठिकाणी सिवेज पंपींग स्टेशन बांधण्याचे प्रस्तावीत केले आहे. तसेच या भागातील मुख्य जलनिःसारण वाहिनी अस्तित्वातील १४०० मीमी व्यासाच्या जलनिःसारण वाहीनीस जोडण्यात येणार असल्याने व औरंगाबाद शहर भुमीगत गटार योजने अंतर्गत बांधण्यात आलेले सिवेज ट्रीटमेंट प्लॉट पुरेशा क्षमतेचे असल्याने नव्याने या भागासाठी मलजल प्रक्रिया केंद्र (STP) बांधण्याचे आवश्यकता नाही. या योजनेमध्ये सविस्तर प्रकल्प अहवालात नमुद नुसार मलजल वाहिनी २८३ कि.मी. टाकणे, १.७० द.ल.लि. क्षमतेचे सिवेज पंपींग स्टेशन बांधणे, 11 KVA चे Express feeder उभारणे प्रकल्पाच्या आवश्यक उपांगास कुंपन भिंत बांधणे सुमारे ३०४०० मिळकतीची जोडणी जलनिःस्सारण वाहिनीस करणे, युटीलीटी सर्व्हीसेस शिफ्ट करणे, मेंटेनन्स इक्युपमेंट खरेदी करणे, रोड सिस्टोरेशन करणे व तीन महिन्याचे ट्रायल रन करणे व पुढील १० वर्षासाठी ऑपरेशन ॲण्ड मेंटेनन्स करणे इत्यादी बाबींचा समावेश अहे. अशा रितीने या सर्व बाबीचा समावेश असलेला एकुण रु.१८०.१७ कोटीचा प्रकल्प अहवालावर नमुद प्रमाणे शासनास मंजुरीसाठी व ८०% अनुदान स्वरुपात विशेष अर्थसहाय्य मिळणे बाबत सादर करण्यात आला आहे. प्रकल्पास मंजुरी प्राप्त होताच व विशेष अर्थसहाय्य मिळताच पुढील

आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाकडून नियमानुसार करण्यात येईल. करीता वर नमुद प्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या अवलोकनास्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या सातारा-देवळाई भागासाठी शासनाच्या जाहीर निर्णयानुसार नव्याने समाविष्ट भागासाठी ज्या बाबींची कमतरता आहे. अशा सर्व मुलभूत सोयीसुविधा मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने पूरविणे आवश्यक असून औरंगाबाद महानगरपालिकेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूकीसाठी जाहीर नोटीसीद्वारे निविदा मागविल्या असता, त्यातील गुणात्मक दृष्ट्या यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स LLP यांची निविदा सरस ठरली असून त्यानुसार प्रस्तावातील नमुद कामे करण्यासाठी जे की, या योजनेमध्ये सविस्तर प्रकल्प अहवालात नमुद नुसार मल-जल वाहिनी २८३ कि.मी. टाकणे, १.७० द.ल.लि. क्षमतेचे सिवेज पंपींग स्टेशन बांधणे, 11 KVA चे Express feeder उभारणे प्रकल्पाच्या आवश्यक उपांगास कुंपन भिंत बांधणे सुमारे ३०४०० मिळकतीची जोडणी जलनि:सारण वाहिनीस करणे, युटीलीटी सर्व्हीसेस शिफ्ट करणे, मेंटेनन्स इक्युपमेंट खरेदी करणे, रोड सिस्टोरेशन करणे व तीन महिन्याचे ट्रायल रन करणे व पुढील १० वर्षासाठी ऑपरेशन ॲण्ड मेंटेनन्स करणे इत्यादी बाबींचा समावेश अहे. अशा रितीने या सर्व बाबीचा समावेश असलेला एकुण रु.१८०.१७ कोटीचा प्रकल्प अहवालावर नमुद प्रमाणे शासनास मंजुरीसाठी व ८०% अनुदान स्वरुपात विशेष अर्थसहाय्य मिळणे बाबत सादर करण्यात आला आहे. प्रकल्पास मंजुरी प्राप्त होताच व विशेष अर्थसहाय्य मिळताच पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाकडून नियमानुसार करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे गारखेडा, न.भुक्र.१५७३५/३१ येथे आरक्षण क्रमांक २६६/बी गार्डन असून मिळकतधारक यांनी या जागेबाबत (संबंधीत मिळकतधारकांने) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-१२७ अन्वये खरेदी सुचना दिनांक ०३.११.२०१४ रोजी दिलेली आहे. त्यानुषंगाने भुसंपादन कार्यवाही करणे अनिवार्य असल्याने विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्याकडे मिळकतधारक श्री.योगेशकुमार विठ्ठलदास झवेरी यांच्या क्षेत्रफळ २२४८.१७ चौ.मी. जागेचा भूसंपादन प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

दरम्यान उक्त प्रकरणी मिळकतधारक यांनी रिट पिटीशन क्र.३५३३/२०१७ अन्वये मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेली आहे. सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४.०३.२०१८ रोजी एक वर्षाच्या आत मोबदला देण्याचा आदेश पारीत केला आहे.

करीता, विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांना इकडील कार्यालयाने भूसंपादन कार्यवाही विहीत मुदतीत करणेबाबत कळविण्यात आले असता त्यांनी उक्त जागेचे भूसंपादन करण्यासाठी अंदाजे मावेजा रक्कम रु.९,२९,३९,३४८/- आवश्यक असल्याचे कळविले आहे व त्यापैकी ३०% म्हणजेच रक्कम रु.२,७८,८१,८०४/- त्वरीत त्यांच्या कार्यालयात जमा करणे बाबत कळविले आहे. सदरील रक्कम जमा झाल्यानंतर प्रकरणी भुसंपादना बाबत कार्यवाही होईल.

करीता, भुसंपादनापोटी रक्कम रु.९,२९,३९,३४८/- विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्याकडे भुसंपादनापोटी अदा करणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे गारखेडा, न.भुक्र.१५७३५/३१ येथे आरक्षण क्रमांक २६६/बी गार्डन असून मिळकतधारक यांनी या जागेबाबत (संबंधीत मिळकतधारकांने) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-१२७ अन्वये खरेदी सुचना दिनांक ०३.११.२०१४ रोजी दिलेली आहे. त्यानुषंगाने भुसंपादन कार्यवाही करणे अनिवार्य असल्याने मिळकतधारक श्री.योगेशकुमार विठ्ठलदास झवेरी यांच्या क्षेत्रफळ २२४८.१७ चौ.मी.जागेच्या भुसंपादनापोटी र.रु.९,२९,३९,३४८/- विशेष भुसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांच्याकडे अदा करणेसाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान प्राणीसंग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना प्रत्येक दिवशी बीफ खाद्य देण्यात येते. सन २०१९-२० या एका आर्थिक वर्षासाठी बीफ खाद्य खरेदी करणेकरीता दर निश्चितीसाठी ई-टेंडरद्वारे निविदा मागवयाच्या आहेत. सध्या प्राणीसंग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांना त्यांचे वय व वजनानुसार खालीलप्रमाणे खाद्य देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | प्राणी | प्राण्याचे नाव | प्रतिदिनी देण्यात येणारे बिफ खाद्य |
|---|---|---|---|
| १. | पिवळे वाघ | सिध्दार्थ | १३ किलो |
| २. | | समृध्दी | १२ किलो |
| ३. | | अर्जुन | १३ किलो |
| ४. | | करिना | १२ किलो |
| ५. | | करिश्मा | १२ किलो |
| ६. | | शक्ती | ११ किलो |
| ७. | | भक्ती | ११ किलो |
| ८. | पांढरे वाघ | वीर | १२ किलो |
| ९. | बिबट्या | राजा | ०५ किलो |
| १०. | | रेणू | ०४ किलो |
| ११. | | नाझिया | ०४ किलो |
| १२. | तरस | ०१ | ०२ किलो |
| १३. | कोल्हे | ०२ | ०४ किलो |
| १४. | मगर | ०५ | १.५ किलो |
| १५. | उदबिल्ला | ०२ | ०१ किलो |
| | | **एकुण** | **११७.५ किलो** |

वरील प्रमाणे एकुण ११७.५ किलो बीफ खाद्य देण्यात येत असून आठवड्यातून एक दिवस म्हणजे प्रत्येक मंगळवारी बीफ खाद्य देण्यात येत नाही.

| | | |
|---|---|---|
| प्रतिदिनी लागणारे खाद्य | - | ११७.५ किलो |
| वर्षभर खाद्य खरेदीचे दिवस | - | ३१३ दिवस |
| सध्याचे बिफ खरेदीचे दर सन २०१८-१९ | - | रु.१८०/- प्रति किलो |
| सन २०१९-२० वर्षातील अंदाजपत्रकीय तरतुद | - | रु.१.५ कोटी |

एकुण होणारा अंदाजपत्रकीय वार्षिक खर्च - रु.६६,१९,९५०/-

वरील प्रमाणे सन २०१९-२० या एका आर्थिक वर्षासाठी बिफ खरेदी करणेकरीता रु.६६,१९,९५०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च सन २०१९-२० मधील अर्थसंकल्पीय तरतुद मधील लेखाशिर्ष प्राणी देखभाल व खाद्य खर्च रु.१.५ कोटी मधून करण्यात येईल.

करीता, रु.६६,१९,९५०/- च्या अंदाजपत्रकास मान्यतेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान प्राणीसंग्रहालयात असलेल्या हिंस्त्र प्राण्यांना बीफ खाद्य देण्यासाठी सन २०१९-२० या एका आर्थिक वर्षासाठी बीफ खाद्य खरेदी करणेकरीता सादर केलेल्या रु.६६,१९,९५०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती शेख अफरोज नाज मोहम्मद सईद यांची नियुक्ती खुल्या प्रवर्गातून उपशिक्षिका पदावर भिवंडी महानगरपालिका शाळा क्रमांक-११ येथे झालेली असून त्यांचे मुळगांव औरंगाबाद आहे. त्यांनी आंतरजिल्हा बदलीने महानगरपालिका औरंगाबाद येथील शाळेत करणेबाबत विनंती केलेली आहे. त्यांच्या पतीचे मुळगांव औरंगाबाद येथे असून घर व कुटूंब औरंगाबाद येथेच राहत असल्याने पती-पत्नी एकत्रिकरण अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेत बदली करणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.रामेश्वर बाबुराव भादवे **अनुमोदक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती शेख अफरोज नाज मोहम्मद सईद, उपशिक्षिका, भिवंडी महानगरपालिका शाळा क्रमांक-११ यांची पती-पत्नी एकत्रिकरण अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेत आंतरजिल्हा बदलीने बदली करण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा परिसर गट नं.९१, सम्राटनगर येथील खुल्या जागेस "माँ साहेब मीना ताई ठाकरे उद्यान" असे नाव देण्यात यावे येथील नागरीकांची मागणी असल्यामुळे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सातारा परिसर गट नं.९१, सम्राटनगर येथील खुल्या जागेस "माँ साहेब मीना ताई ठाकरे उद्यान" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७४:-** **(टिप:दि.१६.०१.२०१९ च्या सभेतील स्थगित विषय क्रमाक-८११)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय व महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक ०६.०८.२०१८ ठराव क्र.६२५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ (क) नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून प्रशमित संरचना म्हणुन घोषित करणे व नियमीत करणेचे धोरण निश्चित झाले आहे.

औरंगाबाद शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश झालेला आहे. शहरातील अनधिकृत घरे, प्लॉट, निवासी भुखंड, वाणिज्य, अन्य वसाहती, बांधकामे नियमित केल्यास नियोजनबध्द विकास करणे सोईचे होईल. नागरीकांना सुविधा व्हावी म्हणुन "राणी लक्ष्मीबाई बहुउद्देशिय सेवाभावी प्रतिष्ठाण" औरंगाबाद या संस्थेमार्फत नागरीकांना त्यांच्या वसाहतीमध्ये अनधिकृत बांधकाम नियमीत करण्याकरीता आवश्यक असणाऱ्या सर्व कागदपत्रांची पुर्तता संस्थेमार्फत करून वसाहतीनिहाय प्रस्ताव तयार करून महानगरपालिकेतील नगर रचना विभागाकडे सादर करणार आहे. असे प्रस्ताव तयार करतांना आवश्यक लागणारे दस्ताऐवज, संचिका तयार करण्याच्या कामासाठी संस्थेमार्फत शुल्क आकारण्यात येईल.

अशा स्वरुपाचे प्रस्ताव तयार करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा (कॉम्प्युटर सॉफ्टवेअर) सदर संस्थेकडे उपलब्ध आहेत. या माध्यमातून महानगरपालिकेस व नागरीकांच्या दृष्टिने ते अत्यंत सोईचे होईल. तसेच या संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या यंत्रणेमुळे कमी वेळेत प्रस्ताव तयार केल्या जातील. तसेच पर्यायाने महापालिकेसही मोठ्या प्रमाणात महसुल मिळेल.

करीता, या संस्थेस अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासाठीचे प्रस्ताव सादर करण्याची परवानगी "राणी लक्ष्मीबाई बहुउद्देशिय सेवाभावी प्रतिष्ठाण" औरंगाबाद या संस्थेस देणेकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन रामकिसन बारवाल

**अनुमोदक:-**श्री.सचिन सुर्यकांत खैरे, श्री.विकास रतनलाल जैन, श्री.मनोज बन्सीलाल गांगवे, श्रीमती लता मगनराव निकाळजे.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय व महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक ०६.०८.२०१८ ठराव क्र.६२५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ (क) नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून प्रशमित संरचना म्हणुन घोषित करणे व नियमीत करणेचे धोरण निश्चित झाले असून शहरातील अनधिकृत घरे, प्लॉट, निवासी भुखंड, वाणिज्य, अन्य वसाहती, बांधकामे नियमित केल्यास नियोजनबध्द विकास करणे साठी "राणी लक्ष्मीबाई बहुउद्देशिय सेवाभावी प्रतिष्ठाण" औरंगाबाद या संस्थेस नियमानुसार देणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, तनवाणी मित्रमंडळ या सेवाभावी संस्थेमार्फत संपुर्ण शहरात मोफत पिण्याचे पाणी शुध्द करुन मागील सात वर्षापासून मोफत पुरवठा करण्यात येत आहे. तनवाणी मित्रमंडळातर्फे संपुर्ण शहरात सदर योजनेचा लाभ शहरातील गरजु व गोर-गरीब नागरीकांना करण्यात येत आहे. सदर योजना शहरातील नागरीकांना मोफत व स्वच्छ पाणी पुरवठा करत आहे.

सदरील पुरवठा करण्यात येणारे पाणी हे विहीरीतून उपसा करून त्यांचे आरो प्युअर (शुध्द जल) करून सर्व नागरीकांना मोफत पुरवठा केला जातो. यासाठी विज वितरण कंपनीच्या विजेचा वापर होतो.

सदरील योजनेसाठी लागणारा खर्च सध्या तनवाणी मित्र मंडळ हे करीत आहे. सामाजिक व नागरीकांच्या हिताचा उपक्रम पाहता या कामासाठी येणारा खर्च, विज व विद्युत पुरवठ्याची देयके महानगरपालिकेतर्फे अदा करण्यात यावी. तसेच या सेवाभावी प्रकल्पासाठी महानगरपालिकेच्या नावावर स्वतंत्र नविन विज विद्युत मिटर घेणेचा आणि यापुढे येणाऱ्या प्रत्येक महिन्याची विद्युत देयके महानगरपालिकेतर्फे नियमित अदा करणेच्या मंजुरीस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात, श्री.विजय साईनाथ औताडे, श्री.कचरु छगनराव घोडके
**अनुमोदक:-**श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड, श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तनवाणी मित्रमंडळातर्फे संपुर्ण शहरातील नागरिकांसाठी वाटप करण्यात येणारे मोफत पिण्याचे पाणी विहिरीतून उपसा करून त्यांचे आरो प्युरीफायर (शुध्द जल) पुरवठा करणेसाठी नविन स्वतंत्र विद्युत मिटर महानगरपालिकेच्या नावावर घेण्यास आणि वीज पुरवठ्याची देयके महानगरपालिकेकडून म.रा.वि.म. कंपनीस नियमित अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ९७६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात विविध गर्दीच्या ठिकाणी महिला व पुरुषांसाठी पे ॲण्ड युज शौचालय बांधण्याचा उपक्रम महानगरपालिकेने हाती घेतला आहे. महानगरपालिकेच्या नियोजने नुसार शहरामध्ये विविध गर्दीच्या ठिकाणी १०० पे ॲण्ड युज पध्दतीचे शौचालय बांधण्याचे नियोजन करण्यात येत असून सर्व वॉर्ड अभियंता यांच्याकडून विविध ठिकाणी आवश्यकता असल्याबाबत सर्व संबंधीत वॉर्ड अभियंता यांच्या मार्फत माहिती मागविण्यात आली होती. त्या माहितीच्या आधारे प्रथम टप्प्याअंतर्गत १५ ठिकाणी पे ॲण्ड युज पध्दतीचे शौचालय बांधणे, अस्तित्वातील शौचालयाचे पाडकाम करून नव्याने बांधकाम करणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात येत आहे. यापूर्वी २० पे ॲण्ड युज शौचालय बांधून कार्यान्वीत करण्यात आली असून या व्यतिरिक्त औरंगपुरा व बीबीका मकबरा परिसराजवळील केवळ महिलांसाठी शौचालय कार्यान्वीत करण्यात आली आहेत. महानगरपालिकेने याचा अनुषंगाने शहरातील उद्योजक, सामाजीक संस्था यांना आवाहन केले असता मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई यांनी त्यांच्या CSR फंडातुन सुरुवातीलच्या टप्यात १५ विविध ठिकाणी पे ॲण्ड युज पध्दतीची महिला व पुरुषांच्या संयुक्त वापरासाठीची प्रथम टप्प्यांतर्गत व नंतर आवश्यकतेप्रमाणे पे ॲण्ड युज शौचालय बांधण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी, सदर संस्था त्यांच्या CSR फंडातुन महानगरपालिकेस पे ॲण्ड युज शौचालय बांधून देण्यास तयार असून त्यासाठीची जागा त्यांना मनपाची उपलब्ध जागा नाम मात्र लिजवर ३० वर्षासाठी द्यावयाची असून शौचालये बांधल्यानंतर त्याचे संचलन ते स्वत: पुढील ३० वर्षासाठी करणार आहेत. यामध्ये शौचालयाचे दैनंदिन स्वच्छता ठेवणे, त्यासाठी आवश्यक सफाई कर्मचारी त्यांच्या खर्चाने नेमणे, या शौचालयासाठी आवश्यक ठिकाणी बोअरवेल घेणे, पाणी पुरवठा व विद्युत देयके त्यांच्या खर्चाने अदा

करणे इत्यादी बाबीचा समावेश राहणार आहे. मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई यांनी दिलेला प्रस्ताव योग्य असल्याने मनपाच्या उपलब्ध जागेवर त्यांना शौचालय बांधणेसाठी मंजुरी देणे, आवश्यकता असल्यास जुन्या शौचालयाचे पाडकाम करणे, त्यांच्या समवेत यासाठी आवश्यक करार करणे व इतर अनुषंगीक कार्यवाही करणे, इत्यादी बाबीचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या नियोजने नुसार शहरामध्ये विविध गर्दीच्या ठिकाणी १०० पे ॲण्ड युज पध्दतीचे शौचालय बांधण्याचे नियोजन करण्यात येत असून सर्व वॉर्ड अभियंता यांच्याकडून विविध ठिकाणी आवश्यकता असल्याबाबत सर्व संबंधीत वॉर्ड अभियंता यांच्या मार्फत माहिती मागविण्यात आली होती. मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई यांनी त्यांच्या CSR फंडातुन सुरुवातीलच्या टप्यात १५ विविध ठिकाणी पे ॲण्ड युज शौचालय बांधण्याची तयारी दर्शविली असल्याने मनपाच्या उपलब्ध जागेवर त्यांना शौचालय बांधणेसाठी मंजुरी देणे, आवश्यकता असल्यास जुन्या शौचालयाचे पाडकाम करणे, त्यांच्या समवेत यासाठी आवश्यक करार करणे व इतर अनुषंगीक कार्यवाही करणे, इत्यादी बाबीचे अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासनाकडून प्राप्त झालेल्या रु.१०० कोटी अनुदानातून रस्त्यांच्या कामाचे शुभारंभ/उद्घाटन प्रसंगी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी आणखी रु.१२५.०० कोटी (अक्षरी रु.एकशे पंचवीस कोटी) अनुदान देण्याचे जाहीर केले. औरंगाबाद शहरातील महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई-सुविधांचा विकास करण्याच्या योजनेअंतर्गत रु.१२५.०० कोटी (रुपये एकशे पंचवीस कोटी) अनुदान (१००% अनुदान) महानगरपालिकेस सदर मुलभूत सोई-सुविधांच्या विकास करण्याच्या योजनेअंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण, कॉंक्रेटींग करणे व त्याच्याशी संबंधीत कामे करण्यात यावी व त्याची यादी खाली नमुद केली आहे.

महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई-सुविधांचा विकास करण्याच्या योजनेअंतर्गत शासनाकडून मिळणाऱ्या रु.125 कोटी अनुदानामधून रस्त्यांच्या विकासाची कामे करण्याकरीता शासकीय अनुदानातून विकसीत करावयाच्या खाली नमुद केलेल्या रस्त्यांच्या यादीस मान्यता देण्यात यावी. यापुर्वी प्राप्त झालेल्या १०० कोटी शासन अनुदानातून सुरु असलेल्या कामासाठी मे.श्रीखंडे कन्सल्टंट प्रा.लि.मुंबई ही प्रकल्प सल्लागार (PMC) एजन्सी नियुक्त झालेली आहे. याच एजन्सीमार्फत १२५ कोटीच्या कामांसाठी निविदापुर्व प्रोजेक्ट रिपोर्ट इत्यादी व निविदानंतरची सर्व कामे करुन घेण्यास मान्यता देण्यात यावी.

तसेच सदर ठराव शासनाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्याकरीता प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, या संदर्भाने शासनाकडे करावयाचा पत्रव्यवहार यासंबंधीचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करण्यात यावेत. सदरील कामाच्या एकूण अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १० टक्के कमी किंवा अधिक अंदाजित रक्कम गृहीत धरुन सविस्तर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**रस्त्यांची यादी**

| अ.क्र. | कामाचे नांव | निधी अंदाजे कोटी |
|---|---|---|
| १. | गंगाबावडी ते भावसिंगपूरा कॉक्रीटींग करणे | ०१.०० कोटी |
| २. | ०१. प्रा.घुले यांचे घरापासून ते यशवंतराव मुक्त विद्यापीठ ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज भिंती लगत<br>०२.महात्मा फुले चौक ते चाँद रिक्षा स्टँड | ०१.०० कोटी |
| ३. | ०१. जानकी हॉटेल ते श्रध्दा हॉस्पीटल<br>०२. आजुबाई मंदिर ते गाढे हॉस्पीटल | ०१.५० कोटी<br>०१.५० कोटी |
| ४. | गणपती मंदिर ते इब्राहीम कॉलनी | ०१.०० कोटी |
| ५. | वरद गणेश मंदिर ते सिल्लेखाना | ०२.०० कोटी |
| ६. | चांदणी चौक ते सलीम अली सरोवर | ०४.०० कोटी |
| ७. | जळगांव रोड साई हॉस्पीटल ते गट नं.१५३ | ०३.०० कोटी |
| ८. | बळीराम पाटील शाळा ते बजरंग चौक | ०१.०० कोटी |
| ९. | आंबेडकर पुतळा ते भगतसिंगनगर ते पिसादेवी रोड | ०४.० कोटी |
| १०. | १)तानाजी चौक ते साई मंदिर ते कंधारकर चौक ते चेतक घोडा ते रोपळेकर हॉस्पीटल<br>२)आकाशवाणी चौक ते त्रिमुर्ती चौक | ०२.०० कोटी<br>०२.०० कोटी |
| ११. | ०१. आमदार चौक ते आयटीआय चौक ते मिनाताई ठाकरे नगर<br>०२. आयप्पा मंदिर रोड | ०२.५० कोटी<br>०२.०० कोटी |
| १२. | प्रतापनगर स्मशानभूमी रोड | ०१.०० कोटी |
| १३. | गोपाळ टी ते गुरुद्वारा पर्यंत | ००.५० कोटी |
| १४. | कामगार चौक ते आनंद गाडे चौक कॉक्रीट रस्ता व आनंद गाडे चौक ते देवगिरी कॉलेज डीव्हायडर | ०१.०० कोटी |
| १५. | एमटीडीसी ते वाल्मी चौक ते आयटीआय चौक व वेदांत नगर व रचनाकर कॉलनी | ०५.०० कोटी |
| १६. | हॉटेल तंदूर ते लोळगे पेट्रोल पंपा पर्यंत | ०१.५० कोटी |
| १७. | गट क्रमांक-५८ मिना महादेव पाटील कमलनयन बजाज ते ओंकार बालवाडी रोड | ००.७५ कोटी |
| १८. | पैठण रोड ते बीड बाय पास जोडणारा बेस्ट-प्राईस मागील डीपी रोड | ०७.५० कोटी |
| १९. | अग्रसेन विद्या मंदिर ते शेरकर यांच्या घराजवळून जाणारा डीपी रोड | ०४.०० कोटी |
| २०. | कांचनवाडी ते नाथपूरम चौक नाथ व्हॅली रोड रॉक वूड सोसायटी पर्यंत | ००.५० कोटी |
| २१. | बीड बायपास रोडवरील अर्थ क्लासिक, रॉयल क्लासिक, द्वारकापूरी ले आऊट मधील डीपी रोड | ०१.५० कोटी |
| २२. | प्रोझोन मॉल ते कलाग्राम मार्गे गरवारे स्टेडीयम | ०३.०० कोटी |
| २३. | राष्ट्रवादी भवन ते यशोमंगल कार्यालय | ००.८० कोटी |

| | | |
|---|---|---|
| २४. | गांधी पुतळा ते सराफा बोहरी कठडा | ०१.०० कोटी |
| २५. | एन-११ एम्स् हॉस्पिटल ते स्मशानभुमी ते हर्सुल टी पॉईंट | ०१.०० कोटी |
| २६. | युगधर्म अपार्टमेंट ते सुप्रिया प्रोव्हिजन गणपती मंदिर साहस सोसा. ते उद्योगस्नेह अपार्टमेंट पर्यंत | ०१.०० कोटी |
| २७. | पार्श्वनाथ चौक ते महावीर जैन मंदिर एन-९ मनपा शाळा ते बळीराम पाटील शाळा | ०१.०० कोटी |
| २८. | अशोक चौक, लक्ष्मण चावडी ते कैलासनगर स्मशानभुमी पर्यंत | ०१.०० कोटी |
| २९. | स्वामी विवेकानंद नगर एन-१२ शिलादीप कॉम्प्लेक्स ते लक्ष्मी तेल भांडार | ०१.०० कोटी |
| ३०. | बन्सी मामा यांच्या घरापासून ते राधास्वामी कॉलनी ते नवीन वसाहती पर्यंत | ०१.०० कोटी |
| ३१. | संभाजीनगर कमान ते छत्रपती नगर दत्तमंदिर पर्यंत | ००.५० कोटी |
| ३२. | अहिल्याबाई होळकर चौक ते मोरेश्वर हौ.सोसा.चौक | ००.५० कोटी |
| ३३. | शंभुनगर ते गादिया विहार | ०१.०० कोटी |
| ३४. | बाजीराव पेशवा चौक, मराठवाडा पान सेंटर व भरतनगर हौ.सोसा. ते श्री वॉशिंग सेंटर पर्यंत | ०१.०० कोटी |
| ३५. | पडेगांव ते सिल्लेखाना ते कासंबरी दर्गा रोड पर्यंत | ०१.०० कोटी |
| ३६. | महापालिका आरोग्य केंद्र बन्सीलालनगर ते श्रीमती लिला यांच्या घरापर्यंत, लालमन चौक ते श्री.मधुकरअण्णा मुळे यांच्या घरापर्यंत | ०१.५० कोटी |
| ३७. | जयदुर्गा हौ.सोसा.ते पाण्याच्या टाकी पर्यंत | ०१.५० कोटी |
| ३८. | शनिमंदिर पडेगांव ते श्री.राठोड यांचे घरापर्यत | ०१.०० कोटी |
| ३९. | आर.टी.ओ ऑफिस मागील बाजू ते श्री.मधुकर अण्णा मुळे यांच्या घरापर्यंत व श्री.जॉनी यांच्या घरापासून ते श्री.केळकर यांच्या घरापर्यंत | ०१.०० कोटी |
| ४०. | नारेगांव स्मशानभूमी ते तथागत चौक | ०१.०० कोटी |
| ४१. | दिपाली हॉटेल ते जयभवानी चौक ते मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन | ०४.०० कोटी |
| ४२. | पुंडलिकनगर पाण्याची टाकी ते एन-४ येथील ॲड.धोंगडे यांच्या घरापर्यंत | ०१.०० कोटी |
| ४३. | वानखेडेनगर होनाजीनगर मधील रोजेबाग येथील श्री.अब्दुल सत्तार यांच्या घरापासून जटवाडा रोड गट क्र.१६,१७, १३९,१४१ व ११० पर्यंत | ०२.०० कोटी |
| ४४. | वार्ड क्र.०६ यादवनगर येथील एन-११ महापालिका आरोग्य केंद्र ते राष्ट्रवादी भवन समोरील रस्ता | ०१.०० कोटी |
| ४५. | एन-९ के पवननगर शरद हॉटेल ते एन-९, एम-२ शिवजागृत मंदिर कडील १५ मी.रुंद रस्ता | ०१.२० कोटी |
| ४६. | गरवारे स्टॉप पासून ते त्रिदेवता मंदिरा पर्यंत | ०१.०० कोटी |

| | | |
|---|---|---|
| ४७. | टिळकपथ येथील शीतला माता मंदिर ते आर्य समाज औरंगपुरा पर्यंत १५ मी.रुंद रस्ता | ०१.०० कोटी |
| ४८. | वार्ड क्र.६४ गुलमोहर कॉलनी अंतर्गत अविष्कार चौक एन-५ ते भोला पान सेंटर १५ मी.रुंद रस्ता | ०१.०० कोटी |
| ४९. | राज हाईटस ते एन-५ पाण्याच्या टाकी पर्यंत | ०१.५० कोटी |
| ५०. | जालना रोड ते ॲपेक्स हॉस्पिटल | ०१.५० कोटी |
| ५१. | गजानन मंदिर ते डॉ.हेडगेवार रुग्णालय ते चेतक घोडा | ०२.०० कोटी |
| ५२. | एन-३ साई ट्रॉन्सपोर्ट पासून एन-४ श्री.शिवनाथ राठी यांच्या घरापर्यंत १८ मी.रुंद रस्ता | ०१.५० कोटी |
| ५३. | प्रभाग क्र. ८९ चिकलठाणा मधील जालना रोड ते बजरंगनगर पर्यंतचा मुख्य रस्ता | ०१.५० कोटी |
| ५४. | रामायणा हॉल ते विभागीय क्रिडा संकुल पर्यंत १८ मी.रुंद रस्ता | ०२.५० कोटी |
| ५५. | जयविश्वभारती कॉलनी मधील विवेकानंद चौक ते अग्निहोत्र चौक २० मी.रुंद रस्ता | ०१.५० कोटी |
| ५६. | बीड बायपास संभाजी चौक ते श्री.विनायकराव हिवाळे पाटील यांचे घर ते श्री.रामा हिवाळे पाटील यांच्या घरापर्यंत | ०१.५० कोटी |
| ५७. | साक्षी प्राईड कांचननगर ते देशमुख ले आऊट पर्यंत BT | ०१.०० कोटी |
| ५८. | दादोजी कोंडदेव शाळा ते मारोती मंदिर मारोतीनगर १२ मिटर रुंद | ०१.०० कोटी |
| ५९. | हर्सूल गाव ते जमनज्योती महापालिका हद्दीपर्यंत ९ मी.रुंद रस्ता | ०१.०० कोटी |
| ६०. | वार्ड क्र.८३ मुकुंदवाडी मधील एव्हान हॉटेल ते इच्छामणी हॉटेल पर्यंत ९ मी.रुंद रस्ता | ०१.०० कोटी |
| ६१. | सिल्लेखाना चौक ते लक्ष्मी चावडी १५ मी.रुंद रस्ता | ०२.०० कोटी |
| ६२. | अग्रसेन चौक ते सेंट्रल एक्साईज कार्यालय रस्ता | ०१.०० कोटी |
| ६३. | वार्ड क्र.३८ वोखार्ड कंपनी ते जयभवानी चौका पर्यंत १० मी.रुंद रस्ता | ०२.०० कोटी |
| ६४. | धूत हॉस्पिटल ते मसनतपुर, शहानगर पर्यंत ९ मी.रुंद रस्ता | ०२.०० कोटी |
| ६५. | शैलेश हॉटेल ते हनुमान नगर चौक पर्यंतचा रस्ता | ०१.०० कोटी |
| ६६. | महापालिका शाळा ते हॉटेल पुष्कर पर्यंत ९ मी.रुंद रस्ता | ००.५० कोटी |
| ६७. | शिवजागृत मंदिर ते ट्रॅफिक गार्डन पर्यंत ९ मी.रुंद रस्ता | ००.५० कोटी |
| ६८. | जुनाबाजार ते कुंभारवाडा बारुदगर नाला ते औरंगपुरा सिग्नल, सुराणा बिल्डींग मार्ग तसेच जुनी देना बँक ते औरंगपुरा भाजी मंडई पर्यंत | ०१.०० कोटी |
| ६९. | गट क्र.१७९/५ अंबिकानगर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक गट क्र. १८८.१५ मिटर रुंद रस्ता | ०१.५० कोटी |
| ७०. | आई हॉस्पिटल ते देवगिरी बँक मयूरपार्क मुख्य रस्ता. | ०१.२५ कोटी |
| ७१. | एस.बी.ओ.चौक ते भगतसिंगनगर रोड न्यु हायस्कुल पर्यंत १५ मी.रुंद रस्ता | ०२.५० कोटी |

| | | |
|---|---|---|
| ७२. | श्री.सारंगधर चौहान किराणा ते खत्रीनगर कृष्णापुरवाडी रोड | ०१.०० कोटी |
| ७३. | १) वार्ड क्र.३७ जालना रोड ते स्मशानभुमी ते चिकलठाणा आठवडी बाजार आणि<br>२) जालना रोड ते हिनानगर ते सावंगी बायपास | ०१.०० कोटी<br>०१.०० कोटी |
| ७४. | हर्सूल टी पॉईट ते जाधववाडी चौक सर्व्हिस रोड ग्रीन बेल्ट व फुटपाथ तयार करणे | ०१.०० कोटी |
| ७५. | गट क्रमांक १५३ बारवा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक वडाचे झाड २४ मिटर रुंद | ०३.०० कोटी |
| ७६. | मोंढा हौद ते हरी मस्जिद पर्यंत | ००.५० कोटी |
| ७७. | १) अण्णाभाऊ साठे चौक ते शहागंज<br>२) गांधी पुतळा ते सुभेदारी गेस्ट हाऊस | ०३.५० कोटी<br>०१.७५ कोटी |
| ७८. | देना बँक ते औरंगपुरा | ०२.५० कोटी |
| ७९. | मुकूंदवाडी रेल्वे गेट ते बीड बायपास रोड | ०३.०० कोटी |

**सुचक:-**श्री.विजय साईनाथ औताडे, श्री.विकास रतनलाल जैन, श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत,
**अनुमोदक:-**श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्रीमती स्वाती किशोर नागरे, श्री.आत्माराम माणिकराव पवार, श्री.बन्सी ग्यानु जाधव, श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी, श्रीमती राखी प्रशांत देसरडा.
मा.महापौर :सभागृहात स.पालिका सदस्यांनी केलेल्या सुचना व झालेल्या निर्णयानुसार प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या स.पालिका सदस्यांनी केलेल्या सुचना व झालेल्या निर्णयाप्रमाणे मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांनी औरंगाबाद शहरातील रस्त्यांचे कामासाठी र.रु.१२५.०० कोटी (अक्षरी रु.एकशे पंचवीस कोटी) अनुदान देण्याचे जाहीर केल्यानुसार औरंगाबाद शहरातील महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई-सुविधांचा विकास करण्याच्या योजनेअंतर्गत सदरील रस्त्यांची कामे करण्याकरीता खालील नमुद केलेल्या रस्त्यांच्या यादीस मान्यता देण्यात येते. तसेच यापुर्वी प्राप्त झालेल्या १०० कोटी शासन अनुदानातून सुरु असलेल्या कामासाठी मे.श्रीखंडे कन्स्ल्टंट प्रा.लि.मुंबई ही प्रकल्प सल्लागार (PMC) एजन्सी नियुक्त झालेली आहे. याच एजन्सीमार्फत १२५ कोटीच्य कामांसाठी निविदापुर्व प्रोजेक्ट रिपोर्ट इत्यादी व निविदानंतरची सर्व कामे करून घेण्यास मान्यता देण्यात येते.

सदरील कामाच्या एकूण अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १० टक्के कमी किंवा अधिक अंदाजित रक्क्म गृहीत धरुन सविस्तर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. तसेच सदर ठराव शासनाकडे पुढील कार्यवाहीस्त्व पाठथ्वण्याकरीता प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता या संदर्भाने शासनाकडे करावायाचा पत्रव्यवहार या संबंधीचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधी अंदाजे कोटी |
|---|---|---|
| ०१ | गंगाबावडी ते भावसिंगपुरा कॉंक्रीटींग करणे. | ०१.०० कोटी |
| ०२ | ०१. प्रा.घुले यांचे घरापासून ते यशवंतराव मुक्त विद्यापीठ ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज भिंती लगत | ०१.०० कोटी |

| | | |
|---|---|---|
| | ०२.महात्मा फुले चौक ते चॉंद रिक्षा स्टॅंड | |
| ०३ | ०१. जानकी हॉटेल ते श्रध्दा हॉस्पीटल<br>०२. आजुबाई मंदिर ते गाढे हॉस्पीटल | ०१.५० कोटी<br>०१.५० कोटी |
| ०४ | गणपती मंदिर ते इब्राहीम कॉलनी | ०१.०० कोटी |
| ०५ | वरद गणेश मंदिर ते सिल्लेखाना | ०२.००कोटी |
| ०६ | चांदणी चौक ते सलीम अली सरोवर | ०४.०० कोटी |
| ०७ | जळगांव रोड साई हॉस्पीटल ते गट नं.१५३ | ०३.०० कोटी |
| ०८ | बळीराम पाटील शाळा ते बजरंग चौक | ०१.०० कोटी |
| ०९ | आंबेडकर पुतळा ते भगतसिंगनगर ते पिसादेवी रोड | ०५.०० कोटी |
| १० | १)तानाजी चौक ते साई मंदिर ते कंधारकर चौक ते चेतक घोडा ते रोपळेकर हॉस्पीटल<br>२)आकाशवाणी चौक ते त्रिमुर्ती चौक | ०२.०० कोटी<br>०२.०० कोटी |
| ११ | ०१. आमदार चौक ते आयटीआय चौक ते मिनाताई ठाकरे नगर<br>०२. आयप्पा मंदिर रोड | ०२.५० कोटी<br>०२.०० कोटी |
| १२ | प्रतापनगर स्मशानभूमी रोड | ०१.०० कोटी |
| १३ | गोपाळ टी ते गुरुद्वारा पर्यंत | ००.५० कोटी |
| १४ | कामगार चौक ते आनंद गाडे चौक कॉक्रीट रस्ता व आनंद गाडे चौक ते देवगिरी कॉलेज डीव्हायडर | ०१.०० कोटी |
| १५ | एमटीडीसी ते वाल्मी चौक ते आयटीआय चौक व वेदांत नगर व रचनाकर कॉलनी | ०५.०० कोटी |
| १६ | हॉटेल तंदूर ते लोळगे पेट्रोल पंपा पर्यंत | ०१.५० कोटी |
| १७ | गट क्रमांक-५८ मिना महादेव पाटील कमलनयन बजाज ते ओंकार बालवाडी रोड | ००.७५ कोटी |
| १८ | पैठण रोड ते बीड बाय पास जोडणारा बेस्ट-प्राईस मागील डीपी रोड | ०७.५० कोटी |
| १९ | अग्रसेन विद्या मंदिर ते शेरकर यांच्या घराजवळून जाणारा डीपी रोड | ०४.०० कोटी |
| २० | कांचनवाडी ते नाथपूरम चौक नाथ व्हॅली रोड रॉक वूड सोसायटी पर्यंत | ००.५० कोटी |
| २१ | बीड बायपास रोडवरील अर्थ क्लासिक, रॉयल क्लासिक, द्वारकापूरी ले आऊट मधील डीपी रोड | ०१.५० कोटी |
| २२ | प्रोझोन मॉल ते कलाग्राम मार्गे गरवारटेडीयम | ०३.०० कोटी |
| २३ | राष्ट्रवादी भवन ते यशोमंगल कार्यालय | ००.८० कोटी |
| २४ | गांधी पुतळा ते सराफा बोहरी कठडा | ०१.०० कोटी |
| २५ | एन-११ एम्स् हॉस्पिटल ते स्मशानभुमी ते हर्सुल टी पॉईंट | ०१.०० कोटी |
| २६ | युगधर्म अपार्टमेंट ते सुप्रिया प्रोव्हिजन गणपती मंदिर साहस सोसा. ते उद्योगस्नेह अपार्टमेंट पर्यंत | ०१.०० कोटी |

| | | |
|---|---|---|
| २७ | पार्श्वनाथ चौक ते महावीर जैन मंदिर एन-९ मनपा शाळा ते बळीराम पाटील शाळा | ०१.०० कोटी |
| २८ | अशोक चौक, लक्ष्मण चावडी ते कैलासनगर स्मशानभुमी पर्यंत | ०१.०० कोटी |
| २९ | स्वामी विवेकानंद नगर एन-१२ शिलादीप कॉम्प्लेक्स ते लक्ष्मी तेल भांडार | ०१.०० कोटी |
| ३० | बन्सी मामा यांच्या घरापासून ते राधास्वामी कॉलनी ते नवीन वसाहती पर्यंत | ०१.०० कोटी |
| ३१ | संभाजीनगर कमान ते छत्रपती नगर दत्तमंदिर पर्यंत | ००.५० कोटी |
| ३२ | अहिल्याबाई होळकर चौक ते मोरेश्वर हौ.सोसा.चौक | ००.५० कोटी |
| ३३ | शंभुनगर ते गादिया विहार | ०१.०० कोटी |
| ३४ | बाजीराव पेशवा चौक, मराठवाडा पान सेंटर व भरतनगर हौ.सोसा. ते श्री वॉशिंग सेंटर पर्यंत | ०१.०० कोटी |
| ३५ | पडेगांव ते सिल्लेखाना ते कासंबरी दर्गा रोड पर्यंत | ०१.०० कोटी |
| ३६ | महापालिका आरोग्य केंद्र बन्सीलालनगर ते श्रीमती लिला यांच्या घरापर्यंत, लालमन चौक ते श्री.मधुकरअण्णा मुळे यांच्या घरापर्यंत | ०१.५० कोटी |
| ३७ | जयदुर्गा हौ.सोसा.ते पाण्याच्या टाकी पर्यंत | ०१.५० कोटी |
| ३८ | शनिमंदिर पडेगांव ते श्री.राठोड यांचे घरापर्यत | ०१.०० कोटी |
| ३९ | आर.टी.ओ ऑफिस मागील बाजू ते श्री.मधुकर अण्णा मुळे यांच्या घरापर्यंत व श्री.जॉनी यांच्या घरापासून ते श्री.केळकर यांच्या घरापर्यंत | ०१.०० कोटी |
| ४० | नारेगांव स्मशानभूमी ते तथागत चौक | ०१.०० कोटी |
| ४१ | दिपाली हॉटेल ते जयभवानी चौक ते मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन | ०४.०० कोटी |
| ४२ | पुंडलिकनगर पाण्याची टाकी ते एन-४ येथील ॲड.धोंगडे यांच्या घरापर्यंत | ०१.०० कोटी |
| ४३ | वानखेडेनगर होनाजीनगर मधील रोजेबाग येथील श्री.अब्दुल सत्तार यांच्या घरापासून जटवाडा रोड गट क्र.१६,१७, १३९,१४१ व ११० पर्यंत | ०२.०० कोटी |
| ४४ | वार्ड क्र.०६ यादवनगर येथील एन-११ महापालिका आरोग्य केंद्र ते राष्ट्रवादी भवन समोरील रस्ता | ०१.०० कोटी |
| ४५ | एन-९ के पवननगर शरद हॉटेल ते एन-९, एम-२ शिवजागृत मंदिर कडील १५ मी.रुंद रस्ता | ०१.२० कोटी |
| ४६ | गरवारे स्टॉप पासून ते त्रिदेवता मंदिरा पर्यंत | ०१.०० कोटी |
| ४७ | टिळकपथ येथील शीतला माता मंदिर ते आर्य समाज औरंगपुरा पर्यंत १५ मी.रुंद रस्ता | ०१.०० कोटी |
| ४८ | वार्ड क्र.६४ गुलमोहर कॉलनी अंतर्गत अविष्कार चौक एन-५ ते भोला पान सेंटर १५ मी.रुंद रस्ता | ०१.०० कोटी |
| ४९ | राज हाईटस ते एन-५ पाण्याच्या टाकी पर्यंत | ०१.५० कोटी |

| | | |
|---|---|---|
| ५० | जालना रोड ते ॲपेक्स हॉस्पिटल | ०१.५० कोटी |
| ५१ | गजानन मंदिर ते डॉ.हेडगेवार रुग्णालय ते चेतक घोडा | ०२.०० कोटी |
| ५२ | एन-३ साई ट्रॉन्सपोर्ट पासून एन-४ श्री.शिवनाथ राठी यांच्या घरापर्यंत १८ मी.रुंद रस्ता | ०१.५० कोटी |
| ५३ | प्रभाग क्र. ८९ चिकलठाणा मधील जालना रोड ते बजरंगनगर पर्यंतचा मुख्य रस्ता | ०१.५० कोटी |
| ५४ | रामायणा हॉल ते विभागीय क्रिडा संकुल पर्यंत १८ मी.रुंद रस्ता | ०२.५० कोटी |
| ५५ | जयविश्वभारती कॉलनी मधील विवेकानंद चौक ते अग्निहोत्र चौक २० मी.रुंद रस्ता | ०१.५० कोटी |
| ५६ | बीड बायपास संभाजी चौक ते श्री.विनायकराव हिवाळे पाटील यांचे घर ते श्री.रामा हिवाळे पाटील यांच्या घरापर्यंत | ०१.५० कोटी |
| ५७ | साक्षी प्राईड कांचननगर ते देशमुख ले आऊट पर्यंत BT | ०१.०० कोटी |
| ५८ | दादोजी कोंडदेव शाळा ते मारोती मंदिर मारोतीनगर १२ मिटर रुंद | ०१.०० कोटी |
| ५९ | हर्सूल गाव ते जमनज्योती महापालिका हद्दीपर्यंत ९ मी.रुंद रस्ता | ०१.०० कोटी |
| ६० | वार्ड क्र.८३ मुकुंदवाडी मधील एव्हान हॉटेल ते इच्छामणी हॉटेल पर्यंत ९ मी.रुंद रस्ता | ०१.०० कोटी |
| ६१ | सिल्लेखाना चौक ते लक्ष्मी चावडी १५ मी.रुंद रस्ता | ०२.०० कोटी |
| ६२ | अग्रसेन चौक ते सेंट्रल एक्साईज कार्यालय रस्ता | ०१.०० कोटी |
| ६३ | वार्ड क्र.३८ वोखार्ड कंपनी ते जयभवानी चौका पर्यंत १० मी.रुंद रस्ता | ०२.०० कोटी |
| ६४ | धूत हॉस्पिटल ते मसनतपुर, शहानगर पर्यंत ९ मी.रुंद रस्ता | ०२.०० कोटी |
| ६५ | शैलेश हॉटेल ते हनुमान नगर चौक पर्यंतचा रस्ता | ०१.०० कोटी |
| ६६ | महापालिका शाळा ते हॉटेल पुष्कर पर्यंत ९ मी.रुंद रस्ता | ००.५० कोटी |
| ६७ | शिवजागृत मंदिर ते ट्रॅफिक गार्डन पर्यंत ९ मी.रुंद रस्ता | ००.५० कोटी |
| ६८ | जुनाबाजार ते कुंभारवाडा बारुदगर नाला ते औरंगपुरा सिग्नल, सुराणा बिल्डींग मार्ग तसेच जुनी देना बँक ते औरंगपुरा भाजी मंडई पर्यंत | ०१.०० कोटी |
| ६९ | गट क्र.१७९/५ अंबिकानगर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक गट क्र. १८८.१५ मिटर रुंद रस्ता | ०१.५० कोटी |
| ७० | आई हॉस्पिटल ते देवगिरी बँक मयूरपार्क मुख्य रस्ता. | ०१.२५ कोटी |
| ७१ | एस.बी.ओ.चौक ते भगतसिंगनगर रोड न्यु हायस्कुल पर्यंत १५ मी.रुंद रस्ता | ०२.५० कोटी |
| ७२ | श्री.सारंगधर चौहान किराणा ते खत्रीनगर कृष्णापुरवाडी रोड | ०१.०० कोटी |
| ७३ | १) वार्ड क्र.३७ जालना रोड ते स्मशानभुमी ते चिकलठाणा आठवडी बाजार आणि<br>२) जालना रोड ते हिनानगर ते सावंगी बायपास | ०१.०० कोटी<br>०१.०० कोटी |
| ७४ | हर्सूल टी पॉईट ते जाधववाडी चौक सर्व्हिस रोड ग्रीन बेल्ट व | ०१.०० कोटी |

| | | |
|---|---|---|
| | फुटपाथ तयार करणे | |
| ७५ | गट क्रमांक १५३ बारवा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक वडाचे झाड २४ मिटर रुंद | ०३.०० कोटी |
| ७६ | मोंढा हौद ते हरी मस्जिद पर्यंत | ००.५१ कोटी |
| ७७ | १) अण्णाभाऊ साठे चौक ते शहागंज<br>२) गांधी पुतळा ते सुभेदारी गेस्ट हाऊस | ०३.५० कोटी<br>०१.७५ कोटी |
| ७८ | देना बँक ते औरंगपुरा | ०२.५० कोटी |
| ७९ | मुकूंदवाडी रेल्वे गेट ते बीड बायपास रोड | ०३.०० कोटी |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर भागामध्ये मोठ्या प्रमाणात दलित लोकसंख्या असून या भागात बऱ्याच दिवसांपासून विकास कामे झालेली नाहीत. या वॉर्डामध्ये ६० ते ७० टक्के दलित लोकसंख्या आहे. तरी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विकास कामासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात यावा.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | र.रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत श्री.शैलेश हॉटेल येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५ लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत श्री.गजानन मनगटे यांच्या गल्लीतील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१५ लक्ष |

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर भागातील दलित वसाहतींमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विकास कामासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामांचे नाव | र.रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत श्री.शैलेश हॉटेल येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५ लक्ष |
| २. | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत श्री.गजानन मनगटे यांच्या गल्लीतील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९७९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महापालिका हद्दीतील खालील भागामध्ये मोठ्या प्रमाणात दलित लोकसंख्या असुन या भागात बऱ्याच दिवसापासून विकास कामे झालेली नाही. या वॉर्डामध्ये ६० ते ७० टक्के दलित लोकसंख्या आहे. तरी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास

कामासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी शिफारस करण्यास्तव मा.जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | विकास कामांचे नावे | र.रुपये |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत पुंडलिकनगर (पश्चिम) भागामध्ये रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५ लक्ष |
| ०२ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.९२, विश्रांतीनगर, गल्ली नं.०८ मधील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२० लक्ष |
| ०३ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.११३, भारतनगर तुळजा भवानी चौक येथील श्री.साळवे यांच्या घरापासुन ते श्री.गायकवाड यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१३ लक्ष |
| ०४ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.११३, भारतनगर, रेणुकानगर येथील प्रविण प्रोव्हीजन पासून ते अमृता मिर्ची कांडप ते श्री.चोरगे चंद्रे सर यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१३.६० लक्ष |
| ०५ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.११३, भारतनगर, रेणुकानगर येथील श्री.माणे यांच्या घरापासुन ते श्री.मांडे ते श्री.गुळवे यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.०७ लक्ष |
| ०६ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.७९,न्यायनगर येथील दुर्गामाता कॉलनी, दुर्गामाता मंदिर येथे सामाजिक सभागृह बांधणे. | रु.२० लक्ष |
| ०७ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.११३, भारतनगर, स्वामी समर्थनगर गल्ली नं.०३ येथील श्री.बरगे यांच्या घरासमोरील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१० लक्ष |
| ०८ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.३६, ब्रिजवाडी अंतर्गत पॉवरलुम येथील अंतर्गत रस्ते तयार करणे. | रु.७ लक्ष ५० हजार |

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७९, न्यायनगर भागातील दलित वसाहतींमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विकास कामासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामांचे नावे | र.रुपये |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.७९, न्यायनगर अंतर्गत पुंडलिकनगर (पश्चिम) भागामध्ये रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५ लक्ष |
| ०२ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.९२, विश्रांतीनगर, गल्ली नं.०८ मधील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२० लक्ष |
| ०३ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.११३, भारतनगर तुळजा भवानी चौक येथील श्री.साळवे यांच्या घरापासुन ते श्री.गायकवाड यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१३ लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ०४ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.११३, भारतनगर, रेणुकानगर येथील प्रविण प्रोव्हीजन पासून ते अमृता मिर्ची कांडप ते श्री.चोरगे चंद्रे सर यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१३.६० लक्ष |
| ०५ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.११३, भारतनगर, रेणुकानगर येथील श्री.माणे यांच्या घरापासुन ते श्री.मांडे ते श्री.गुळवे यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.०७ लक्ष |
| ०६ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.७९,न्यायनगर येथील दुर्गामाता कॉलनी, दुर्गामाता मंदिर येथे सामाजिक सभागृह बांधणे. | रु.२० लक्ष |
| ०७ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.११३, भारतनगर, स्वामी समर्थनगर गल्ली नं.०३ येथील श्री.बरगे यांच्या घरासमोरील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१० लक्ष |
| ०८ | औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड क्र.३६, ब्रिजवाडी अंतर्गत पॉवरलुम येथील अंतर्गत रस्ते तयार करणे. | रु.७ लक्ष ५० हजार |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ९८०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.पियुष विजय तांबे, वय वर्ष ०६, रा.बोकळावाडी या बालकांचा मोकाट कुत्राने लचका तोडलेला असुन सदर बालकांची आई-वडीलांची आर्थिक परिस्थिती अतिशय नाजुक असून या बालकास आरोग्य उपचार करण्यासाठी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मा.महापौर यांच्या निधी मधून करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.विकास रतनलाल जैन **अनुमोदक:-**श्रीमती स्वाती किशोर नागरे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.पियुष विजय तांबे, वय वर्ष ०६, रा.बोकळावाडी या बालकास मोकाट कुत्राने लचका तोडलेला असुन त्याच्या आरोग्य उपचार करण्यासाठी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मा.महापौर यांच्या निधी मधून करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

स्वाक्षरित/-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद